जुलै १९८५ | गुरुपौर्णिमा विशेषांक | किंमत १ रु

# श्री साईलीला

श्री साईबाबा संस्थान शिर्डीचे अधिकृत मासिक



श्रीसाईलीला
जुलै १९८६

# श्री साईलीला

श्रीसाईबाबा संस्थान.
शिरडीचे अधिकृत मासिक

संपादक

श्री. रा. द. बन्ने
कार्यकारी अधिकारी श्रीसाईबाबा संस्थान शिरडी

: कार्यकारी संपादक :

प्रा. सौ. इंदिरा खेर
एम.ए. पी.एच.डी.
(इंग्रजी आवृत्ती)

श्री. सदानंद चेंदवणकर
(मराठी आवृत्ती)

## गुरुपौर्णिमा विशेषांक

वर्ष ६५ वे] [ अंक - ४

किंमत १ रुपया

दूरध्वनी ४१२२५६१

: कार्यालय :

"साईनिकेतन", प्लॉट नं ८०४ बी, डॉ. आंबेडकर रोड, दादर, मुंबई- ४०० ०१४.

वार्षिक वर्गणी रु. १०/- (ट.ख. सह) किरकोळ अंक १ रु. फक्त.

श्रीसाईबाबांच्या संदेशाचा जगभर प्रसार करणे हे
श्रीसाईलीलाचे मुख्य उद्दिष्ट आहे.



## श्री साई वाक्सुधा

गंगा समुद्रा भेटूं जाते।
वाटेनें तापार्ता शीतल करिते।
तीरीच तरूंसी जीवन देते।
तृषा हरिते सकळांची।। २६ ।।
तैसीच संतांची अवतार स्थिती।
प्रकट होती आणि जाती।
परी तयांची आचरिती रीती।
पावन करिती जगातें।। २७ ।।
कमालीची क्षमाशीलता
नैसर्गिक विलक्षण अक्षोभ्यता।
ऋतुता मृदुता सोशिकता
तैसीच संतुष्टता निरूपम।। २८ ।।
दिसाया जरी देहधारी।
तरी तो निर्गुण निर्विकारी।
निःसंग निर्मुक्त निज अंतरी।
प्रपंची जरी विचरला।। २९ ।।
कृष्ण स्वयें जो परमात्मा।
तोही म्हणे संत मदात्मा।
संत माझी सजीव प्रतिमा।
संत-सप्रेमा तो मीच।। ३० ।।
— श्रीसाई सच्चरित् अध्याय ११ वा

## सुविचार

ब्रह्मनंदं परमसुखदं केवलं ज्ञानमूर्ति
द्वंद्वातीतं गगनसदृशं तत्वमस्यादिलक्ष्यम्।
एकं नित्यं विमलमचलं सर्वधी साक्षिभूतम
भावातीतं त्रिगुणरहितं सद्‌गुरूं तं नमामि।।

ब्रह्मानंदरूप, परमसुखदायक, केवळ ज्ञानमूर्ति, द्वंद्वागीत आकाशाप्रमाणे अलिप्त, तत्वमसि वगैरे महावाक्यांचे लक्ष्य, एक नित्य शुद्ध, स्थिर, सर्वांच्या बुद्धीचा साक्षी, दृश्यातीत आणि त्रिगुणरहित अशा त्या सद्‌गुरुला मी नमस्कार करतो.

या मासिकात प्रकाशित झालेल्या लेखातील मतांशी संपादक सहमत आहेतच असे नाही.


# श्री साईलीला — जुलै १९८६

## अनुक्रमणिका


| क्रमांक | लेख-कविता शिर्षक | लेखक-कवि नाव | पृष्ठ क्रमांक |
|---|---|---|---|
| १ | संपादकीय | — | ४ |
| २ | पाहिल साई जन्मभरी तुला | — श्री. बाळासाहेब नाडकर्णी | ६ |
| ३ | भारताचा ज्ञानदीप | — | ७ |
| ४ | व्यासपौर्णिमा गुरुपौर्णिमा | — | ९ |
| ५ | श्री सद्‌गुरु साईबाबा | — सौ. लीना भांगले | १० |
| ६ | गुरु महात्म्य | — श्री. चंद्रकांत गरगटे | ११ |
| ७ | मग आलिंगिला पूर्णिमा | — श्री. नरसिंह दिवेकर | १३ |
| ८ | तुम्हीच माझे बाबा साई | — श्री. मधु पाटणकर | १६ |
| ९ | स्वामी विवेकानंदांची गुरुभक्ति | — | १७ |
| १० | साक्षात् ईश्वर | — श्री. भालचंद्र कडणे | १९ |
| ११ | कबीर आणि त्याचे सद्‌गुरु | — | २० |
| १२ | श्री साईबाबा आणि बोलणे | — श्री. मु.ब. निंबाळकर | २१ |
| १३ | श्री साईनाथांचा शरणार्थी (१४) | — श्री. विश्वास खेर | २८ |
| १४ | तानसेनचे गुरु | — | ३१ |
| १५ | महाराष्ट्राचा भारतीय संत | — पूज्य विनोबाजी | ३२ |
| १६ | गुरुपौर्णिमा | — सौ. उषा जोशी | ३८ |
| १७ | खापर्डे यांची शिरडी दैनंदिन | — साईनंद | ३९ |
| १८ | साईभक्त श्री. काकासाहेब दीक्षित | — | ४१ |
| १९ | साईनाथास | — सौ. नीता जाधव | ५३ |
| २० | श्री नामदेवांच्या कथा | — | ५४ |
| २१ | श्री बाबांचा गुरुसंदेश | — श्री. चकोर आजगावकर | ५७ |
| २२ | सद्‌गुरु महिमा | — श्री. अरविंद बारटक्के | ५९ |
| २३ | साई शिल्पकार | — श्री. प्रमोद रायसोनी | ६२ |
| २४ | जा शिरडीला जा | — डॉ. एम.जी. दिक्षित | ६३ |
| २५ | नियम श्रद्धेचे - शिर्डी दर्शनाचे | — श्री. भालचंद्र गंद्रे | ६३ |
| २६ | शिरडी वृत्त | — | ६४ |

# गुरु गौरव

## संपादकीय



ब्रम्हानंदम् परमसुखदं केवलं ज्ञानमूर्ति।
द्वन्दवातीतं गगन सदृशं तत्वमस्यादि लक्ष्यम ।।
एकं नित्यं विमलमचलं सर्वधी साक्षीभूतं।
भावातीतं त्रिगुणरहितं सद्गुरुं तं तमामि ।।

प्राचीन काळी आध्यात्मिक मार्गदर्शनासाठी आलेले साधक आपल्या गुरुजनांना आदर व्यक्त करताना हा श्लोक स्पष्टपणे म्हणत असत. या उद्धृत केलेल्या श्लोकात सद्गुरुच्या सर्व लक्षणांचे निवेदन केलेले आहे.

**ब्रम्हानंद** म्हणजे गुरू हे ब्रम्हानंदाचे प्रतिक आहे. कारण ते त्या आनंदात विलीन झालेला आहे की जे मूळ ब्रम्ह हेच आहे. ते काही कोठे बाहेरून आणलेले, कोठून मिळालेले किंवा मिळविलेले असे नाही. त्याचे वास्तव्य प्रत्येक व्यक्तीच्या अंतःकरणात सदैव असते. हे जग, हे विश्व, प्रत्येक कण हाच मूळात आनंदमय आहे पण त्यातच, त्याचे सर्व त्याचाच आणि त्याचे करिताच असून सुद्धा मानवाला मात्र मी म्हणजेच ते ब्रम्ह (अहं ब्रम्हास्मि) या वस्तूस्थितीची जाणीव केवळ अज्ञानामुळे नसते. याचे कारण तो या जाणीवेच्या अभावी अंधःकारातच असतो. त्यामुळे त्याची दिशाभूल होते व तो या मार्गापासून दूर जातो.

**परमसुखदं** गुरु हा सर्वोच्च आनंद देतो. हा आनंद कोणत्या प्रकारचा असतो? हा शारीरिक सौख्याचा असतो की मानसिक समचित्ताचा? बौद्धिक संवेदनेचा की इंद्रिय संवेदनाचा? नाही. ही आनंदावस्था शब्दातीत आणि निरुपम असल्यामुळे ऋषी-मुनींनी तिचे वर्णन फक्त 'नेति नेति' असे सांगून केलेले आहे. खरेतर एरवी कल्पकतेचे पंख लावून भराऱ्या मारणाऱ्या मानवी मनाच्याही झेपेच्या तो पलीकडचा असतो. वैश्विक तेजस्वितेचा अंश असा जो आत्मा त्यातच या सर्वोच्च आनंदाचा उगम वा झरा असतो. तेव्हा स्वतःचे आणि प्रत्येकाचेच ठायी जो या आत्म्याच्या अस्तित्वाचे भान ठेवतो त्यालाच सद्गुरु म्हणावयाचे.

**केवलम** काल आणि स्थळ यांच्या मर्यादेच्या पलीकडे असणारा जो गुरू हा पवित्र चैतन्यमूर्तीच आहे. जागृत आहे, त्याची जाणीव ही सर्व व्यापी आहे याचा अर्थच तो परमेश्वरच आहे. तोच एक सद्गुरु आहे.

**ज्ञानमूर्तिम्** ज्ञान म्हणजे काय? "अद्वैत दर्शनम् ज्ञानम्" परब्रम्हात एकरूप होणे याचाच अर्थ परम ज्ञानप्राप्ती. या अद्वैतावस्थेत मानव विलीन झाला म्हणजे ज्ञानाचाही अंत झालेला असतो. कारण "मला ज्ञान झालेले आहे असे म्हणण्यासाठी व्यक्ती उरलेली नसते. सद्गुरु तर त्याच ज्ञानाचे प्रतीक होय, त्या अद्वैतावस्थेचा सतत अनुभव मिळत असलेली व्यक्ती. ज्यांना गुरू म्हणून सर्वसाधारण मानले जाते ते तर मार्गदर्शक फलकाप्रमाणे दीपस्तंभाप्रमाणे असतात. त्यांचा प्रवास संपूर्ण झालेला नसतो आणि त्यांना

ध्येय गाठावयाचे असते पण 'ज्ञानमूर्ति' मात्र सदैव आपले बरोबरच असतो. तो मार्गावर तुमच्या पुढे असतोच व तो मार्ग निष्कंटक करतो. अगदी आपण त्याचे मधे विलीन होईतोपर्यंत.

**द्वंद्वातीतम्** सद्‌गुरू हा अटळ अशा द्वैतांना सुख आणि दुःख लाभ आणि हानी. स्तुती आणि निंदा इत्यादींना सामोरे जाऊनही स्थित प्रज्ञ असतो.

**गगन सदृशम्** पंचमहाभूतांपैकी पृथ्वी, आग, तेज, वायू या चार महाभूतात कितीही बदल होत राहिला तरी आकाश हे पाचवे महाभूत आहे. ज्याप्रमाणे वरील चारांना सतत अविचल अवस्थेत आकाश हे आधार देत असते; त्याच प्रमाणे हा सद्‌गुरू विविध तऱ्हेच्या घटना आणि प्रसंगांमध्ये अविचल स्थितीत आधारस्तंभाप्रमाणे वावरत असतो.

**तत्वमस्यादिलक्ष्यम्** तत्-त्वम असि, अयम, आत्मा, ब्रम्हा, अहम्, ब्रम्हास्मि, प्रज्ञानम्. ब्रम्हा ही वेदामध्ये विशद केलेली चार महत्वाची सिद्धान्त तत्वे पुरस्कृत करणारा आणि अनुभवणारा.

**एकम्** जागृती स्वप्न आणि सुषुप्ती या तीनही अवस्थामध्ये असताना हे अनेक अनुभवातून जात आहे किंवा त्याला अनुभव मिळत नाहीत आहेत असे जरी इतरांना भासले तरी त्याच्या निश्चल मनस्थितीत कोणताच फरक न पडता हा गुरू त्या अद्वैत स्थितीत संपूर्णपणे स्थिर उभा असतो.

**नित्यम** अनंत आणि कालातीत असा हा सद्‌गुरु नित्य पवित्र, जागृत आणि प्रसन्न असतो.

**विमलम्** निष्कलंक ज्याचे पावित्र्य कशानेही कलंकीत होऊ शकत नाही असे. गुरू हा इच्छा व वासनांच्याही पलीकडे असतो तो अगदी पूर्ण असतो.

**सर्वधी** सर्वव्यापी, चैतन्यदायी, बुद्धीमत्ता ही गुरूची बौद्धिक लक्षणे होत.

**सर्वसाक्षी** परमेश्वराचे दुसरे नाव म्हणजे सद्‌गुरू. त्याच्या पूर्णत्वात प्रायः कोणतेही परिवर्तन होत नाही. मग तो कोणत्याही आकारात असो. ज्याप्रमाणे एखाद्या चित्रपटाची फिल्म प्रतिसेकंद सोळाचित्रे रूपेरी पडद्यावर उमटवत असते. प्रत्येक चित्रातील दृश्य क्षणिक आणि बनावट असते. म्हणजेच क्षणाक्षणाला बदलणारे असते. पण ज्या पडद्यावर ती दृश्ये दिसतात तो पडदा नित्य म्हणजे अविचल असतो.

**साक्षी भूतम्** प्रत्येक वस्तूचे, प्रत्येक ठिकाणी जे साक्षी असते ते. उदाहरणार्थ रवि हा चैतन्य देतो पण तो सर्व कर्मांचा साक्षी असतो त्याप्रमाणे.

**भावातीतम्** तो विविध स्वरुपाचे अंतःस्फुरण, मनक्षोभ भावना आणि मनातील कल्पना यांच्या पलीकडे पोचलेला असतो.

**त्रिगुणरहितम** सजीव प्राणी सृष्टीमध्ये तीन प्रकारचे गुण असतात. सत्व (पवित्रता), रज (कार्यरतता), तम (मंद्यत्व) त्यांचे पलीकडे असणारा म्हणजे गुणातीत. या त्रिगुणांनी बद्ध असलेला, झालेला म्हणजे मानव पण त्याचेही मर्यादेच्या बाहेर असलेला म्हणजे दैवी.

**सद्‌गुरूम्** योग्य तो गुरू. **तम-** त्याला, **नमामि-** त्याला मी आदरपूर्वक वंदन करतो. असा या प्रसिद्ध श्लोकाचा अर्थ आहे.

जे गुरू आदरणीय आहेत त्यांचे ठिकाणी वर वर्णिलेले सर्व गुण वास करीत असणे अवश्य आहे. जे काही गुरू साधकांना लाभलेले आहेत ते स्वतःच धुक्यामध्ये वाटचाल

करीत आहेत आणि त्यांची श्रद्धाही डळमळीत अशी आहे. खऱ्या खुऱ्या गुरूने माया आणि अहंभाव यांचे पलीकडे गेले पाहिजे. वासना आणि गरजा यातून तो मुक्त व्हावयास हवा. एखादी व्यक्ती स्वार्थ बुद्धी बाळगून आणि फलप्राप्तीवर लक्ष केंद्रीत करून असेल तर अशा व्यक्तीचा गुरू म्हणून स्वीकार करता येणार नाही.

गुरुर्ब्रह्मा गुरुर्विष्णू गुरुर्देवो महेश्वरः ।
गुरूस्साक्षात् परब्रह्म तस्मै श्रीगुरुवे नमः ।।

गुरुविषयक या महत्वपूर्ण श्लोकात परमतत्वाची तीन भागात विभागणी करून एकेकाकडे उत्पत्ती, स्थिती, आणि लय अशी तीन कार्ये सोपविली आहेत असा भास निर्माण होतो. या त्रिमूर्तीचा एक आविष्कार ओंकाराच्या प्रणवाक्षराचे मंत्रात आहे. अ.अु.म. यांचे संधीतून 'ओम' हा शब्द तयार होतो अ.अु.म. ही अक्षरे ब्रम्हा, विष्णू आणि महेश यांची प्रतिके असून त्या सर्वांना या प्रणवात जागा आहे. ज्या श्लोकांमध्ये या त्रिमूर्तीचा गौरव होतो त्या श्लोकामुळे प्रश्न निर्माण होतो तो असा की गुरू म्हणजेच परमेश्वर किंवा परमेश्वर म्हणजेच गुरू. यापैकी नेमके कोणते? याचे उत्तर असे की, परमेश्वर हाच गुरू होय. तो सर्वव्यापी आहे. तो सदाकृपाळू आहे आणि तो सर्वसाक्षी आहे. त्याचाच आपल्या अंतःकरणात वास आहे.

## । पाहिल साई जन्मभरी तुला ।

एकदा येउन जा शिरडीला ।
पाहिल साई जन्मभरी तुला ।। ध्रु ।।

अखिल जगा क्षणी विसरशील
आरती सोहळा भान हरपेल ।।
रमशील ठायी चित्त प्रवृत्तीला ।
पाहिल साई जन्मभरी तुला ।। १ ।।

टळतील दोष जन्मोजन्मीचे ।
साईनिनाद कर चतुर्वाचे ।।
पावशील साईस्वरूपानंदाला ।
पाहिल साई जन्मभरी तुला ।। २ ।।

वैभव-विरक्ती त्यांचे चरणी ।
मिळवी त्यांचे प्रसादांनी ।
अनुसर श्रद्धा अन सबुरीला ।
पाहिल साई जन्मभरी तुला ।। ३ ।।

— बाळासाहेब शांताराम नाडकर्णी
सी/१४११ लक्ष्मीपूरी कोल्हापूर

# भारताचा ज्ञानदीप
## भगवान व्यासमहर्षि

भगवान व्यास महर्षि म्हणजे भारतीय संस्कृतीत गुरुस्थान प्राप्त झालेली महान विभूती आहे. त्यांनी जे अलौकिक कार्य केले, त्याला जगात तोड नाही, म्हणून त्यांच्या बाबतीत 'व्यासोच्छिष्टं जगत् त्रयं' असे म्हटले जाते.

व्यासांच्या आईचे नाव मत्स्यगंधा (सत्यवती) असे होते. ही आद्रिका नावाच्या कोळ्याला सापडली. खरे बोलणारी म्हणून नाव सत्यवती पडले. ती अत्यंत सुंदर असून लग्नाला योग्य अशी झाली होती. पण तिच्या अंगाला माशांची दुर्गंधी येई. त्यामुळे लग्न करण्याची तिला लाज वाटे.

एकदा ती समुद्रात होडी चालवीत असता पाऊस सुरु झाला. इतक्यात पराशर ऋषींची हाक तिच्या कानावर आली. ते तिच्या नावेत बसले. तिने आपली सर्व हकीगत त्यांना सांगितल्यावर त्यांनी तिचा दुर्गंध नाहिसा करून सुगंधाची खैरात केली. याचवेळी व्यासांचा जन्म झाला. यमुनेच्या तीरावर मच्छोदरी नावाचा घाट आहे. हे व्यासांचे जन्मस्थान. तू स्मरण करशील तेव्हा मी तुला भेटेन असे सांगून व्यास तेथून तपश्चर्येसाठी निघून गेले. हा दिवस आषाढ पौर्णिमेचा होता. यालाच व्यास पौर्णिमा किंवा गुरुपौर्णिमा असे म्हणतात.

व्यास तपासाठी हिमालयात गेले. जातुकर्ण्य ऋषींचे शिष्यत्व त्यांनी स्वीकारले. आणखीही काही ऋषींकडून त्यांनी ज्ञान मिळविले. आठव्या वर्षी उपनयन झाले. त्यांनी चौदा विद्या व चौसष्ट कलांचे अध्ययन केले. चारही वेद मुखोद्गत केले. विसाव्या वर्षी तीर्थयात्रेस निघाले. सर्व प्रवास पायी केला. अनेक लहानमोठी राज्ये पाहिली. नाना प्रकारची माणसे अवलोकन केली. अनेक ठिकाणी त्यांनी गृहकलह पाहिले. त्यामुळे त्यांचे मन उद्विग्न झाले. मनाला शांती मिळेना तेव्हा हिमालयाजवळ त्यांनी शम्याप्रास नावाचा आश्रम काढून शिष्यशाखा तयार केली. त्यांनी जाबाली ऋषींच्या 'वटिका' नावाच्या कन्येशी विवाह केला. या गृहस्थाश्रमातून शुक्राचार्यांचा जन्म झाला. ते साक्षात् वैराग्याचा अवतारच होते.

एकदा व्यास सरस्वती नदीच्या तीरावर बसले असता विचार करू लागले. आर्यांच्या आर्यत्वाचे रक्षण करण्यासाठी आपण काहीतरी करावे, लिहावे असे त्यांना वाटू लागले. त्यांची प्रतिमा पल्लवित झाली. कल्पनाशक्तीने उड्डाण केले. हीच काव्यातील संजीवनी विद्या. ही निराकाराला साकार करते. अंधाराला प्रकाशमान करते, स्थूल-सूक्ष्मांची अदलाबदल करते तर काळातील फरक नाहीसा करते. अंधारात दिव्य प्रभा प्रकट करणारी ही प्रतिभा काय करील ते सांगता येत नाही.

त्यांनी प्रथम वेदराशीतून ऋग्वेद, यजुर्वेद, सामदेव व अथर्ववेद असे चार स्वतंत्र विभाग केले व त्यांचे अध्ययन करण्यासाठी चार शिष्यांची नेमणूक केली. पैल, वैशंपायन, जैमिनी व सुमंत् अशी त्यांची नावे होती. इतिहास-पुराणरूपी पाचवा वेदही

निर्माण केला. वेदपठण सतत टिकून राहून यज्ञामध्ये वेदाचा केला जाणारा उपयोग हा व्यवस्थितपणे केला जावा म्हणून त्यांनी हे प्रचंड कार्य केले. हे सामान्य प्रकारची बुद्धी असणाऱ्याचे काम नाही. प्राचीन कालापासून वेदामध्ये कानामात्रेचाही फरक होऊ नये म्हणून ते मुखोद्‌गत केले जात असत. ह्या त्यांच्या महत्त्वपूर्ण कामगिरीमुळे त्यांना वेदव्यास नाव प्राप्त झाले.

त्यांना उपनिषद्‌प्रणित कर्म, भक्ती व ज्ञान या समुच्चयात्मक तत्त्वज्ञानाचा प्रसार करावयाचा होता. कर्ममार्गाचा प्रसार करण्यासाठी त्यांनी आपल्या जैमिनी नामक शिष्याची नेमणूक केली. ह्यानंतर ज्ञान-भक्तीसाठी त्यांनी ब्रह्मसूत्रांची रचना केली. या सूत्रांद्वारे त्यांनी उपनिषद्‌प्रणित तत्त्वज्ञानाची स्थापना केली. ब्रह्मसूत्रे, गीता या दोन ग्रंथांचा उपनिषदांबरोबर प्रस्थानत्रयीत समावेश होऊन त्यावर भाष्य करणारास आचार्य पदवी प्राप्त होत असे. अशा ह्या उच्चतम तत्त्वज्ञानाच्या प्रसारासाठीच व्यासांचा अवतार होता. त्यापूर्वीची परिस्थिती कशी होती ह्यांचे मार्मिक विवेचन पुराणात केले आहे.

प्रस्थानत्रयीनंतर व्यासांनी पुराणरचना केली. सरस्वती नदीच्या तीरावर 'शम्याप्रास' आश्रमात त्यांनी हे कार्य केले. स्त्रिया, शूद्र व सामान्य लोकांसाठी त्यांनी पुराणे रचली. पूर्वकालीन परंपरा सांगणाऱ्या ग्रंथास पुराण म्हटले जाते. वेदविभाग व ब्रह्मसूत्रे यांचे यथार्थ ज्ञान होण्यासाठी त्यांनी पुराणांची निर्मिती केली. इतिहास कथन व्हावे हाही पुराणे लिहिण्याचा त्यांचा विचार होता. 'पूर्व रम्य ज्यांचे त्यांना रम्य भावि काल' या उक्तीप्रमाणे पुढील पिढीला मार्गदर्शन व्हावे हाही पुराणांचा हेतु आहे. आपला शिष्य सूत याच्याकडून पुराणांचा प्रसार केला. एकूण अठरा पुराणे व अठरा उपपुराणे आहेत. याप्रमाणे पुराणरचना करून सामान्यजनांना ज्ञानाची द्वारे वेदव्यासांनी खुली केली.

यानंतर श्रीमहाभारत ग्रंथांची रचना झाली. यावेळी विचारांची त्यांच्या डोक्यात एवढी गर्दी होती त्यामुळे हातातील लेखणी अपुरी पडू लागली. ते चिंताक्रांत झाले. तेव्हा साक्षात् श्रीगणेशांनी हे काम पत्करले. पण गणेशाची एक अट होती की, मी लिहिताना थांबणार नाही. तेव्हा व्यासांनी सांगितले की, श्लोकाचा नाद, अर्थ व सुचकता हे ध्यानात येईपर्यंत थांबावे व मग लिहावे. श्रीगणेश 'तथास्तु' म्हणून लेखन करू लागले व महाभारत जन्मले. यात अनेक कूट श्लोक आहेत. हे गूढार्थाने युक्त आहे. ग्रंथकार अतिशय श्रेष्ठ प्रतिभाशाली तसेच ग्रंथलेखक प्रत्यक्ष गणपतीच. तेव्हा अशा दिव्य ग्रंथाला अभूतपूर्व महत्त्व प्राप्त झाले तर त्यात आश्चर्य ते काय? सतत तीनवर्षे प्रयत्न करून त्यांनी हा ग्रंथ तयार केला. भारतवासियांवर हे त्यांचे अनंत उपकार आहेत. मूळ ग्रंथ जय नंतर त्यात भर घालून भारत नाव मिळाले. नंतर त्यांनी यात इतिहास, सामाजिक धर्म, राजधर्म, स्त्रीधर्म, दानधर्म व मोक्षधर्म याचा उहापोह केला आहे. आदर्श इतिहासकार कसा असावा याचे प्रात्याक्षिकच भारत व पुराणे यांच्याद्वारे भावी इतिहासकारापुढे ठेवले आहे. जेथे धर्माला अनुसरून प्रयत्न केला जातो तेथे जय हा ठेवलेलाच असतो हे महाभारताचे महावाक्य आहे.

वेदव्यासांनी नुसते ग्रंथरचनेचेच कार्य केले असे नसून त्या त्यावेळी समाजास-व्यक्तीस मार्गदर्शनही केले आहे. कौरव-पांडवांना त्यांनी वेळोवेळी सल्ला देण्याचे काम केले. तो पांडवानी मानला पण कौरवांनी तो कधीच मानला नाही.

व्यासांचे विशेष :-

१) व्यासांपासून शंकराचार्यांनी गुरुपरंपरा सुरु केली.

२) भारतीय संस्कृतीचे महाप्राण व्यास होते.

३) व्यासचर्या :- व्यासरचित व संपादित ग्रंथांना व्यासचर्या म्हणतात.

४) व्यासप्रणित धर्म :- लोकांना सुखी, समृद्ध नीतिप्रवण व पुरुषार्थी बनवतो तो धर्म व्यास मानीत.

५) मानवता :- व्यासांनी मानवतेला जास्त महत्व दिले.

६) भारतातील नव्हे जगातील थोर व्यक्ती म्हणजेच व्यास.

७) जगाचे एकीकरण वाङ्मयामार्फत होण्यासाठी भगीरथ प्रयत्न केले.

८) संस्था स्थापून कुलपती बनले.

अशा ह्या आपल्या थोर महापुरुषाचे स्मरण आपण आषाढ पौर्णिमेस करू या, आणि त्यांच्या चरित्रातील काही पैलू आपल्यात आणण्याचा संकल्प ह्या शुभदिनी योजू या.

नमोऽस्तुते व्यास विशालबुद्धे।
फुल्लारविन्दायत पत्रनेत्र ॥
येनत्वया भारततैल पूर्णः।
प्रज्वालितो ज्ञानमयः प्रदीपः ॥

# व्यास पौर्णिमा : आषाढ पौर्णिमा : गुरू पौर्णिमा

व्यासपौर्णिमा हा पौर्णिमेचा दिवस व्यासमुनींच्या स्मृतीप्रित्यर्थ त्यांचा स्मरणदिन म्हणून पाळला जातो. हिंदु पंचांगामध्ये चार पौर्णिमा परम पवित्र मानलेल्या आहेत. त्या म्हणजे १) वैशाख पौर्णिमा - बुद्ध पौर्णिमा, २) आषाढ पौर्णिमा- व्यास पौर्णिमा, ३) श्रावण पौर्णिमा- नारळी पौर्णिमा, ४) माघ पौर्णिमा- विश्वकर्मा जयंती.

हा महिना आषाढाचा आहे. या महिन्यातील यादिवशी मनाचा कारक जो चंद्र हा पौर्णिमेचा, पूर्ण वर्तुळाकार असून त्याचा प्रकाश शीतल, प्रसन्न आणि स्वच्छ असतो. व्यासमुनींनी आपली अमर साहित्यकृती असा जो ग्रंथ ब्रम्हसूत्रे तो त्यांनी याच दिनी पुरा केला. सूत्र म्हणजे दोरी. या ग्रंथामधून व्यासमुनींनी विशद केले आहे की, सर्वव्यापी ब्रह्मतत्व विविध नामरुपाचे अंतरंगात प्रवेश करते आणि त्या वरवर निरनिराळ्या वाटणाऱ्या सर्व नामरुपांना एकत्रित करून ठेवते. हे तत्व सदैव पूर्ण रहाते, कमी अधिक होत नाही. ढग जरी त्यावरून वहात गेले तरी या सर्व व्यापी तत्वाला बाधा येत नाही. व्यासगुरुंनी मानव जातीला हेच शिकविले आहे.

ज्याप्रमाणे परमेश्वर मानव योनीत वास करतो त्याप्रमाणे माणूसही परमेश्वरी रूप घेऊ शकतो. तो परमेश्वरालाही मानव होण्यासाठी अत्यंत कळकळीची प्रार्थना करून त्यांचे मन वळवितो. प्रल्हादाच्या प्रार्थनेमुळे नृसिंह अवतार झाला. प्रार्थना आणि अवतार हे परस्पर पूरकच आहेत. त्याला विद्युत शास्त्रातील ऋण व धन विद्युत कणांची उपमा द्यावी लागेल. दुःख आणि आनंद, वेदना आणि सुख हे परमेश्वरी संकेतानुसार शुक्ल पक्ष आणि कृष्ण पक्ष याप्रमाणे एकामागून एक असे ठरल्याप्रमाणे येतात. त्यामुळे समचित्तभाव वाढीला लागतो. सरते शेवटी या द्वंद्वाच्या पलीकडे असलेले सत्यस्वरूप जे आहे त्याकडे मानवाला नेणे हा त्या संकेताचा उद्देश असतो.

# श्री सद्गुरु साईबाबा

— सौ. लिना आनंद भांगले
१/B ६८ पिरामल नगर गोरेगांव (प.)
मुंबई ४०० ०६२

मी या तीन महिन्यापासून श्री बाबांची भक्त झाले आहे. कोणतेही छोटे मोठे संकट आले की मी श्री बाबांना हाक मारते आणि ते संकट निवारण करतात.

साधारण महिन्यापूर्वी माझे पती खूप आजारी झाले आता ते पूर्ण बरे झाले आहेत. एकाएकीच त्यांना ताप आला. सर्दी खोकला काहीच नव्हते डोके तर भयंकर दुखू लागले. नेहमी त्यांचे डोके दुखते पण ही डोकेदुखी काही वेगळीच. एकदा हा अर्धा भाग दुखायचा थोड्यावेळाने तो अर्धा मध्येच दुखू लागायचे. सतत डोकं दाबत बसे मी. त्यांना सहन होत नव्हतं माझा पण धीर सुटू लागायचा. मग मी श्री बाबांचा धावा करायची. बरं सावकाश झाले तरी चालतील पण सहनशक्ती द्या बाबा मी म्हणायची. त्यातच छातीत कळ यायची. ताप २-३ पर्यंत चढायचा. डोक्याला अंगाला हात लावायला व्हायचा नाही चटका बसायचा. मध्येच गुडघ्यात कळ यायची पाठ पण दुखायची. हे सर्वच प्रहार त्यांच्या सहनशक्ती पलीकडचे होते. मी तर अगदी घाबरून गेले सारखी श्री बाबांचा जप करायची. त्याना विभूती लावायची. औषधाबरोबरच श्री बाबांची उदी पाण्यात घालून प्यायला द्यायची.

चार दिवसांनी डॉ.नी तपासून क्ष किरण फोटो काढावयास सांगितला. आणखी घाबरलो आम्ही. पण श्री बाबांची कृपा असल्यावर काळजी कसली! मी तर सर्वभार श्री बाबांवर सोपविला आणि धीर देत राहीले स्वतःला नि ह्याना! त्यांच्याच कृपेमुळे क्ष किरण दाखला ठीक आला आणि मूत्रचिकित्सा मध्ये मात्र टायफाईड म्हणून कळले.

पण आश्चर्य असे की ताप अजिबात नॉर्मलपर्यंत येऊन थांबलाच अगदी! होता तो फक्त अशक्तपणा आता त्यांची तब्येत सुधारत आहे.

एकदा तर त्यांनी (औषधाना) कंटाळून औषध घेणार नाही म्हणून सांगितले. औषध देणार असलीस तर तू समोरच येऊ नकोस असे बजावले. जापरे! बरं म्हणून मी आत गेले. श्री बाबांना नमस्कार केला व तुम्हीच त्यांना चांगली बुद्धी द्या म्हटले आणि थोड्या वेळाने त्यांना औषध नेऊन दिले तर काय आश्चर्य! तर अगदी शांतपणे त्यांनी औषध घेतले. थोड्यापूर्वी चिडलेले, वैतागलेले, संतापलेले ते हेच का? माझ्या डोळ्यात आनंदाश्रू आले. किती छोट्या गोष्टीत पण श्री बाबा धांवून येतात हे कळले.

हे आजारी असतानाच माझी छोटी मुलगी चि. प्रिती तापाने आजारी झाली. तिला तर डॉक्टरनी १ च्या वर ताप जाऊ द्यायचा नाही असं सांगीतलय. त्यामुळे तिला ताप आला की मला काळजी वाटते. ह्याना ३ पर्यंत ताप त्याचवेळी हिला २ पर्यंत ताप चढला काही सुचेना? झाले त्याना बघू कि हिला सांभाळू घरात मोठी माणसं आहेत तरी मुलीकडे आईच मन, एकीकडे बायकोच मन. घाबरून गेले होते मी पण या संकटातून देखील श्री बाबांनी सुटका केली. चि. प्रीतीचा ताप बरा होऊन ती बरी झाली.

आज श्रीगुरुपौर्णिमा आहे म्हणून मी हे लिहावयास बसले. ते सर्वांचे गुरु आहेत. मला तर ते अगदी घरातल्या वडीलधाऱ्या माणसाइतके जवळचे वाटतात. कोणतीही गोष्ट श्री बाबांवर सोपवून मी निर्धास्त रहते. श्री बाबाच त्यातून योग्य मार्ग दाखवतात. तशी बुद्धी देतात आणि काय लिहू?

प्रत्येकाने आपल्या श्रीगुरुंच्या ठिकाणी अढळ निष्ठा ठेवून सबुरी धरल्यास जीवन सुखी व सफल होईल यात काय संशय?

# गुरु महात्म्य

— श्री. चंद्रकांत श्रीराम गरगटे
३९९, गुरुवार पेठ,
सातारा - ४१५००२

गुरुर्ब्रम्हः गुरुर्विष्णु गुरुर्देवो महेश्वरः ।
गुरु साक्षात् परब्रम्ह तस्मै श्री गुरुवे नमः ।।

अर्थ :— ब्रह्म हा आमचा गुरू आहे, विष्णु हा आमचा गुरू आहे आणि महेश्वर हा देखील आमचा गुरू आहे.

ब्रह्म हा निर्माता आहे, विष्णु हा तारणारा आहे तर महेश्वर हा काल आणि परमानंदाचे प्रतिक आहे. तेव्हा गुरू म्हणजेच साक्षात् परमेश्वरच आहेत. त्यांना माझा नमस्कार असो.

भारतीय संस्कृतीमध्ये गुरूला अनन्यसाधारण असे महत्व आहे. गुरू हा ब्रह्मनिष्ठ, दयेचा सागर, केवळ लोकांच्या कल्याणासाठीच झटणारा, पैशासाठी-कीर्तीसाठी अगर कोणत्याही हेतूसाठी आपल्या ज्ञानाचा विक्रय न करणारा असाच असतो.

अशा गुरूंची सुदैवाने गाठ पडली तरी एखादा पुरूष जसा वडीलांनाच सर्वस्व मानतो त्याप्रमाणे गुरू म्हणजे आपले सर्वस्व, गुरूवाचून अन्य दैवत नाही असे शिष्याचे ठाम मत होते. गुरूच्या ठिकाणी शिष्याचे प्रेम परिपूर्ण केंद्रीत झाल्याशिवाय गुरूकृपा होत नाही.

कोकिळेच्या आवाजात जरी माधुर्य असले तरी तिचा कंठ फुटण्यास जसा वसंत ऋतुच यावा लागतो. त्याप्रमाणे मनुष्याजवळ ज्ञान जरी उपजत असले तरी ते फलद्रुप होण्यासाठी त्याला सद्गुरूंच्या मार्गदर्शनाने आपले जीवन सुखरूप होऊ शकेल यामध्ये तिळमात्र शंका नाही.

खरा मार्ग आजपर्यंत सद्गुरुशिवाय कोणालाही मिळालेला नाही व पुढे मिळणार नाही. जीवनात सुखी होण्याकरिता सद्गुरूंनी सुचविलेली साधना (भक्ती) प्रथम केली पाहिजे.

लोखंड जसे परिसाच्या स्पर्शाने सुवर्ण बनते त्याप्रमाणे सद्गुरूंच्या आशिर्वादाने शिष्य कृतार्थ होतो.

परमेश्वराविषयी जो ज्ञान शिकवितो तोच खऱ्या अर्थाने गुरू शोभतो खरे गुरू तेच की, जे जीवनाचे खरे उद्देश कोणते आणि ते कसे साध्य करावे याचे मार्गदर्शन करतात त्याचप्रमाणे अज्ञानाचा अंधःकार नाहीसा करतात.

गुरूच्या ठिकाणी षड्संपत्ती दिसून येतात त्या खालीलप्रमाणे-

१) शम - मनाची समतोलवृत्ती,
२) दम - इंद्रीये ताब्यात ठेवणे,
३) उपरती - विषय वासनांचा त्याग,
४) तितिक्षा - सर्व प्रकारचे दुःख सहन करण्याची शक्ती,
५) श्रद्धा - गुरू व शास्त्रे यावरील दृढ विश्वास,
६) समाधान - मनःशांती.

सद्गुरू कार्य खालीलप्रमाणे-

१) जगातील दुःखी आणि व्याकूळ लोकांना शांती प्राप्त करून देणे,
२) दीन दुःखी लोकांचे सांत्वन करून त्यांना आशेचा किरण दाखविणे,
३) भवसागरात बुडणाऱ्या लोकांना सुखरूप किनाऱ्यावर नेऊन सोडणे,
४) दीन दुबळ्यांना आश्रय देऊन त्यांचे दुःख दूर करणे,
५) धर्माची संस्थापना करणे,
६) सर्वधर्मसमभाव प्रस्थापित करणे.

या सर्वांवरून हेच दिसून येते की, जीवनात गुरु असणे अतिशय महत्वाचे आहे. गुरूशिवाय जीवन व्यर्थ आहे. त्याकरिता गुरूठायी (चरणी) अनन्यश्रद्धा ठेवून गुरूस्तोत्र म्हणणे महत्वाचे आहे.

## गुरू स्तोत्र (आराधना)

गुरू हा संत कुळीचा राजा
गुरू हा प्राण विसावा माझा।
गुरू विन देव दुजा
पाहता नाही त्रिलोकी।।

गुरु हा सुखाचा सागर
गुरू हा प्रेमाचा आगर।
गुरू हा धैर्याचा डोंगर
कदा काळी डळमळेना।।

गुरू हे वैराग्याचे मूळ
गुरू हा परब्रह्म केवळ।
गुरू सोडवी तात्काळ
गांठ लिंग देहाची।।

गुरू हा कामधेनू गाय
गुरू हा भक्तांलागी माय।
भक्तां घरी दुभतसे।।

गुरू घाली ज्ञानार्जन
गुरू दाखवी निजधन।
गुरू सौभाग्य देऊन
साधु बोध नांदवी।।

गुरू मुक्तीचे मंडन
गुरू हे दुष्टांचे दंडन।
गुरू पापांचे घडन
नाना परि करितसे।।

काय कशी गुरू उपदेशी
तारक मंत्र दिला आम्हांसी।
बाप रखुमा देवी वरासी
ध्यान मानसी लागले।।

।। ओम् नमः तत्सत् ।।

# "मग आलिंगिला पूर्णिमा"

**श्री. नरसिंह केशव दिवेकर**
अजिंक्य हॉस्पिटल बिल्डींग
११, वा. रस्ता, खार,
मुंबई - ५२.

'पूर्णत्व' हे जीवनाचं अंतिम ध्येय आहे. मनुष्य जन्माला आल्यापासून अपूर्णत्वांतून पूर्णत्वाकडे प्रवासी असतो. मानवी जीवनाचं रूपांतर भक्ती जीवनात करून परिपूर्णतेकडे जाणारा मार्ग प्रकाशमान करून, जीवनयात्रा सफल करण्याचं महान कार्य सद्‌गुरु करतात.

ईश्वरनिष्ठ सद्‌गुरु हे पूर्णत्वाला गेलेले, मानवाचा आकार धारण केलेले, प्रत्यक्ष परब्रह्म स्वरूप असतात. जन्मजन्मांतरीच्या पुण्याईमुळे जीवनात असा एक परमभाग्याचा महन्मंगल क्षण येतो की त्या क्षणी सद्‌गुरुची कृपादृष्टि त्या भाग्यवंताच्या हृदयात प्रेमभाव उत्पन्न करते. ही प्रेमभावना उत्तरोत्तर वृद्धिंगत होत जाते व सद्‌गुरु त्याचं भक्तपण स्वीकारतात, आणि अलौकिक असं एक नातं त्यांच्यांत निर्माण होतं.

जगामध्ये मातृप्रेम हेच निरपेक्ष व विश्वसनीय अशा प्रेमाचं एकमेव दर्शन आहे. सद्‌गुरु आणि भक्त यांच्यात याच नात्याचा संभव होतो, आणि सद्‌गुरु आपल्या भक्तावर

प्रेमाचा, करूणेचा, वात्सल्याचा वर्षाव करतात. एवढेच नव्हे तर त्याला अतिशय सामर्थ्यशाली अशी आधारशक्ती प्रदान करतात.

गुरु वर्षकाळीचे धन।
आवडी वर्षती स्वानंदजीवन।।

— श्रीसाईसच्चरित

श्रीगुरु हे स्वतः आनंदस्वरूप असल्यामुळे अपार्थिव व इंद्रियातीत अशा स्वानंदाचा परिचय भक्ताला करून देतात.

सद्गुरु चरणांच्या ठिकाणी दृढ श्रद्धेने, विवेक वैराग्ययुक्त अंतःकरणाने सर्वस्व समर्पणाची तयारी ठेऊन शरणागत वृत्तीने,

'करिष्ये वचनं तव'

असा भाव मनात आणून लीन होणे अत्यंत आवश्यक आहे.. तरच सद्गुरुची कृपा होऊ शकते. सद्गुरुचरणी संपूर्ण समर्पण वृत्ति ठेवणे हाच भक्तीचा प्राण आहे.

वेगवेगळ्या स्थलकाली ईश्वरी योजनेनुसार अवतारी सत्पुरुषांचं, संतांचं, सद्गुरुंचं अवतरण भूतलावर होत असतं. ईश्वराने मानवाला दिलेलं हे मंगल वरदान आहे. ईश्वर, आत्मा आणि सद्गुरु यांच्यात अभेदच असतो.

शिरडीचे श्री साईबाबा हे अक्कलकोटच्या स्वामीमहाराजांप्रमाणे सिद्धावस्थेत अवतरलेले ईश्वरी अवतार होते. साक्षात ईश्वर म्हणजेच साई.

अनन्य 'श्रद्धा' आणि विवेकाधिष्ठित 'सबुरी' हा प्रेमभक्तीचा महान संदेश साईबाबांनी मानवजातीला दिलेला आहे. त्यांच्या चरणांशी संपूर्ण शरणागत होऊन ज्वलंत अशा निष्ठेने प्रत्यक्ष जीवनात या दिव्य बोधानुसार आचरण करण्यात साईबाबांनी 'परमपुरुषार्थ' मानलेला आहे.

गुरुकृपा ही तारकशक्ति असते. अर्थातच ती मारकशक्तिपेक्षा सामर्थ्यशाली असावी लागते. 'कृतांताच्या दाढेतून मी माझ्या भक्ताला बाहेर काढीन' असे आत्मविश्वासपूर्वक उद्गार काढून संकटनिवारणार्थ साईबाबांनी अनेक चमत्कार केले व ईश्वरी शक्तीचं समर्थ दर्शन घडवलं. असं असूनसुद्धा त्याचं श्रेय मात्र त्यांनी स्वतःकडे घेतलेले नाही. ते स्वतः 'अल्ला मालिक' आहे व मी त्याचा 'सेवक' आहे असंच म्हणत असत.

ईश्वरी शक्तीचा सामर्थ्यशाली आविष्कार ज्यांनी केला व ईश्वराच्याच वाणीने जे बोलत होते त्या साईबाबांजवळ एवढा विनम्र भाव असू शकतो पण अशी विनम्र वृत्ति मानवाजवळ मात्र नसावी हे ईश्वराच्या सर्वश्रेष्ठ घटकाचं, म्हणजेच मानवाचं सर्वात मोठं दुर्दैव आहे.

श्रीगुरुंच्या चरणी असलेले निस्सीम प्रेम अहंकार नाहीसा करून, भक्ताचे ठिकाणी अनन्यशरणता निर्माण करते. या शरणागत वृत्तीमध्ये थोडासाही उणेपणा चालत नाही कारण त्या ठिकाणी अहंकाराचं बीज अंकूरले जाते व दुःखाचीच फळे देणारा अहंकाराचा वृक्ष वाढीला लागतो.

'मामेकं शरणं व्रज' या परमात्म्याच्या सनातन हाकेला प्रतिसाद देण्यात मानवजात असमर्थ ठरली आहे. हेच मानवाच्या दारूण दुःखाचं एकमेव कारण आहे.

अनन्यशरण भक्तीचा यथार्थ परिचय न झाल्यामुळे अनेकांची अशी गैरसमजूत झालेली आहे की भक्ती ही माणसाला निष्क्रीय करणारी व कर्मशीलतेपासून दूर नेणारी आहे.

प्रेमभक्तीचा पुरस्कार करणाऱ्या साधुसंतांना ज्ञान आणि कर्म हे भक्तीमध्ये अपेक्षितच आहेत. कारण ज्या परमेश्वराची भक्ती करावयाची तो परमात्माच ज्ञान, कर्म आणि भक्ती या त्रियोगाचं सर्वोत्कृष्ट उदाहरण आहे. सृष्टीतील सर्व घटकांच्याद्वारे अखंड, अविरतपणे, अनंतकाळ चालत असलेली ईश्वराची अपूर्व अद्‌भूत लीला मानवाला क्षणोक्षणी दृष्टोत्पत्तीस पडते आहे. त्यामुळे भक्तीमध्ये निवृत्तीपर व निष्क्रियतेचे विचार संभवतच नाहीत.

भक्ती अत्यंत शक्तीशाली असून जीवाचा परमोत्कर्ष साधण्याची क्षमता भक्तीमध्ये आहे.

अज्ञानाच्या अंधःकारात आणि दुःखाच्या गर्तेत सापडलेल्या मानवाला शांतिसुखाच्या, उच्चतर आध्यात्मिक पातळीवर नेणारा संपूर्ण जीवनात दैवी परिवर्तन घडवून आणणारा असा 'भक्ती' हा एकच मार्ग आहे. हा मार्ग दाखविण्यासाठीच ईश्वरी अवतारांचा संभव होत असतो.

परित्राणाय साधूनां विनाशायच दुष्कृताम्
धर्मसंस्थापनार्थाय संभवामि युगे युगे।

गीता — ४.८

साधुसज्जनांचं रक्षण आणि दुष्टांचं निर्दालन करण्यासाठी ईश्वरी अवतार होत असतो. असे हे दोन वेगवेगळे पक्ष मानून तेवढाच मर्यादित अर्थ न घेता, एकाच व्यक्तीच्या ठिकाणी वसत असलेल्या सत्प्रवृत्तींचं रक्षण करून त्यांची वृद्धी करणं व दुष्ट प्रवृत्तींचं निर्दालन करून त्या जीवाची चित्तशुद्धी करून त्याचा उद्धार करण्याचं कार्य ईश्वरी अवतार करतात अशी दृढ श्रद्धा त्यांचे ठिकाणी ठेऊन निःसंदेह चित्ताने आपला आत्मोद्धार करून घेणे हे भक्ताचं कर्तव्य ठरतं. जीवन कृतार्थ करून घेता येतं व धर्ममय जीवन व्यतीत करता येतं.

त्याचप्रमाणे ईश्वराचे सामर्थ्यशाली अवतार संभवत असताना मानवजात सुखी झालेली, उच्च स्तरावर गेलेली दिसत नाही याचं कारण काय असावं असा प्रश्न पडतो.

अल्पशक्ती व अल्पबुध्दीच्या अहंकारामुळे, भोगप्रवण, संशयी, संकुचित मनोवृत्तीमुळे व अज्ञानामुळें बहुतांश जीवांना ईश्वरी अवताराची ओळखच पटत नाही. तसेच अवतारी पुरुषाची यथार्थाने भेट होण्याचं भाग्यही सर्वांना लाभत नाही, आणि तसा योग जरी आला तरी सद्‌गुरुबोधावर दृढ निष्ठा ठेऊन आपला उद्धार करून घेण्याची संधी सर्वांना घेता येत नाही.

एखाद्या भाग्यवंताला मात्र ईश्वर हाच जीवनाचा एकमेव आधार आहे, शाश्वत सांगाति आहे याची यथार्थाने जाण येते व निःसंदेह, संशयरहित होऊन निश्चयाच्या निर्धाराने त्या भक्तमुखांतून सहजोद्‌गार निघतात —

सुनिर्मळा साईराया, तूंच एक
अखेरचा साथी।

— श्रीसाईसच्चरित

आणि त्या भक्ताचं हृदय सद्‌गुरुप्रेमाने परिपूर्णतेने व्यापलं जातं. सद्‌गुरुलाही भक्ताची विलक्षण ओढ निर्माण होते आणि या सुमुहूर्तावर सद्‌गुरुची कृपा होते. सामंजस्याचा, ऐक्याचा बोध होऊन ते एकरूप होतात व सद्‌गुरुपौर्णिमेचा महोत्सव साजरा होतो.

मग आलिंगिला पूर्णिमा
जैसा उणीव सांडी चंद्रमा
तैसा होय वीरोत्तमा। गुरुकृपा तथा।।

ज्ञानेश्वरी — अ. १८.९६९

अशी अवस्था होते व भक्तजीवन कृतार्थ होतं, धन्य होतं.

*****

# तुम्हीच माझे बाबा साई

बाबा म्हणूनी साद घालीतो मी तुम्हा साई
सत्वर तुम्ही धांवून येता बनून माझी आई
तुम्हीच माझे बंधू होता तुम्हीच माझी ताई
तुम्हीच माझे सगे सोयरे तुम्हीच सर्व नाती
तुम्हीच माझे बाबा म्हणूनी करीतो हट्ट तुम्हापाशी
बालक तुमचे अज्ञानी मी घ्या हृदयाशी
कृपादृष्टी अवलोका मज, करू किती विनंती
अनंत माझ्या अपराधांची घेऊं नका झडती
कालक्रमण मी सदा करावे कर धरूनी तुमचा
सदैव माझ्या मुखी असावा नामजप तुमचा
ध्यानी, स्वप्नी, मनी बाबा तुम्ही असा साई
करा तुम्ही संगोपन माझे होऊन माझी आई
योगक्षेम माझा सदैव चालवा तुम्ही साईनाथा
हीच विनंती करीतो मी तव चरणी ठेवून माथा
किमया अैसी करूनी मजला अनेकदा दावा
माझ्यापाशी तुम्हा कृपेचा असावा असा दिव्य ठेवा

— **मधु पाटणकर**
३४/९०३ नेहरू नगर
कुर्ला पूर्व मुंबई ४०० ०२४

# स्वामी विवेकानंदांची गुरुभक्ति





गुरुर्ब्रह्मः गुरुर्विष्णुः गुरुर्देवो महेश्वरः।
गुरुः साक्षात्परब्रह्म तस्मै श्रीगुरवेनमः ।।

हिंदुधर्मात गुरुभक्तीला अत्यंत महत्वाचे स्थान दिलेले आहे. देवांपेक्षासुद्धा गुरुला श्रेष्ठ मानावे असे समर्थ रामदास स्वामींनी दासबोधामध्ये सांगितले आहे. म्हणोनि सद्गुरू पूर्णपणे। देवाहून अधिक कोटिगुणे। (दासबोध दशक ३, ५ समास, ओवी ४५). ज्ञानेश्वर, एकनाथ, तुकाराम आदि करून संतांनी सद्गुरूमहिमा आपापल्या ग्रंथामध्ये वर्णन केला आहेच. स्वामी विवेकानंदांचे गुरु भगवान रामकृष्ण परमहंस हे महान अधिकारी पुरुष होते. ''सोने रुपे आम्हा मृत्तिकेसमान'' या तुकाराम महाराजांच्या उक्तिमधील अवस्थेप्रत पोहोचलेले, सद्गुरू स्वामी विवेकानंदांना लाभले होते. वैराग्याचा मूर्तीमंत पुतळा भगवान रामकृष्णांच्या रुपाने विवेकानंदांच्या समोर उभा होता.

रामकृष्णांच्या सान्निध्यात येण्यापूर्वी नरेंद्र (उर्फ विवेकानंद) हे स्वतःस बुद्धिवादी म्हणवून घेत असत. कोणत्याही गोष्टीची प्रत्यक्ष प्रचिती आल्याशिवाय त्यावर एकदम विश्वास टाकणे हा त्यांचा स्वभाव नव्हता. परमेश्वराच्या अस्तित्वाबद्दल ज्यावेळी त्यांच्याबरोबर कोणी बोलू लागे त्यावेळी ते त्या गृहस्थाला एकदम प्रश्न विचारीत की तुम्ही देव पाहिला आहे काय? अशा वेळी त्यांच्या मनाचे समाधान होईल असे उत्तर त्यांना फारसे कोणाकडुन मिळत नसे. देवाच्या अस्तित्वाची प्रत्यक्ष अनुभूती घेतलेल्या व्यक्तींची व त्यांची भेट बरेच दिवस न झाल्यामुळे त्यांच्या अंतःकरणात एक प्रकारची तळमळ निर्माण झाली होती. वडिलांच्या आकस्मिक निधनामुळे अत्यंत मोठी कौटुंबिक व आर्थिक आपत्ति त्यांच्यावर कोसळली होती. अशा रीतीने संसारतापाने तापलेल्या व परमेश्वराच्या साकार

दर्शनाची अत्यंत तीव्र तळमळ लागलेल्या त्यांच्या अंतःकरणास शांत करण्यास भगवान रामकृष्णा सारखे अधिकारी पुरुष लाभल्यामुळे विवेकानंदांच्या आयुष्यास एक प्रकारचे वेगळेच वळण लागले. रामकृष्णांनी परमेश्वराची थोरवी वर्णन करण्यास सुरवात केल्याबरोबर विवेकानंदांनी त्यांना एकदम प्रश्न विचारला की, का हो तुम्ही स्वतः देव पाहिला काय? रामकृष्णाने तितक्याच जोरात व तितक्याच त्वरेने त्यांना उत्तर दिले "हो मी देव पाहिला आहे आणि तुला सुद्धा मी तो दाखवू शकेन" इतक्या आत्मविश्वासाने व तडफदारपणे उत्तर देणारी व्यक्ति भेटल्यावर साहजिक विवेकानंदांना कृतकृत्यता वाटली व त्यांनी रामकृष्णांच्या पायी आपले पुढील सर्व जीवन वाहिले. विवेकानंदांच्या हृदयास स्पर्श केल्याबरोबर रामकृष्णांनी त्यांना जो समाधिसुखाचा अनुभव दिला तो शब्दांनी वर्णन करता येण्यासारखा नाही. विवेकानंदांना स्वतःच्या आईच्या, बहिणीच्या व इतर कुटुंबियांच्या चरितार्थासाठी नोकरी करणे भाग होते. पण अत्यंत खटपटी करूनसुद्धा त्यांना साध्या कारकुनाची नोकरी मिळेना. पदवीधर असलेल्या एका प्रिय भक्ताची ही स्थिती पाहून रामकृष्णांना फार वाईट वाटे. स्वतःच्या संसारात कधीही लक्ष न घालणारे रामकृष्ण विवेकानंदांना नोकरी मिळण्यासाठी त्यांच्याकडे येणाऱ्या काही उच्चपदस्थ व्यक्तींजवळ शब्द टाकीत असत. इतके गाढ प्रेम त्यांच्या मनांत विवेकानंदांच्याबद्दल निर्माण झाले होते. आत्मज्ञानाचा लाभ करून घेण्याची इतकी तीव्र तळमळ विवेकानंदांच्या मनात उत्पन्न झाली होती की दक्षिणेश्वरी रामकृष्णांच्या सहवासात रात्रंदिवस येऊन राहावयास मिळावे म्हणून त्यांनी घराचा त्याग केला. आईच्या व बहिणीच्या ममतेचे पाश इतक्या कठोरपणे तोडून आत्मोद्धारासाठी त्यांच्या अंतःकरणात जे वैराग्य निर्माण झाले होते त्याचे सर्व श्रेय त्यांच्या गुरुभक्तीला देणे योग्य होईल. रामकृष्णांच्या निधनाच्या अगोदर काही दिवस त्यांना घशाच्या कॅन्सरच्या दुखण्याने जर्जर केले होते. अत्यंतिक तीव्र वेदना होत असताना सुद्धा रामकृष्णांचे उपदेशाचे काम चालू होते. कॅन्सर हा संसर्गजन्य रोग असल्यामुळे रामकृष्णांची सेवासुश्रूषा करण्यास काही शिष्यमंडळी बिचकत असत. न जाणो आपणास हा रोग झाला तर काय होईल या भावनेने त्यांच्यापासून दूर दूर राहण्याचा प्रयत्न कांही व्यक्तींकडून केला जात असल्याने विवेकानंदांच्या नजरेस आले. त्यांच्या अंतःकरणास त्यामुळे अत्यंत दुःख झाले. एके दिवशी सकाळी डॉक्टर रामकृष्णांच्या घशाची जखम धुवून त्याला मलमपट्टी करण्यात गुंग होते. जखमेतील पू व रक्त काढून एका पेल्यात ठेवले होते. विवेकानंदांच्या मनात विचार आला की माझ्या सद्गुरुंना जर या रोगामुळे इतक्या मरणप्राय यातना सोसाव्या लागत आहेत तर माझ्या देहाची तरी मला पर्वा ठेवण्याचे येवढे काय कारण आहे. अशा विचाराने जखमेतून काढलेल्या रक्त-पू यांनी भरलेल्या त्या पेल्यास तोंड लावून त्यातील रक्त व पू मिश्रित जखमेचे पाणी त्यांनी पिऊन टाकले. गुरुभक्तीचा यापेक्षा दुसरा कडेलोट तो कोणता? भोळारामानी रामदासांच्या पायास झालेले गळू स्वतःच्या तोंडून चोखून घेण्याचे धारिष्ट्य दाखविले ही गोष्ट इतिहास प्रसिद्ध आहे. रामकृष्णांच्या महानिर्वाणानंतर अत्यंत बिकट परिस्थितीत

विवेकानंदांनी त्यांच्या कार्याची धुरा स्वतःवर घेऊन रामकृष्णांनी जमविलेले सर्व शिष्य बडानगरचे मठात एकत्रित करून ठेवले. त्यांना गृहस्थाश्रमात परत न जाऊ देण्यासाठी एका पडक्या व भूताटकीने पछाडलेल्या जागेत आत्मचिंतनात व वेदांताच्या श्रवणांत त्या सर्व शिष्यांसमवेत तहानभूक इत्यादि देहधर्माचीसुद्धा परवा न करता त्यांनी दिवस काढले. रामकृष्णांनी ही सर्व जबाबदारी विवेकानंदांच्यावर टाकली होती व ती त्यांनी संपूर्णपणे पार पाडली. अमेरिकेला जाण्याच्यापूर्वी रामकृष्णांची पत्नी श्रीमती शारदादेवी यांची अनुज्ञा घेतल्यावर मग त्यांनी अमेरिकेला जाण्याचा बेत निश्चित केला. सर्वधर्मपरिषदेत भाषण करण्यास उभे राहिल्यावर पहिल्या प्रथम विवेकानंदांची मनःस्थिती बावरल्यासारखी झाली पण ती एक क्षणभरच. रामकृष्णांचे स्मरण केल्याबरोबर त्यांच्या वाणीला जो एक ओघ व तेजस्विता निर्माण झाली त्या ओघामध्ये परिषदेस जमलेल्या सर्वांना मंत्रमुग्ध करण्याची शक्ति निर्माण झाली होती.

स्वामी विवेकानंदांना मिळालेले सर्व यश यांच्या गुरुभक्तीला व कडकडीत वैराग्यासच देणे योग्य होईल. लेखाच्या सुरवातीच्या श्लोकात वर्णन केल्याप्रमाणे गुरु हे साक्षात् ब्रह्मस्वरूप आहेत म्हणून त्यांना वंदन करणे योग्य होय.

## ।। साक्षात् ईश्वर ।।

ध्यानी मनी स्वप्नी माझ्या,
बाबा तुमची मूर्ती।
हांक भक्ताची ऐकून धावसी,
ऐसी तव कीर्ती ।।
साईबाबा या नांवाने,
ज्ञात तुम्ही सकला।
चुकलेल्यांना वाट दाविण्या,
जन्म तुम्ही घेतला ।।
सा.ई. याने साक्षात ईश्वर,
आहात बाबा तुम्ही।
साईबाबा बाबासाई
नित्य जपू आम्ही ।।
लहान-मोठा तुमच्या द्वारी,
कधि नसे हा भेद।
सम समान तुम्ही मानता,
कुराण अन् वेद ।।

पैशासाठी हपापला जो,
सत्पुरुष तो कसला?
भिक्षा मागुनी भूक भागवी,
उरले देई सकला ।।
रंजला-गांजला भक्त तयाला,
हात मदतीचा देई।
दुःखावरती फुंकर घाली,
तेची तुम्ही साई ।।
सदैव ठेवा भक्तावरती,
कृपादृष्टी बाबा
नित्यनेमे स्मरीन तुज मी,
माझा जन्म उभा ।।

**— श्री. भालचंद्र कडणे**
८०/११ यशोधरा
वीर सावरकर मार्ग
दादर, मुं.-४०० ०२८

# कबीर आणि त्याचे सद्गुरू

कबीराला रामानंद नावाचे मोठे सत्पुरुष गुरु म्हणून लाभले होते असे त्याच्या त्यांचेबद्दलच्या आदरपूर्ण उद्गारावरून म्हणायला काही हरकत नाही. कारण काशी क्षेत्राबद्दल व आपल्या गुरुबद्दल गौरवपूर्ण उद्गार काढताना तो म्हणतोः "काशी में हम प्रगट भये है। रामानन्द चेताए।।" कबीराने रामानंद यांचेपासून कशाप्रकारे गुरुपदेश घेतला याचेबद्दल एक लोकश्रुती मोठी मजेदार आहे. कबीर हा मुस्लिम संस्कारात वाढलेला एक कोष्टयाचा मुलगा व रामानंद हे श्रेष्ठ वर्णाचे एक मोठे हिंदू साधू! तेव्हा त्यावेळच्या एकंदर रूढींप्रमाणे कबीराला वाटले की हे आपल्याला अनुग्रह देतील किंवा नाही? त्यामुळे त्याने एक युक्ती योजिली. काशी क्षेत्रातच रामानंद रहात असत आणि रोज ते गंगा नदीवर स्नान करण्यासाठी भल्या पहाटे जात. ही वेळ कबीराने लक्षात घेऊन तो त्यांच्या स्नानाला जाण्याच्या वाटेवर अंधारातच पडून राहिला. त्यावेळी रामानंद हे तिथून जात असताना त्यांचा पाय चुकून कबीराला लागला व त्यांच्या तोंडून शब्द बाहेर पडलेः "राम! राम! कोणाला बरे माझा पाय लागला?" कबीराने हेच शब्द गुरुपदेश मानून रामनाम या जपाचा स्वीकार केला व रामानंदांना साष्टांग नमस्कार केला. काही विद्वानांच्या मते ही केवळ जनश्रुतीच असावी. परंतु रामानंदाबद्दल बरेच गौरवपूर्ण उद्गार त्याच्या काव्यात आढळून आले आहेत त्यामुळे त्याच्या मनात त्यांचेबद्दल गुरुप्रमाणेच आदर होता यात काही शंका नाही

## सद्गुरुमहिमा व कबीर

भारतीय संस्कृतीत गुरुचा महिमा सर्वात मोठा सांगितला आहे. गुरु म्हणजे आपल्यापेक्षा जो श्रेष्ठ व महान आहे त्याचा आदर करणे आध्यात्मिक क्षेत्रात तर सद्गुरुला ईश्वरापेक्षाही श्रेष्ठ मानले गेले आहे. सुप्रसिद्ध थोर महाराष्ट्रीय संत नामदेव याचा देवाशी संवाद चालत असे तरीही विठ्ठलाने त्यांना विसोबा खेचर या श्रेष्ठ गुरुकडे पाठविले. महान निर्गुण भक्त उद्धव या आपल्या अर्जुनासारख्या प्रिय मित्र व भक्त असलेल्या व्यक्तीलाही कृष्णाने सामान्य अशा गोपींकडून सगुण स्वरूपाची महती पटविली. सद्गुरुसमोर येताच अहंकाराचा त्याग करून त्याला शरण जावे असे शिकविले गेले आहे. कबीरानेही गुरुची महती गायिली आहे तो म्हणतोः

सत् गुरु सवाँन को सगा सोधी सई न दाति।
हरिजी सवाँन को हितु हरिजन सई न जाति।।

सद्गुरु हा सर्वांचा खरा सगा (नातेवाईक) आहे. त्याच्यासारखा दाता कोणी नाही परमेश्वराप्रमाणे तो सर्वांचे हित करतो आणि परमेश्वर भक्तांशिवाय खरी श्रेष्ठ जात दुसरी कोणती असू शकेल?

पासा पकड्या प्रेमका। सारी किया शरीर।।
सतुगुरु दाँव बताइया। खेले दास कबीर।

प्रेमाचे फासे घेऊन शरीराचा सारीपाट केला आहे आणि सद्गुरुंच्या आज्ञेने संसाररूपी खेळ कबीर खेळत असल्यामुळे जीत कबीराचीच होईल यात काय संशय?

सद्गुरु साँचा सूरिवा, सबद जुं बाह्या एक।
लागतही भै मिल गया, पड्या कलेजे छेक।।

सद्गुरुप्रमाणे दुसरा शूर वीर कोण असू शकेल? कारण एखाद्या कसलेल्या योद्ध्याला योग्य ठिकाणी बाण सोडण्यात यश मिळेलही परंतु सद्गुरुंच्या शब्दरूपी बाणांनी कबीराच्या ह्रदयावर आघात केला आहे आणि त्याचा परिणाम त्वरित होऊन तो ईश्वर भक्तिच्या मार्गावर वाटचाल करू लागला.

बलिहारी गुरु आपने| द्यौ हाडी कै बार।
जिनि मानिष तै देवता, कर तन लागी बार।।

हे सद्गुरु, आपला मोठेपणा काय वर्णन करावा? हे शरीर आपणावरून अनेकवेळा ओवाळून टाकावसे वाटते कारण आपण मला मनुष्यत्वाकडून देवत्वाकडे नेत आहात आणि त्यासाठी आपणाला जराही अवधि लागलेला नाही. सद्गुरुंच्या या महानतेमुळेच ज्ञानेश्वरांनीही १३ व्या अध्यायात ओवी क्र. ९ मध्ये पुढील उद्गार काढले नाहीत काय? ते म्हणतात —

गुरु बहुतांचा माये। परि एकलौति होऊ नि ठाये।।
तैसे करूनी आण वाये। कृपे तिये।।

गुरु हे जरी पुष्कळ भक्तांची माऊली आहेत, तरी त्या गुरुंच्या कृपेस मी आपली शपथ घालून माझी एकट्याची माऊली करून घेईन.

# श्रीसाईबाबा आणि बोलणे

**श्री. मु. ब. निंबाळकर**
१/१४, फाईव्ह स्टार अपार्टमेंट्स,
बंड गार्डन रोड, पुणे - ४११ ००१

"विषयासक्ति मानून त्याज्य। मी तूं पण सर्वथा अयोग्य।
जिव्हा-उपस्थ जिंक हो योग्य। तैं मी तुज सभाग्य मानीन। ।१४२।।
— अध्याय ४४

वरील ओवीत परमार्थ प्राप्तीत केव्हा यश मिळेल हे बापूसाहेब जोगांना सांगताना बाबांनी विषयेंद्रियात जिव्हा (जीभ) आणि उपस्थ (जननेंद्रिय) यांनाच जिंकण्याचे महत्त्व

सांगितले आहे, आणि म्हणूनच की काय बाबांच्या उपदेशात जीभेवर ताबा ठेवण्याचा वारंवार उल्लेख आढळतो.

जीभेची दोन कार्ये. एक तर अन्नाचा स्वाद घेणे व दुसरे बोलणे. अन्नाबद्दल तर मागील लेखात वर्णन आलेले आहे आता बोलण्याबद्दल बाबांचे काय सांगणे होते ते आपण पाहू या.

**उणे बोलणे**

अहिंसा पाळण्याबद्दल आपल्या धार्मिक ग्रंथात व साधुसंतांनी वारंवार उपदेश केला आहे. कोणाची काया, वाचा, मनाने विनाकारण हत्या करू नये किंवा कोणाला दुःख देऊ नये. बाबांनी ओळखले होते की सर्वात वाचेने (बोलण्याने) केलेली हत्या फार घातक व दुःखदायक असते. तिखट शब्द मर्मी झोंबतो, कधी विसरला जात नाही. त्यामुळे वैमनस्य वाढते व कायम टिकते. म्हणूनच बाबा म्हणतः —

"त्यागावे तेणे बोल वर्मी। कोणास छेदू नये वर्मी॥ २१७॥"

— अध्याय १९

"कोणी कोणास छद्मी बोलले।
त्याने माझे वर्म काढलें। जिव्हारीं खोचले मज जाण॥ १७४॥"

— अध्याय ४४

एवढेच काय दुसऱ्याने आपणास कटू शब्द उच्चारले तरी आपण त्याला उलट उत्तर देऊ नये असेही बाबा सांगतः —

"कोणीही बोल बोलो शंभर। स्वये नेदी कटु उत्तर।
धरितां सहिष्णुता निरंतर। सुख अपार लाभेल॥ १४४॥"

— अध्याय १९

**वादावादी**

जीभेबद्दल बाबांचा दुसरा उपदेश म्हणजे कोणाशी कोणत्याही बाबतीत वाद घालू नये. वादाचे मूळ अहंकारात असते. वादामुळेच भांडणे होतात व वैर पसरतेः —

वादावादी नाही बरी। नको कुणाची बरोबरी।
नसता श्रद्धा आणि सबुरी। परमार्थ तिळभर साधेना॥ १९२॥
अंगी दुर्धर देहाभिमान। तेणेच वादावादीचे जनन।
अहंभावाची ही खूण। नाही त्यावीण वाद जगी॥ १५४॥

— अध्याय २

कै. दाभोलकर शिर्डीला गेले त्याच दिवशी कै. बाळासाहेब भाट्यांबरोबर गुरुच्या आवश्यकतेबद्दल त्यांची वादावादी झाली. पुढे बाबांच्या दर्शनाला गेल्यावर बाबांनी कै. दाभोलकरांना 'हेमाडपंत' असा टोमणा देऊन त्यांच्या वाद करण्याच्या प्रवृत्तीला कसा कायमचा आळा घातला हे वाचकांना ठाऊकच आहेः —

उगाच ना या पदवीचे दान। चतुराईचा हा सन्मान।
वादावादीपरी हा वाग्बाण। अभिमान खंडण व्हावया॥ १८४॥

होऊनी अर्घ्या हळकुंडे पिवळे। उगीच योग्यतेवीण जो बरळे।
तया माझिये उघडिले डोळे। घालूनी वेळवर अंजन।। १८५।।

— अध्याय २

**उपहासनिंदा**

आपला काही संबंध नसता उगाच एकाद्याच्या उखाळ्यापाखाळ्या काढून त्याचे वागण्याबद्दल उहापोह करणे बाबांना आवडत नसे. एका वकीलाने कै. नूलकर मुनसफ आपली डोळ्यांची व्यथा बरी करण्यासाठी शिरडीस बाबांजवळ येऊन राहिल्याबद्दल वकीलांच्या खोलीत चाललेल्या उहापोहात व निंदेत भाग घेतल्याबद्दल बाबांनी त्याला टोमणा मारून त्याची चूक त्याला कशी दाखवून दिली हे वाचकांनी अध्याय २१ मध्ये वाचलेच असेलः —

ताशेरा नव्हे हा अनुग्रह। व्यर्थ कुणाचा उहापोह।
उपहास-निंदादि कुत्सित संग्रह। असत्परिग्रह वर्जावा।। ११७।।

— अध्याय २१

निंदा करू नये हे सर्वांना ठाऊक असते पण त्याचा मोह आवरत नाहीः —

निंदा कधीही करू नये। हें तो प्रत्येक जाणे स्वयें।
परी न वृत्ती जै दाबिली जाये। ती ना समाये पोटांत।। १९२।।
तेथून मग येई कंठी। कंठातून जिव्हेच्या तटी।
तेथून हळू हळू ओठी। सुखसंतुष्टी प्रवाहे।। १९३।।

— अध्याय १९

म्हणूनच की काय निंदकाचे विष्ठामिष्टान्नावर यथेष्ठ ताव मारणाऱ्या एका ग्रामसूकरीशी साम्य दाखवून बाबांनी आपल्या मनात निंदा करणाऱ्याबद्दल अत्यंत कौशल्याने घृणा उत्पन्न केली होतीः —

मळ काढिती कोणी रिठ्याने। कोणी साबणादिकीं साधनें।
कोणी शुद्ध निर्मल जीवनें। निंदक जिव्हेने काढिती।। १९५।।
पहा त्या जीभेला काय गोडी। जनालोकांची विष्टा चिवडी।
बंधु-स्वजनावर चडफडी। यथेष्ट फेडी निज हौस।। २०५।।
बहुत सुकृताचिये ओढी। आला नरजन्म ऐसा जो दवडी।
तया आत्मघ्ना ही शिरडी। सुखपरवडी काय दे।। २०६।।

— अध्याय १९

**सत्य बोलणे**

सत्य बोलण्याबद्दल आपल्या धर्मग्रंथात वारंवार उपदेश आढळतो. सत्यापायी राजा हरिश्चंद्राने किती कष्ट भोगले हे आपणास ठाऊकच आहे. बाबा व्यवहारी होते. त्यांनी लोकांनी सत्यच बोलावे, खोटे कधीही बोलू नये याची पोपटपंची कधीच केली नाही. मात्र ते अंतर्यामी व सर्व जाणणारे आहेत याची खात्री असल्याने भक्त त्यांचे पुढे खोटे बोलण्यास धजतच नसतः —

असत्य चालेना साईप्रती। असत्यें नाही साईंची प्राप्ती।
असत्यें जाण अधोगति। अंती दुर्गती असत्यें।। १३८ ।।

— अध्याय ३८

खोटे सांगून भागेना काज। साईमहाराज सर्वसाक्षी।। १५९ ।।

— अध्याय ५१

खुद्द बाबांच्या चरित्रात बाबा स्वतः एकदोनदा खोटे बोलल्याची उदाहरणे आहेत. अध्याय २७ मध्ये रामदास्याची विष्णुसहस्त्रनामाची पोथी शाम्याला उचलून द्यावयाची होती म्हणून आपल्या पोटात कळ आल्याचे खोटेच सांगून बाबांनी त्याला बाजारात सोनामुखी आणावयास पाठविले. तसेच अध्याय ३३ मध्ये कै. नानासाहेब चांदोरकरांच्या मुलीकरिता उदी व आरती तातडीने धाडण्यासाठी टांगेवाल्याचे रूप घेऊन बापूगीरला खोटेच सांगितले की टांगा चांदोरकरांनी पाठविला आहे व फराळही त्यांनीच दिला आहे.

याचा अर्थ कसा लावावयाचा? पहिली गोष्ट संतांना कर्मफलभोग नसतो. कारण त्यांचेकडे केलेल्या कर्माचे कर्तृत्वच नसते. दुसरे म्हणजे या कर्माचे पाप असले तरी ते भक्तांच्या कल्याणासाठी आपल्याकडे घेण्यास ते तयार असतात. वरील उदाहरणात बाबांनी शाम्याचे (त्यांच्या लाडक्या भक्ताचे) कल्याण साधावयाचे होते व कै. नानासाहेब चांदोरकरांच्या मुलीला बाळंतपणातून सुखरूप सोडवावयाचे होते. भक्तांचे रोग संत स्वतःचे अंगावर घेत असल्याची उदाहरणे (खुद साईबाबांचेही अध्याय ७ मधील उदाहरण) आपणाला माहितच आहेत. मग भक्तांची पापेही स्वतःकडे घेण्यास ते कचरतील का? असो.

आपल्या दृष्टीने व्यवहारात सदा खरे बोलण्याचा मोठा पेच पडतो. आजकाल सुट्टे पैशांची टंचाई आहे. बसमध्ये कंडक्टर सुट्टेच पैसे मागतो. कित्येक वेळा आपणाला परतीला लागतील म्हणून काही सुट्टे पैसे जवळ असून 'नाहीत' असे खोटे सांगण्याचा मोह होतो. कारण सुट्टे आहेत पण मला ते परतीला लागतील असे कंडक्टरला सांगितले तर त्याला ते पटणार नाही व मग परतीला सुट्ट्या पैशा अभावी बसमधून कदाचित उतरून पडण्याचा प्रसंग यावयाचा. तसे पाहिले तर स्वतःजवळ सुट्टे पैसे असूनही कंडक्टर आपणाजवळ सुट्टे पैसे मागतोच ना? तर अशावेळी आपण काय करायचे? सत्य बोलण्याचे व्रत पाळायचे का?

दुसरे म्हणजे नातवाने आपल्याकडे चित्रे काढण्यासाठी कोरे कागद मागितले तर आपण एकदा दोनदा कागद संपायला आल्यावर एकदोन आपणाला हवे असल्याने नातवाला काय सांगावे हा प्रश्न पडतो. सर्व देऊन टाकले तर स्वतःला लागल्यावर कोणी बाजारातून आणून द्यावयाला मोकळे नसते व स्वतःला तेवढ्याकरिता बाजारात जाण्याची म्हातारपणी धमक नसते. कागद संपलेत असे खोटे नातवाला सांगितले तर असत्य भाषण केल्याचे पाप घडते. तर आपण कसे वागायचे?

वरील विवेचनावरून सत्य बोलण्याचा माझा निष्कर्ष असा आहे. नेहमी सत्यच बोलावे. खोटे बोलू नये. आपल्या स्वार्थासाठी तर कधीही खोटे बोलू नये. परंतु केव्हा केव्हा दुसऱ्याच्या हितासाठी खोटे बोलण्यास काही हरकत नाही. उदा. एखाद्याला दुःखद

बातमी एकदम ऐकून धक्का बसणार असेल तर ती अजून न घडल्याची किंवा आपणाला त्याबद्दल माहितीच नसल्याचे खोटे सांगणे. तसेच दुसऱ्या व्यक्तीला वाईट वाटू नये म्हणून सुद्धा कधीतरी खोटे बोलण्यास हरकत नाही. उदा. एखाद्या व्यक्तीने प्रेमाने व उत्साहाने जेवण करून वाढले असले व ते आपणाला आवडले नसले तरी त्या व्यक्तीला खोटेच हसून छान झाले आहे असेच सांगणे श्रेयस्कर ठरेल. उलट त्या व्यक्तीचे तोंडावर जेवण आवडले नाही म्हणून सांगून तिला दुखविणे हे पापच नाही का? असो. याला आपल्या शास्त्रातही आधार आहेः —

सत्यस्य वचनं श्रेयः सत्यादपि हितं वदेत्।
यभ्दूतहितमत्यन्तमेतत्सत्यं मतं मम्॥

— महाभारत-शांतिपर्व

(सत्य बोलणेच चांगले परंतु त्यापेक्षाही ज्यामुळे सर्व प्राण्यांचे हित साधले जाते ते अधिक चांगले. कारण ज्यामुळे सर्व प्राण्यांचे अत्यंत (वास्तविक) हित (कल्याण) साधले जाते तेच माझ्या मते सत्य होय.)

सत्यं ब्रूयात् प्रियं ब्रूयात् सत्यप्रियम्॥ १३४॥

— मनुस्मृति अ. ४

(खरे बोलावे, प्रिय बोलावे. सत्य असूनही अप्रिय असेल तर तशी वाणी उच्चारू नये)

**प्रियं ब्रूयात्**

गोड बोलावे. याबद्दल तर बाबांची शिकवणच होती — नव्हे त्यांनी स्वतः उदाहरणच घालून दिले होते. हेमाडपंत म्हणतातः—

काय त्या वाणीची रसाळता। मधुरता आणि कनवाळता।
तैसीच स्वानंद-शीतळता। अति अपूर्वता तियेची॥ १२०॥

— अध्याय २७

कोणीही असो प्रौढ बाई। तिजला हांक मारीत 'आई'।
पुरुषांस 'काका' 'बापू' 'भाई'। गोड नवलाई हांकेची॥४१॥

— अध्याय १९

अध्याय २७ मध्ये एक रामदासी विष्णुसहस्त्रनाम पोथीवरून शाम्याशी भांडत असताना बाबांनी त्याला शांत करून गोड बोलण्याबद्दल किती छान उपदेश केला?

"अरे शाम्या आपलाच पोरगा। तू का शिरा ताणिसी उगा।
किमर्थ इतका कष्टसि वाउगा। तमाशा जगासी दाविशी॥ ११२॥
ऐसा कैसा तू कलहतत्पर। का न बोलावे मधुरोत्तर।
अरे पोथ्या पढताही निरंतर। अजूनि अंतर अशुद्ध॥ ११३॥

— अध्याय २७

## बोलल्याप्रमाणे वागणे

बोलल्याप्रमाणे माणसाने वागावे याबद्दल बाबांचा कडक कटाक्ष होता :—

खोटे वचन देऊ नये। कवणासी कदाकाळी ।। ३२ ।।
एकदा वचन दिल्यावरी। निमूटपणें खरें करीं।
वचनभंगी श्रीधरी। दुरावेल नारायण ।। ३३ ।।

— ह.भ.प. दासगणूकृत अर्वाचीन भक्तलीलामृत
(अध्याय ३३)

स्वतः बाबा तसे वागतच :-

"पहा मी माझिया वचनाकारणें। मरोनि जाईन जीवें प्राणें।
परी माझिया मुखींचीं वचनें। अन्यथा होणें नाहीं कदा" ।। ९१ ।।

— अध्याय ४०

परंतु आपल्या भक्तांच्या बोलण्याच्या किंवा बोललेल्या नवसाच्या पूर्तीसाठी ते धडपडही करत असत. उदा. अ. ३३ मध्ये अप्पासाहेब कुळकर्णींनी १० रूपये दक्षिणा देण्याचे म्हटले होते म्हणून फकीर रूपाने सकाळी त्यांचे घरी आलेले बाबा संध्याकाळपर्यंत गावात थांबले, नव्हे पुन्हा त्यांचे भेटीस आले आणि एकंदर १९ रूपये हातात पडले तरी अप्पासाहेबांनी म्हटल्याप्रमाणे फक्त १० रूपये घेण्यासाठी त्यांना ९ रूपये परतही दिले. तसेच अध्याय ३६ मध्ये गोमंतकाहून आलेल्या भक्ताचे नवसाचे १५ रूपये बाबांनी मागून घेतल्याचे आपणाला माहीतच आहे. बाबा म्हणतच असत :-

"तथापि हित आणि मित बोलेल। बोला ऐसाच जो वागेल।
खरे करून दावील निजबोल। एकदाच लाल हरीचा" ।। २२४ ।।

— अध्याय ३३

**मित भाषण**

याबद्दल बाबांनी शिकवण स्वतः तसे वागूनच दिली होती. आपल्या भक्तांना उपदेश करण्यासाठी त्यांनी लांबलचक व्याख्याने कधीच दिली नाहीत. जे काय सांगावयाचे ते नेहमीच्या संभाषणात उद्‌बोधक व मनोरंजक कथा सांगून ते भक्तांना शिकवण देत असत. बहुधा ते हेमाडपंतांनी म्हटल्याप्रमाणे : —

असे पुढे साईनाथ। विचारल्याचेंचि उत्तर देत।
स्वयें आपण कोणासमवेत। कधीही बोलत नसत ।। ७३ ।।

— अध्याय ५

मौन पाळण्यासाठी आणि जीभेवर नियंत्रण ठेवण्यासाठी एकांताची संवय करणे चांगले; म्हणूनच की काय बाबांनी ती लहानपणापासूनच आत्मसात केली होती.

अष्टादश वर्षांचे वय। तेथूनि एकांताची संवय।
रात्रीं कुठेंही पडावे निर्भय। सर्वत्र ईश्वर ज्यासी ।। १४ ।।

— अध्याय ३९

पुढेही सकाळी दुपारी लेंडीबागेत जाऊन एकांतात काही वेळ तरी घालविण्याचा क्रम बाबांनी शेवटपर्यंत सोडला नाही. एकांताचा आनंदच वेगळा आहे.

जे सुख विरक्ता एकांती। कींजें भक्ता करिता भक्ति।
असो इंद्र कीं चक्रवर्ती। न मिळे कल्पांती तयांना ॥ १०२ ॥

— अध्याय ३७

## नामस्मरण

बोलण्याचे बाबतीत बाबांची सर्वात महत्वाची शिकवण नामस्मरणाबद्दल होती. इतर वायफळ गप्पागोष्टीत, वादावादीत किंवा थट्टानिंदेत वाणीचा अपव्यय करण्यापेक्षा आपल्या आराध्य देवतेचे किंवा गुरुचे नामस्मरण करण्यात जीभेचा उपयोग करावा असा त्यांचा सतत उपदेश होता व त्याप्रमाणे त्यांचे स्वतःचे वागणेही होते : —

नामस्मरणीं मोठी प्रीती। 'अल्ला-मालीक 'अखंड करती।
नामसप्ताह करवूनि घेती। दिवस राती सन्मुख ॥ ८२ ॥

— अध्याय ४

म्हणूनच हेमाडपंतही त्यावर पुस्ती जोडतात : —

नामापरीस सोपे आन। अंतः शुद्धीस नाहीं साधन।
नाम जिव्हेचे भूषण। नाम पोषण परमार्थ ॥ ८८ ॥
नाम घ्यावया नलगे स्नान। नामासि नाही विधिविधान।
नामे सकळ पापनिर्दाळण। नाम पावन सर्वदा ॥ ८९ ॥

— अध्याय २७

## सारांश

एकूण बाबांचा बोलण्याबद्दलचा उपदेश थोडक्यात असा होता : —

(१) कोणास उणे किंवा टोचून बोलू नये. दुसरा तसे बोलला तरी आपण उत्तर न देता सहन करावे.
(२) वादावादी करू नये.
(३) कोणाची निंदा किंवा त्याच्या वैगुण्याची थट्टा करू नये.
(४) सत्य बोलावे.
(५) गोड व प्रेमाने बोलावे.
(६) बोलल्याप्रमाणे वागावे.
(७) कमी बोलावे.
(८) ईश्वराचे किंवा आपल्या गुरूचे नामस्मरण करावे.

# श्री साईनाथांचा शरणार्थी (१४)

लेखक: ब्रह्मीभूत स्वामी साईशरणानंद
अनुवादक: वि.बा. खेर

मी सन १९१४ च्या गुरुपौर्णिमेनंतर सी.जे.एन्.एल्. हायस्कूलमध्ये सहाय्यक शिक्षक म्हणून दरमहा रु. ६५ पगारावर लागलो. राधाकृष्ण आईच्या सूचनेवरून भात खाण्याचे बंद केले परंतु भात खाण्याची सवय असल्यामुळे हे कठीण गेले. एकदा बाबा माझ्या स्वप्नामध्ये येऊन म्हणाले, "चपातीबरोबर कांद्याची कोशिंबीर खावी. लाल कांदा मिळाल्यास उत्तम." काही दिवसांनी कांद्याच्या सेवनाने वाणीमध्ये भ्रष्टता आल्याची जाणीव झाली. म्हणून कांदा पचविण्याची आपल्या सूक्ष्म देहात ताकद नाही अशी खात्री होताच कांदा खाण्याचे बंद केले. नवसारीला माझी धाकटी बहीण आल्यावर भात घेण्याचे सुरू केले. परंतु भात पचत नसे, फार जाडा तांदूळ असल्यास तो पचे. नंतर राधाकृष्ण आईने भात खाण्यास सांगितले. ती एकदा मला म्हणाली, "तुम्हां नवराबायकोला वीस रुपये पुरे, जास्त काय करायचे? बाबांच्या इथल्या संसाराला हातभार लावाना?" नंतर तिने रामनवमीला वामनराव नार्वेकरांना माझ्या खर्चाने रु. १२५ ची चांदीची समई तयार करण्यास सांगून रु. २५ च्या हप्त्याने नार्वेकरांचे पैसे फेडण्यास मला सांगितले. रामनवमीला मी शिरडीला गेलो त्या दिवशी सर्वजण आरतीसमयी पूजेचे साहित्य घेऊन जात होते. त्यावेळी चांदीची समई तुपात बुडवलेल्या वातीने पेटवून तिने एका ताटलीत ठेवली, मला धोतराचा काचा मारायला सांगून माझ्या हातात दिली व म्हणाली, "बघ, मी द्वारकामाईच्या पायऱ्या चढून वर जात आहे." मला जाताना पाठीवर हाताचा स्पर्श झाला म्हणून वळून बघितले तर राधाकृष्ण आई. ती म्हणाली, "जा" हे तिचे सूक्ष्म स्वरुप दुसऱ्या कुणाला दिसले नसावे कारण कोणीही ती द्वारकामाईत येऊन गेल्याचे म्हणाले नाही. शिवाय तिला बाबांसमोर जाण्याची मनाई होती. अथवा त्यांच्यासमोर न जाण्याचे तिचे व्रत असावे. परंतु मला तर ठीक स्थूलरुपाने दर्शन देऊन व माझी पाठ थोपटून तिने सांगितले, "जा, वर चढ व समई लाव."

मी नवसारीला होतो त्या दरम्यान राधाकृष्ण आईचं मला पत्र आलं त्यात लिहिले होते, "बाबांची तबियत खराब झाल्याने दुपारी खिरीशिवाय काही खात नाहीत, परंतु येथे दूध पाहिजे तसं व तेवढं मिळत नाही. म्हणून तू एक चांगली काठियावाडी, आठ एक शेर दूध देणारी गाय पाठविल्यास बरे होईल. बाबांची ही उत्तम सेवा आहे, आणि अशी गाय खरीदल्यास तात्या पाटलांनासुद्धा एक अशा गाईची जरूरी आहे म्हणून त्यांच्यासाठी पण एक घे. त्यासाठी लागणाऱ्या पैशाची तू सध्या व्यवस्था कर, मग मी तुझे पैसे चुकते करीन." माझ्या धाकट्या बहिणीने तिला दिलेली कंठी विकून दोन गाई खरीदल्या व शिरडीस पाठवून दिल्या. ह्या गाई पाठविल्यानंतर माझे शिरडीस जाणे झाले तेव्हा राधाकृष्ण आई म्हणाली, "तुझ्या धाकट्या बहिणीला पैशाची घाई असल्यास मी लगेच चुकते करण्याची व्यवस्था करते." मी म्हणालो, "अशी काही घाई बहिणीला

नाही.'' या संभाषणाचा वृत्तांत नंतर बहिणीला सांगितला तेव्हा तीसुद्धा म्हणाली, ''खरंच, मला काही घाई नाही.'' वरील सेवेसाठी धाकट्या बहिणीचे पैसे जेव्हा चुकते झाले तेव्हा सोन्याचा भाव उतरल्यामुळे तिचा खूपच फायदा झाला.

या वेळी मला शिरडीस जास्त रहाणे शक्य नव्हते. म्हणून ज्यांच्याबरोबर मी टांग्याने शिरडीला आलो त्या श्री मुंगींना मी सांगून ठेवले होते की बाबांनी अनुज्ञा दिल्यास मला सुद्धा आजच निघावयाचे आहे व मला त्यांनी राधाकृष्ण आईच्या बिऱ्हाडावर बोलवायला यावे. त्या दिवशी भोजनानंतर राधाकृष्ण आईचा माझे जास्त लाड करण्याचा विचार असावा. परंतु त्याचवेळी श्री मुंगींनी मला मोठ्याने ओरडून बोलावले. म्हणून मी बाहेर येऊन त्यांच्यासह बाबांकडे गेलो. बाबांनी मला जाण्यास रजा दिली नाही. इतकेच नव्हे तर मला आपल्याजवळ अर्धा तास बसवून ठेवले. मला मायिक स्नेहबंधनापासून दूर ठेवण्याचा बाबांचा हेतु होता.

नवसारीच्या वास्तव्यात माझी तबियत सदैव बिघडलेली असे. एकदा संध्याकाळी माझा जीव एवढा घाबराघुबरा झालो की लगेच मुंबईला जायचा विचार करून, कंदील घेऊन मी सामानासह निघालो. वाटेत एका परिचित गृहस्थाच्या घराजवळ पोचल्यावर पुढे जाण्याचे बळच माझ्यात उरले नाही म्हणून माझ्या बहिणीने व मी ती रात्र त्या गृहस्थाच्या घरी काढली. पहाट झाल्यावर सर्व व्यथा दूर झाली. आदल्या रात्री श्वासोच्छवास खूप जोरात चालला होता व जीव घाबरला होता ते सर्व आता व्यवस्थित झाले होते. आणि मला एवढे बरे वाटले की लगेच घरी परतून काही झालेच नाही अशा पद्धतीने काम करू लागलो. त्या रात्री मात्र असे वाटत होते की मी फक्त दोन तासाचा सोबती आहे. नवसारीला ज्या घरात मी रहात होतो तेथील माडीवरच्या पाठीमागच्या खोलीत कोण्या अधमयोनी, भूतदशा प्राप्त झालेल्या जीवाचा भास होई. एकदा तेथे थोडेसे भय वाटताच मी थोडा वेळ खाली उतरलो. मुंबईच्या प्रवासासाठी निघताना ज्या गृहस्थाकडे रात्री जीव घाबरल्यामुळे मी राह्यलो त्याच्या २०-२५ वर्षांच्या धाकट्या बहिणीला नंतर दोन तीन दिवसांतच भूतबाधा झाली होती परंतु ती योग्य उपचारांनी दूर झाली.

त्याच सुमारास रामनवमीसाठी शिरडीला जाण्याअगोदर मी रामविजय वाचे. पण त्यातील काही ठिकाणी मला अर्थ लागत नसे. ती पोथी मी जेव्हा वाचे तेव्हा घराचे मालक तुळजाराम जोशी येऊन बसत. त्यांनी ज्योतिष व वेदांताचा काही अभ्यास केला होता. एकदा पोथी वाचताना त्यांना मी वेदांतविषयक प्रश्न विचारला. परंतु त्यांचे लक्ष नसावे कारण 'कशाचा विचार करता' या प्रश्नाचे त्यांनी उत्तर दिले नाहीच मीसुद्धा काही बोललो नाही. त्याच सुमारास एकदा मी खालच्या मजल्यावर निजलो असता मध्यरात्री स्वप्नात भास झाला की मला कोणीही आकाशात घेऊन जात आहेत. माझ्या शिरावरील टाळू फुटला आहे. भीतीने मी जागृत होताच घरात इतका प्रखर सूर्यप्रकाश दिसला की मला तो सहन न झाल्याने माझे डोळे मिटले. थोड्या वेळाने डोळे उघडताच सूर्यप्रकाश बघण्याजोगा होऊन अदृश्य झाला. रामविजयात हनुमानाने जन्मतःच सूर्यास पकडण्यासाठी झेप घेतली त्याचे वर्णन माझ्या वाचण्यात आले होते. परिणाम वरील

स्वप्न तसेच जागृत अवस्थेत उन्हापेक्षा प्रखर असा सूर्यप्रकाश मला दिसला हे मी समजलो. या अगोदर एका रात्री झोपण्यापूर्वी वेदांत विचारात गर्क असता मी कपाटातून एक पुस्तक काढण्यास गेलो तेव्हासुद्धा वरीलपेक्षा कमी तेजाचा सूर्यप्रकाश दिसला. त्यावरून मी समजलो की ज्ञानमय वृत्ति तदाकार झाल्याने असे होते.

रामनवमीनंतर शिरडीहून परतल्यावर याच घरात महत्वाचा अनुभव आला. शिरडीहून रामकृष्ण आईने श्रींचा शेषप्रसाद म्हणून साबण्या (खेड्या) दिल्या होत्या त्या प्रसाद म्हणून थोड्या ग्रहण करी व पंचीकरणाचा खूप ध्यानपूर्वक अभ्यास करत असे. शिरडी म्हणजेच कैलास आहे अशी भावना होती. पुष्कळवेळा मी गोपीभावात लीन होऊन जाई. माडीवर एकटाच झोपे. घरात दुसरे कोणीच नसे. एकटा भाकरी किंवा भाजी किंवा कांदा खाई. रात्रीची झोप कमी झाली होती व ती पण जागृतिसारखीच असे. त्यावेळी एकदम आवाज आला: "तू आहेस तो मी आहे, मी आहे ते तू आहेस; साईबाबा मौला फकीर अली बंदेनवाज औरंगजेब बादशहा शाहेनशाह नाटक." मी विचारले, "कोण बोलतो आहे?" उत्तर मिळाले, "माझे नाव आहे बंसी बजैया. हे काय? गोपीभाव कशाला? अरे याच रीतीच्या अनन्य चिंतनभावाने मी अनेकांना तारले आहे व त्याच रीतीने तारेन."

अशा रीतीचा अभेदबोध करून बंसी बजैयाने मला आपलासा केला. माझ्या आनंदाला पार राहिला नाही. परंतु तबियतीचा विचार आला. माझे शरीराकडे लक्ष गेले व दुःखी झालो व वाटले की ही महान वस्तु लोकांना सांगण्यासाठी शरीर क्वचित टिकेल. शरीराची स्थिती अति दुर्बलतेमुळे नाजुक झाली होती व शरीरयंत्र केव्हा बंद पडेल याची शाश्वती नव्हती. जणु मरणासमयीच बंसीबजैयाने हा कृपावर्षाव केला असे वाटले. म्हणून तपश्चर्येचे नियम ढिले करून व शरीराकडे अधिक लक्ष पुरवून हा अनुभव लोकांना सांगण्यासाठी शरीर टिकविण्याचा निर्धार झाला; परंतु तात्कालिक खाण्यापिण्याचे नियम चालू ठेवले.

नवसारीच्या आध्यात्मिक जीवनात एकदा असे घडले की मी शाळेत जात असता वाटेत एक मळके पीत वस्त्र नेसलेली, कपाळावर कुंकवाची आडवी लांब पट्टी लावलेली, दात बाहेर असलेली व मोकळे केस सोडलेली भयानक स्वरुपाची स्त्री दिसली. मी तिच्याकडे लक्ष दिले नाही परंतु थोड्याच दिवसात कॉलराचा प्रादुर्भव होऊन मी रहाणाऱ्या व आसपासच्या लत्त्यांत तो पसरला. माझ्या स्वभावाप्रमाणे मला त्याचे काही वाटले नाही. या काळी एकदा दोनदा श्रीकृष्णाची सुंदर तेजोमय वस्त्रपरिधान केलेली मूर्ती माझ्या हृदयात शयन करत आहे. असा भास झाला व अनेक वेळा बाहेर कपाळावर सुंदर उभा टिळा लावलेली कृष्णमूर्ती पण दिसत असे. हे सर्व राधाकृष्ण आई एकदा माझे पाय धरून ध्यानस्थ बसली होती त्याचा परिणाम तसेच वर वर्णन केलेल्या भावाचा परिणाम होता असे मी समजलो.

"तूं आहेस ते मी आहे' अथवा 'मी आहे ते तू आहेस" ह्या मला केलेल्या बोधाचा विचार करता जाणवते की ही बाबांची कृपा माझ्या शिरडीच्या सात दिवसांच्या

(एकांतातील) उपवासामुळेच झाली. शेवटच्या दिवशी रात्री भिंतीला टेकून बसलो त्यावेळी निद्रेत बाबा आविर्भूत होऊन मला एक पुडी देताना जाणवले. सकाळी उठून पाहता पुडी उघडी व तिच्यात गव्हाचे पीठ असलेले दिसले. परंतु स्वप्नाला स्वप्नप्रमाणेच मिथ्या समजून ती पुडी कदाचित मीच तेथे ठेवली असेन असे मानून त्याला महत्व दिले नाही. त्या पुडीत दोन चार चिमूट एवढं पीठ होते त्यातून एक चिमूट पीठ घेऊन बाबांचा प्रसाद समजून तोंडात टाकले. यानंतर काही दिवसांनी म्हणजे १९१६ साली जेव्हा माझी ज्ञानेश्वराची सात पारायण होऊन गेली होती तेव्हा मी बाबांना विचारले, "आता ज्ञानेश्वरी वाचू का?" तेव्हा बाबा म्हणाले, "आता पोथीचं काय काम? पोथी नको पोथीचे तर पीठ झालं. बाबांच्या उक्तींचा अर्थ असा होता की तुझ्या उपासाने प्रसन्न होऊन मी तुला प्रसादरुपाने पीठ दिले आहे. पीठ ज्यातून पोथीरूप भाकरी होते ती म्हणजे पोथीचे मूळ-गहन रहस्य ज्यातून एक पोथी होईल ते दिले आहे. आता तुला पोथीची अथवा पीठ म्हणजे आचार्यपदाची जरूर नाही. नंतर अनेक वेळा ज्ञानेश्वरी वाचण्याचा प्रयत्न केला पण अठरा अध्याय कधीच पुरे वाचून झाले नाहीत. अखेर संन्यास घेतल्यानंतर आनंदलो सन १९५५ मध्ये ते पुरे झाले.

(क्रमशः)

## तानसेनचे गुरु

अकबर बादशहा तानसेनच्या गाण्यावर इतका खूष झाला की त्याच्या मनात तानसेनच्या गुरुचे गाणे ऐकण्याची इच्छा उत्पन्न झाली. तेव्हां तानसेन अकबर बादशहाला त्याचे गुरु एका गुहेत तपश्चर्या करीत होते त्या गुहेजवळ घेऊन गेला.

तानसेनचे गुरु त्यावेळी समाधीस्थ होते. बराच वेळ गुरुवर्य बाहेर आले नाहीत तेव्हां तानसेनाने अपस्वरात गाणे म्हणायला सुरवात केली.

तेव्हां तानसेनाच्या गुरुची समाधी भंग झाली व ते बाहेर आले आणि म्हणाले - "मूर्खा! तू माझा शिष्य असून हे असे अपस्वर गायन करीत आहेस?" असे म्हणत गुरुने स्वतः तो राग म्हटला ते गाणे ऐकायला जंगलातली रानटी जनावरे जमली. अकबराला कमालीचा आनंद झाला.

घरी परत आल्यावर बादशाहने तानसेनला विचारले - "काय रे तुझे गाणे ऐकून रानटी जनावरे जमलेली मी कधी पाहिली नाहीत?"

बिरबल जवळच होता. म्हणाला - "तानसेनचा गुरु देवांच्या दरबारातला गवई आहे आणि तानसेन आपल्या दरबारातला गवई आहे!"

नामदेव महाराज पुण्यतिथी निमित्य —

# महाराष्ट्राचा भारतीय संत नामदेव



वास्तविक प्रत्येक दिवस पवित्र आहे, प्रत्येक दिवशी सूर्यनारायण नित्य नवा आहे. वेदांत एक सुंदर वाक्य आले आहे, 'नवो नवो भवति जायमानः' — रोज नवीन नवीन जन्म होतो आहे. कालचा मनुष्य आज नाही. आजचा उद्या नाही. आपल्याला भास होतो की, तोच मनुष्य आहे. जसा आपल्याला भास होतो की तीच नदी वाहते आहे. नदी तीच वाहते खरी, पण पाणी कालचे वेगळे होते आणि आजचे वेगळे आहे. जशी नदी तिच आहे असा भास होतो तसाच भास होतो की तोच मनुष्य आहे. पण हे खरेच नाही. सृष्टीत प्रतिक्षणी परिवर्तन चालले आहे. म्हणून प्रत्येक दिवस पवित्र आहे. तथापि सामाजिक संस्कारामुळे काही दिवस विशेष पवित्र मानले जातात.

## सातशे वर्षे कोणाचे स्मरण राहाणार?

आज फार मोठे पुढारी आहेत. कुणी राजकारणात आहेत, कुणी साहित्यात आहेत. सातशे वर्षांनंतर का त्यांचा पत्ता लागेल? सत्पुरुषांचे स्मरण सातशे वर्षे देशाला होत राहाणे ही काही सामान्य गोष्ट नाही. आजचे जे कोणी पुरुष राजकारणात आहेत, साहित्यात आहेत, सातशे वर्षांनंतर त्यांचे स्मरण राहील कीं नाही हे कोण सांगू शकेल? परंतु नामदेवांचे जे स्मरण आहे ते आम्हाला अविस्मरणीय आहे.

## नामदेव महाराष्ट्राचे तसेच पंजाबचेही!

नामदेवांचे अंतिम स्थान, मरण पंजाबात आहे अशी पंजाबी लोकांची समजूत आहे. महाराष्ट्राच्या लोकांना वाटते की नामदेव महाराष्ट्रात जन्मला तर तो महाराष्ट्रातच मेलेला बरा. म्हणून त्यांनी पंढरपूरला नामदेवांची पायरी बांधली आणि मानतात की नामदेवांनी तिथे समाधि घेतली. संभव आहे की नामदेवांनी मृत्यनंतर पंजाबातून काही रक्षा वगैरे

आणून तिचे विसर्जन चंद्रभागेच्या किनाऱ्यावर केले असेल. परन्तु महाराष्ट्राचा माणूस त्या युगात इतका दूर गेला. पायी यात्रा करीत गेला. आजच्या सारखी साधने त्याकाळी नव्हती आणि त्या ठिकाणी तो वीस वर्षे राहिला. सतत कार्य केले. हे त्याला वेड लागले म्हणून का तो तेथे राहिला? तो तेथे का राहिला हे समजण्यासारखे आहे!

## मुसलमानांचे आक्रमण थोपविणारा संत

ज्ञानदेवांच्या मृत्यूनंतर थोड्याच दिवसांनी अल्लाउद्दिन खिलजीचे महाराष्ट्रावर आक्रमण झाले. तत्पूर्वी महाराष्ट्र मुसलमानांच्या आक्रमणापासून मुक्त होता. ज्ञानदेव गेले होते समाधीत. ते समाधिस्थ झाले होते. नामदेव हजर होता. नामदेव ऐंशी वर्षे जगला आणि ज्ञानदेव २२ वर्षे जगला. म्हणजे ज्ञानदेवानंतर नामदेव जवळ जवळ पन्नास वर्षे राहिला. त्याने पाहिले की सगळीकडे इस्लामचा प्रचार चालला आहे. काही इस्लामाचे राजे तर आले आणि गेले. परंतु सूफी तत्त्वज्ञानी भारतात फिरत होते. ते महाराष्ट्रातही होते आणि परमात्मा एक आहे असे सांगत होते.

## इस्लामला विचारांनी पचविणारा महात्मा

नामदेवाने विचार केला की हा जो हल्ला आहे तो कसा परतवता येईल? त्यातला चांगला अंश ग्रहण केल्याशिवाय होणार नाही. 'इंद्राय तक्षकाय स्वाहा' म्हणून दोघांची आहुति दिली तर काय झाले? इंद्र अमर होता म्हणून तक्षकही अमर झाला, म्हणून इंद्रापासून तक्षकाला अलग केले तर तक्षकाला मारता येईल. तेव्हा समोरून जो हल्ला चालला आहे त्यांत काही गुण आहेत व काही दोष आहेत. त्यातले गुण घेतले पाहिजेत, म्हणजे तो हल्ला परतवता येईल. इस्लाममध्ये एक फारच मोठा गुण आहे. तो हा की, इस्लाम म्हणतो परमेश्वर एक आहे पण हिंदूमध्ये काय चालते? कुणी कुणाची आणि जो तो आपली उपासना श्रेष्ठ मानून चालला आहे. फकीर सांगत होते अल्लाह एक आहे, मानव एक आहे; त्याशिवाय ते उपासनेचे खंडन करीत होते आणि मूर्तीचे खंडन करीत होते. नामदेवाने विचार केला आपणसुद्धा एकच ईश्वर मानतो. परमेश्वराचे एकत्व तर आपणही मानतो. आपण दहा ईश्वर काही दिवस मानत नाही. हिंदूचे मत वेदामध्ये एका वाक्यात आले आहे, एकं सत विप्रा बहुधा वदन्ति। सत्य एक आहे, म्हणजे परमात्मा एक आहे. परमात्मा म्हणजे सत्य! आणि उपासक विप्र त्याची अनेकविध उपासना करतात. कोणी सूर्य, कोणी विष्णु, कोणी रुद्र अशा निरनिराळ्या उपासना करतात. अशी अनेक नावे उपासनेसाठी आहेत असे ते मानतात परंतु परमात्मा एक आहे, हा झाला वैदिक धर्म आणि इस्लाम काय म्हणतो?

एकं सत मूर्खाः बहुधा वदन्ति। सत्य म्हणजे परमात्मा आहे, आणि मूर्ख लोक त्याला नाना रूप मानतात. एवढा दोहोमध्ये फरक आहे. सत्य एक आहे याबद्दल दोहोंचा वाद नाही. पण हे म्हणणारे उपासक अनेक रूपे मानतात आणि इस्लाम म्हणणार मूर्ख अनेक रूपे मानतात. एवढा फरक आहे.

## हिंदू धर्मातही परमेश्वराचे एकत्व सत्य मानले आहे!

हिंदू धर्मातही परमेश्वराचे एकत्व मानले आहे. पण ते लोपल्यासारखे होते. आम्ही नाना देवतांच्या मागे लागल्यामुळे या देवतेचा उपासक त्या देवतेच्या दर्शनाला सुद्धा जाणार नाही, इतकी तयारी होती. म्हणून नामदेवाने विचार केला की एकत्वाचे प्रतिपादन केले पाहिजे. म्हणून नामदेव म्हणतात,

गणेश नमू तुझाचि देखणा।
म्हणूनी नारायणा नमन तुज।
सारजा नमू तरी ते तुझी गायनी।
म्हणून चक्रपाणी नमन तुज

गणेशाला नमन करावे तर तो तुझ्याच कृपेने बनलेला तुझेच रूप. शारदेला नमावे तर ती तुझीच गायनीकळा म्हणून चक्रपाणी तुला नमस्कार असो.

आपल्यामध्ये रीत आहे, आधी गणपतीला नमन करायचे मग शारदेला नमन करायचे. शारदेला नमन करावे तर ती तुझीच गीत गाणारी, म्हणून हे चक्रपाणी नमन तुला!

वेद नमू तरी तुझाचि स्थापिला!
म्हणूनी लक्ष्मीकांता नमन तुज!

'ओम नमोजी आद्या वेद प्रतिपाद्या' अशी ज्ञानेश्वरांनी सुरवात केली. वेदाला नमस्कार करावा तर तोहि परमेश्वराचे गीत गातो. म्हणून,

नामा म्हणे भेटी झाली राया!
कोण गणी वाया सेवकांसी!

नामा म्हणतो रायाची भेट झाली मग सेवकाची गणना कोण करणार! यात त्याने खुबी काय केली?

## उपासनेची स्तुती करूनही एकदेवाचे श्रेष्ठत्व साधले

स्मरण तर सर्वांचे केले. गणेश शारदा सर्वांचे स्मरण केले पण सांगितले की हे सर्व सेवक आहेत आणि तो स्वामी आहे. स्वामीची गाठ पडल्यानंतर, राजाची मुलाखत झाल्यानंतर त्याच्या घरच्या चाकराला पट्टेवाल्याला कोण पुसतो? त्याला म्हणायचे आहे की, जोवर राजाची भेट झाली नाही तोवरच या सेवकांचे महत्व आहे, काम आहे. हे परमेश्वराच्या भेटीसाठी मदत करतात. सेवकांमार्फतच राजाकडे जाता येते; परंतु परमेश्वराच्या साक्षात दर्शनाचा अनुभव आल्यानंतर यांची गरज काय? नामदेवाने इथे बहुदेवतांचे मंडनही केले व खंडनही केले. मोठ्या खुबीने त्या भजनावर लिहिले, 'इस्लाम!' इस्लामची भूमिका अशी आहे. ही भूमिका नामदेवाने स्वीकारली. म्हणून जिथे जिथे इस्लामचा प्रचार होता तिथे तिथे यात्रा करीत नामदेव पोहोचला.

## जेथे ज्ञानदेव, नामदेव तेथेच विठ्ठल

ज्ञानदेव आणि नामदेव दोघे यात्रेला गेले. ती ज्ञानदेवांच्या प्रचाराची यात्रा होती. ती नामदेवाची यात्रा नव्हती. नामदेव त्याचा सहयोगी होता आणि ती महाराष्ट्रात थोड्या ठिकाणी झाली. पण जेथे जेथे इस्लामचा प्रचार झाला, तेथे नामदेव पोहोचला. इस्लामचा

प्रचार सगळ्यात जास्त पंजाबात होता. म्हणून नामदेव तेथे गेला व त्याने तेथे अड्डा लावला. तेथे तो वीस वर्षे राहिला. महाराष्ट्रातून पंजाब १२०० मैल, तो पायी पायी गेला आणि त्याने अखंड २० वर्षे प्रचार केला. का केला? त्या ठिकाणी त्याने पाहिले की, प्रत्येक गावात एक फकीर फिरत आहे. आणि ईश्वर एक आहे असे समजावून सांगत आहे. नामदेवाने विचार केला ही एकता तर आपल्याही धर्मात आहे. पण ती सांगितल्याशिवाय कशी कळणार? त्याने एक भजन केले आहे. त्यात एका बाजूने हिंदूला टोला हाणला व दुसऱ्या बाजूने मुसलमानाला.

हिंदू पूजे देहुरा, मुसलमाणु मसीति।
नामे सोई सेविआ, जह देहुरा न मसीति।

नामदेवाने ज्याची पूजा केली तो देऊळीही नाही व मसीतिही नाही. हिंदू देवळाची पूजा करतात आणि देवाला विचारतात, मुसलमान मशिदीची पूजा करतात, मशिदीतच परमेश्वर आहे असे मानतात. म्हणजे तुम्हीसुद्धा मूर्तिपूजक आहात, म्हणून दोन्हीची पूजा सोडा आणि अन्तर्यामी जो भगवान आहे त्याचेकडे वळा असे सांगत नामदेव फिरला. त्याचा परिणाम असा झाला की, इस्लामची जी लाट आली होती ती थोपविली गेली. यानंतर नानक आला त्याने तेच सांगितले. नानकानंतर कबीर आला त्याने हिंदू व मुसलमान यांची एकता किती आहे ते समजावून सांगितले. आणि सर्वात मोठा प्रहार केला तो तुलसीदासांनी. नामदेव, नानक, कबीर व तुलसीदास या चारांनी मिळून ही लाट परतवली. फार मोठे कार्य केले.

**नामदेव, नानक, तुलसीदास, कबीर हे हिंदुत्वाचे रक्षक**

तुमच्या इतिहासात याचा पत्ता लागणार नाही. तुम्हाला हा इतिहासच माहित नाही. इतिहासात तुम्हाला शे-पाचशे राजांची नावे शिकवितात आणि म्हणतात लक्षात ठेवा. पण शिकविणाऱ्यांना माहित असते की इतकी नावे काही विद्यार्थ्यांना लक्षात ठेवता येणार नाहीत. म्हणून मग ३३ प्रतिशत लक्षात ठेवा म्हणतात, व तेवढ्यात पास करतात असे तुमचे चालले आहे. तो तुमचा इतिहास जनतेला माहीत नाही. जनतेला फक्त नामदेव, तुकाराम, एकनाथ हीच नावे माहीत आहेत. जनतेमध्ये श्रद्धा आहे आणि आपले खरे कल्याण करणारे कोण आहेत हे जनता ओळखते.

**हिंदीमधील पहिला अभिजात कवि**

ऐतिहासिक दृष्टीने विचार केला तर मौज आढळते ती ही की, नामदेव बहुधा हिंदीमधला पहिला अभिजात उत्तम लेखक आहे. नामदेवापूर्वी काही भाटांची गाणी वगैरे झाली होती पण लेखक असा नामदेवच. नामदेवानंतर २०० वर्षांनी नानक आला. नामदेवाने हिंदी भजने लिहिली त्यात मराठीचे मिश्रण होते.

इभै विठ्ठल उभै विठ्ठल
विठ्ठल बिनु संसार नही

इथे विठ्ठल आहे, तेथे विठ्ठल आहे. विठ्ठलावाचून संसार नाही. विठ्ठल आहे पंढरपुरात आणि नामदेव गातो पंजाबात. विठ्ठलाचं नाव त्यांनी पंजाबात गायले परिणाम काय

झाला? २०० वर्षांनंतर नानक आला. नानकाची गीते चालली. नंतर १०० वर्षांनी गुरु अर्जुन आला. त्यांनी भजनाचे संकलन केले. त्यात नानकांची भजने होतीच पण त्यात नामदेवाची भजने घातली. नामदेवानंतर २० वर्षांनी नानक आणि १०० वर्षांनी अर्जुन. त्यानंतर भजनांचे संपादन झाले. म्हणजे ३०० वर्षे नामदेवांची भजने समाजात चालत असणे ही काय लहान गोष्ट आहे?

सिंकदर पंजाबाला जिंकू शकला नाही, पण नामदेव जिंकू शकला. प्रेमाने, प्रेमाने जिंकणारा नामदेव!

नामदेवाच्या जीवनाचा सर्वात मोठा पैलू म्हणजे 'प्रेम'. नामदेवाइतका प्रेमळ कोण झाला माहीत नाही! सर्वच साधुसंत प्रेमळ असतात. पण नामदेवाने कमालच केली आहे.

### परमेश्वराशी गप्पागोष्टी करणारा भक्त

नामयाचे प्रेम केशवचि जाणे।
केशवासी राहणे नाम्यापायी।
केशव तो नामा। नामा तो केशव॥

प्रेम भक्ति भाव मागतसे असे नामदेव म्हणतो! मागतो प्रेम अणि भक्ति! विष्णुदास नामा, उभा केशवदारी। प्रेमाची शिदोरी मागतसे। मला थोडं प्रेम द्या म्हणतो. भगवंताशी नेहमी नित्य गोष्टी बोलणारा नामदेव आहे. जसे तुम्ही आम्ही गोष्टी बोलतो. नामदेवाची प्रार्थना ऐकून परमेश्वर बोलतो ते सुद्धा नामदेव लिहितो.

घेरे घेरे नाम्या दिले माझे प्रेम।
घोकी माझे नाम सर्वकाळी।

देव म्हणतो 'अरे नामदेवा, घे माझे प्रेम, मी तुला दिले. मागणी होती ना तुझी प्रेमाची मग घे!

शिरावर हात ठेवीतसे माथां।
अभिमान तुझा गेला म्हणूनी।

नामदेव म्हणतो देवाने माझ्या शिरावर हाथ ठेवून मला तुझा अहंकार गेला असं मला आश्वासन दिलं. असा सदा सर्वदा भगवत साक्षात्कार, भगवत दर्शन, भगवत सान्निध्य नामदेवाने अनुभवले.

कित्येकांना गंमत वाटते. ही गंमत नाही खरंच आहे. देवाचा शब्द सेंट फ्रांसिस ऑफ असीसीने ऐकला होता. आधुनिक काळातील उदाहरण द्यायचं म्हणजे रामकृष्ण परमहंस. तो दक्षिणेश्वरचा पागल देवाशी बोलत होता.

### नामदेवाचा स्पर्श हृदयपरिवर्तन करणाराच!

पण नामदेवाचा जितका परिचित होता देव, तितका क्वचितच कोणाचा परिचित असेल. नामदेवाचा स्पर्शच मुळी हृदयपरिवर्तन करणारा झाला. तो जेथे जेथे जाई तेथे हृदयाला स्पर्श करी, परिवर्तन करी. त्याची बायको महा संत होती, त्यांची मुले संत होती, त्याच्यापाशी राहिलेली जनी दासी संत आपल्या स्पर्शाने कुटुंबाचे परिवर्तन करणारा विरळा! एखाद्या माणसाविषयी बाहेर सर्वांना आदरभाव असतो पण त्याला कुटुंबातली माणसे वश होत नाहीत. पण नामदेवाच्या कुटुंबातली तमाम सगळी माणसे त्याला वश झाली होती.

## नामदेवाने सर्वांना नामदेव करण्यात यश मिळवले

नामदेवाचं प्रेम सामूहिक होतं. मी एकटा नामदेव असं नाही, आम्ही सगळे नामदेव!

युगे अठ्ठावीस विटेवरी उभा।
वामांगी रखुमाई दिसे दिव्य शोभा।
आषाढी कार्तिकी भक्तजन येती
चंद्रभागेमाजी स्नान करिती।
दर्शनहेळामात्रे तया होय मुक्ति
केशवासी नामदेव भावे ओवाळिती।।

हे जे वाक्य आहे त्याचा अर्थ चिंतन केल्याशिवाय कळणार नाही. नामदेव स्वतःविषयी कधीही बहुवचनात बोलत नाही. नाम्या म्हणे, नामा म्हणे, किंवा फार झाले तर नामदेव! नेहमी एकवचन परंतु या ठिकाणी बहुवचन आहे.

केशवासी नामदेव भावे ओवाळिती।

पंढरपुरला असंख्य भक्तजन येतात, देवाला आळवतात, ओवाळतात, ते सर्व नामदेव आरती करत असतात. नामदेव आपल्या ठिकाणी समूहाची कल्पना करतो आणि सबंध समूह परमेश्वराची आरती करतो. म्हणजे हे सगळे नामदेवच एकत्र झाले आहेत, अशी त्याची व्यापक समूह भावना आहे. समष्टीयुक्तप्रेम आहे. त्याशिवाय अहंकार लोप होणार नाही.

अहंकाराला कापायचा असेल तर समूहांत लीन झाल्याशिवाय गतीच नाही.

## नाम म्हणजे साहित्य दर्शन म्हणजे अध्यात्म

एका ठिकाणी नामदेव भगवंताचे सुंदर वर्णन करतो. म्हणतो तुझे नाव सुंदर आहे. रूप सुंदर आहे. तुझे नाव सुंदर म्हणजे काय? नाम म्हणजे साहित्य! परमेश्वराला वाहिलेले साहित्य फार सुंदर आहे. रूप सुंदर आहे. म्हणजे सबंध सृष्टी सुंदर म्हणजे सायन्स सुंदर आहे. ईश्वराचा शोध करणारं सायन्स सुंदर आहे. 'दर्शन' म्हणजे अध्यात्म, फिलॉसफी सुंदर आहे. नामा म्हणे तुझे अवघेचि सुंदर, आता काय तुम्ही सांगाल ते सांगा. पुढे काय म्हणतो तो? तुझे सर्व सुंदर आहे, बरवें तुझे अवघेचि बरवें। पण त्याहूनि बरवें प्रेम तुझे। तुझ्या नामापेक्षा, साहित्यापेक्षा, सायन्सपेक्षा, सृष्टीपेक्षा, फिलॉसॉफीपेक्षा तुझे प्रेमच मोठे सुंदर आहे. अशा प्रकारे नामदेव केवळ प्रेममयच आहे.

ज्ञानदेव आला, नामदेवाला म्हणाला, "आपण यात्रेला जाऊ, आपण एकेकटे काम करतो ते पुरेसे नाही, आता आपण जर लोकात जाऊ, लोकांना काही गोष्टी सांगू, समाजात जाऊन तेथील दुधात थोडं दही मिसळवू आणि त्या दुधाचं दही करू. जाऊन येऊ चला यात्रेला! नामदेव म्हणाला, "मी जरा देवाला विचारून येतो', आणि देवासमोर उभा राहून, डोळ्यात अश्रू आणून देवाला विचारतो, "ज्ञानदेव मला यात्रेला बोलावतो आहे पण तुझा वियोग मी कसा सहन करीन?' देव म्हणाला, 'तो बोलावतो आहे तो संतपुरुष आहे, महापुरुष आहे तो. माझा अवतार आहे. तू त्याच्याबरोबर जा आणि तुम्ही दोघे जेथे जाल तिथे तुम्हा दोघांबरोबर तिसरा मी असेन.' असे देवानी सांगितल्याबरोबर तो ज्ञानदेवाबरोबर गेला यात्रेला.



ज्ञानदेव नामदेव नाथ तुकोबा समर्थ
ज्ञानी प्रेमी शांत विरागी कर्म-रत

ज्ञानदेव होता ज्ञानी, नामदेव प्रेमी , एकनाथ महाराज शांत, तुकाराम विरक्त, विरागी होता. समर्थ (रामदास) कर्मरत होते. कर्मयोगी होते. असे हे पाच पुरुष महाराष्ट्रांत होऊन गेले.

**– पूज्य विनोबा भावे**

# गुरुपौर्णिमा

**(चाल - दत्तदर्शनासि चला मोद जाहला)**

गुरुपौर्णिमेचा सुदिन आज उगवला
साई-दर्शनासी चला सकळ मिळुनिया ॥ धृ. ॥
शिरडी गांवी पुण्यक्षेत्री वसती श्री साई
सन्निध वाहे गोदामाई पाप हारिणी
साईदर्शन घेण्यालागी अधीर जीव झाला ॥ १ ॥
मशिदीपाशी धुनी जवळी बसते गुरूमाऊली
तुम्हा आम्हांवर धरते अपुल्या प्रेमाची साऊली ।
जयगुरूराया जय महाराजा आले तव पाया ॥ २ ॥
कल्पतरूच्या छायेखाली जमली ही मंडळी
वांछिल जे जे मिळेल त्याला भरूनी घ्या झोळी
आज पर्वणी भाग्य आमुचे आले उदयाला ॥ ३ ॥
गुरुमायेच्या पावनतीर्थी सचैल स्नान करू
नामस्मरणी रंगुन जाऊ स्वतःलाच विसरू
अनुपम हा आनंद लुटूया धन्य होऊ आजला ॥ ४ ॥
तीर्थ घेऊनी लावू विभूति प्रसाद ग्रहण करू
एकाग्र नयने पाहू गुरूला शिर चरणी ठेऊ
प्रसन्नमूर्ती मधुर हास्य ते हृदयी साठवू या ॥ ५ ॥
गुरूचरणाची धूळ मस्तकी मिरवू अभिमाने
सर्वस्वाची गुरूदक्षिणा अर्पूनिया प्रेमे
अन्य नको तव आशिर्वचने धन्य करी मजला ॥ ६ ॥

**— सौ. उषा भा. जोशी**
साईप्रसाद, ४२ श्रीकृष्ण नगर
बोरिवली (पूर्व)
मुंबई - ४०० ०६६

# श्री. खापर्डे यांची शिरडी दैनंदिनी

अनुवादक- साईनंद

मंगळवार, दि. २६-१२-१९११

मी सकाळी लौकर उठलो आणि काकड आरतीला हजर राहिलो आज साई महाराज काहीसे निराळ्याच मनस्थितीत होते. त्यांनी आपला सटका उचलला; आणि आपल्या सभोवतालच्या परिसरात ते सटका जमिनीवर आपटू लागले. एवढ्यात अशा परिस्थितीत ते चावडीच्या पायऱ्या उतरून गेले. ते दोनदा माघारी आले आणि दोनदा पुढे गेले आणि जोरजोराने बोलू लागले. मी परतल्यावर प्रार्थना केली, स्नान उरकले आणि माझ्या खोलीसमोरील व्हरांड्यात बसलो. साई महाराजांना मी बाहेर जातांना पाहिले. आज पुण्याचे गोखले वकील आले. श्री गणपती बाबा ज्यावेळी या जगात भौतिक कार्य करीत होते त्यावेळी त्यांनी माझ्या पत्नीला शेंगावला पाहिले होते. त्यांचेबरोबर एक भारतीय खेळणीविक्या व त्याचेबरोबर आणखीन दुसरे कुणीतरी होते. त्यांनी मला दुपारचे आरतीनंतर आणि मी भोजन केल्यानंतर पाहिले. मी काही वेळ लवंडलो. तिसऱ्या प्रहरी मी उठलो आणि श्री. महाजनी, डॉ. हाटे आणि इतरांचे बरोबर गप्पा मारीत बसलो. दुपारी आम्ही साई महाराजांना चावडीकडे बघितले आणि नंतर काळोखाचे सुमारास ते रपेट करण्यासाठी बाहेर आले तेव्हा पाहिले. ते फार उदार वृत्तीचे आहेत. आज ते माझा मुलगा बळवंत बरोबर बोलले. दर्शनासाठी आलेल्या सर्वांना त्यांनी परतवले तरी त्यांनी त्याला आपल्या जवळ बसवून ठेवले. आता संध्याकाळी कुणाही पाहुण्याला येऊ देऊ नकोस असे त्यांनी त्याला सांगितले. आजच्या पुरती माझी काळजी तू घे त्या बदल्यात साई महाराज तुझी काळजी घेतील. आज माधवराव देशपांडे आजारी पडले. त्यांना सडकून सर्दी झाली होती. ते अंथरूणाला खिळले नव्हते तरी बराच वेळ अंथरूणात पडून होते. संध्याकाळी भीष्मांचे भजन आणि दिक्षितांचे त्यानंतर रामायण नित्याप्रमाणे झाले. आख्यान ऐकण्याकरिता श्री. भाटे आले होते. आज आम्ही सुंदरकांड सुरू केले.

बुधवार २७-१२-१९११

मला काल रात्री झोप लागली नाही परंतु मी सकाळी लौकर उठलो, प्रार्थना केली, स्नान उरकले व नेहमीपेक्षा लौकर कपडे चढविले. आरतीनंतर दुपारी ३ वाजता मी भोजन घेतले व लवंडलो खरा पण मला छान झोप लागली. दुपारी बऱ्याच जणांनी साई महाराजांचे दर्शन घेण्याचा प्रयत्न केला परंतु बोलण्याकडे त्यांचा कल नव्हता म्हणून सर्वांना लगोलग त्यांनी परतवले. हे समजल्यावर मी गेलोच नाही व वाचत बसलो. अंधार पडता पडता रपेट मारण्यासाठी बाहेर पडलो तेव्हा आणि पुन्हा शेजारतीचे वेळी आम्ही त्यांचे दर्शन घेतले. आज भीष्मांच्या भजन कार्यक्रमात बऱ्याच मंडळींनी भाग घेतला होता म्हणून की काय ते बराच वेळ लांबले. एक तरुण मुसलमान इतका छान गाईला की त्याने मलाही चकीतच करून सोडले. भजनानंतर दिक्षितांचा रामायणाचा कार्यक्रम झाला.

गुरुवार २८-१२-१९११

मी सकाळी उठलो. प्रार्थना केली व डॉ. हाटे व श्री. आर.डी. मोरेगावकर यांना परतण्याची परवानगी मिळाल्याचे कळले. तेव्हा ते गेले; आणि त्यानंतर लागलीच नानासाहेब चांदोरकर, सी.व्ही. वैद्य आणि श्री. नाटेकर "हंस" ही मंडळी आली. मी श्री. नाटेकरांचे बरोबर बराच वेळ गप्पा मारीत बसलो. आणि नंतर चांदोरकर व वैद्य जवळच्याच तंबूत होते त्यांना भेटण्यासाठी गेलो. श्री. नाटेकर यांनी हिमालयात दूरवर प्रवास केला होता आणि दीक्षा घेऊन शिष्यत्व पत्करले होते. त्यामुळे त्यांचे संभाषण नेहमी बोधात्मक असे. सी.व्ही. वैद्यांच्या एका डोळ्यात काहीशी कसूर होती तो लालभडक होत असे. श्री. चांदोरकर हे नेहमीच खिलाडूवृत्तीचे. मारूती म्हणून ज्यास संबोधले जाई ते त्र्यंबकराव आज भारी संतापलेले दिसत होते. ते आज पुजेच्या वेळी हजर नव्हते. ते बरेच उदासीन दिसत होते. माधवराव देशपांडेना आज बरे होते. आज जवळ जवळ दिवसभर ते उभ्या पायावर होते. दिक्षित आज आलेल्या अनेक पाहुण्यांच्या भेटीगाठींच्या उद्योगात आहेत. श्री. चांदोरकर आज कल्याणला परत गेले. आपण पुढील रविवारी परत येऊ असे ते म्हणाले. मी दुपारी श्री. नाटेकरांचे बरोबर बोलत बसलो अगदी जवळ जवळ साई महाराज संध्याकाळचे रपेटीसाठी बाहेर पडेतोपर्यंत मी बसलो. त्यांनी आज आपल्या जवळ बसण्यासाठी म्हणून कुणालाच परवानगी दिली नाही. उदी देऊन त्यांनी सर्वांना परतवले. नाटेकर राधाकृष्णा बाईकडे गेले आणि ही संध्याकाळ त्यांनी तिथेच घालवली. ती फार चांगली गाते आणि भजन तर उत्कृष्ट म्हणते. आमचे कडील भीष्मांचे भजनाचे कार्यक्रमात बऱ्याच मंडळींनी भाग घेतला होता त्यानंतर दिक्षितांच्या रामायणाचा कार्यक्रम झाला. मोरशीहून दादा गोळे येथे आले आहेत. माझे एक अशील रामरावही येथे आहेत मी एक खटला पत्र लिहावे अशी त्यांनी इच्छा प्रगट केली खरी परंतु त्यासाठी वेळच नाही.

(क्रमशः)

## श्री साईलीला दिवाळी अंक १९८६

भक्तांना आलेल्या श्री साईबाबांच्या विविध चमत्कारिक अनुभवांनी भरगच्च १२८ पानांचा वाचनीय अंक १ नोव्हेंबर १९८६ रोजी प्रसिदध होईल.

भक्तांच्या सामान्य अनुभवांना जसे- कान दुखू लागला उदी घातली. पोट दुखू लागले उदी पाण्यातून घेतली दुखणे बंद अशा अनुभवांना अंकातून प्रसिद्धी दिली जाणार नाही. अनुभव प्रखर व ताजे हवेत. दादर कार्यालयाकडे १० ऑगस्ट पर्यंत थोडक्यात कागदाचे एकाच बाजूस लिहून सुवाच्च अक्षरात नाव व पत्यासह पाठवा.

— का. संपादक

# साई दरबारातील नवरत्ने (१)

## साईभक्त श्री. काकासाहेब दीक्षित

६० व्या पुण्यतिथी निमित्य स्मरण



*साई दरबारातील नवरत्ने ही माहितीपूर्ण लेखमाला या अंकापासून सुरु करीत आहोत. हा लेख श्री साई बाबांचे काळातील परमभक्त श्री. हरी सीताराम उर्फ काकासाहेब दीक्षित यांच्या ५ जुलै रोजी येणाऱ्या ६० व्या पुण्यतिथी निमित्य प्रसिद्ध करीत आहोत. आज पार्ल्यातील एका रस्त्याला श्री. दिक्षित मार्ग असे नाव देऊन त्यांची स्मृती चिरंतन केली गेली आहे.*

श्री. हरी सीताराम उर्फ काकासाहेब दीक्षित हे श्रीसाईबाबांचे एक निस्सीम भक्त होते. त्यांनी आपल्या उतार वयात बाबांचे शिष्यत्व पत्करुन आपली आध्यात्मिक उन्नती करून घेतली होती.

श्री. काकासाहेबांचा जन्म इ. स. १८६४ मधे खांडवा येथे वडनगरा नागर ब्राह्मण कुळात झाला होता. काकांचे वडीलबंधू रावबहादूर राजाराम सीताराम दीक्षित हे नागपूरातील एक नामांकित नागरिक होते. ते कर्तबगार कंत्राटदार होते व त्यांनी मिळविलेल्या लौकिकामुळे सरकारने त्यांना 'रावबहादूर' ही बहुमानाची पदवी दिली होती. ते ऑनररी मॅजिस्ट्रेट होते. त्यांचे दोन्ही पुत्र मोतीभाऊ व मोरुभाऊ बॅरिस्टर होते. पण ते दोघेही अकाली मरण पावले. काकासाहेबांचे धाकटे बंधू सदाशिवराव हे बी.ए.एल्.एल्.बी. होते. ते कच्छ संस्थानचे दिवाण होते.

काकासाहेब दीक्षितांचे प्राथमिक व दुय्यम शिक्षण खांडवा, हिंगणघाट व नागपूर येथे झाले. इ. सन १८७८ म्हणजे वयाच्या चौदाव्या वर्षी ते नागपूरच्या सिटी हायस्कूलमधून मॅट्रिक्युलेशन परीक्षा पहिल्या वर्गात उत्तीर्ण झाले व त्यांनी दोन शिष्यवृत्या मिळविल्या. नंतर मुंबईच्या विल्सन महाविद्यालयातून पी.इ. पास झाल्यावर ते एल्फिन्स्टन महाविद्यालयात गेले व तेथून एकोणिसाव्या वर्षी बी.ए.ची परीक्षा उत्तीर्ण झाले, व त्यांनी धीरजलाल मथुरादास शिष्यवृत्ती मिळविली. नंतर एल्.एल्.बी. चा अभ्यास केला. सॉलिसिटरची परीक्षा त्यांनी दिली. काही दिवस गव्हर्नमेंट सॉलिसिटर्सतर्फे 'लिटल कंपनी'त काम केल्यावर त्यांनी आपली स्वतंत्र सॉलिसिटर्सची पेढी उघडली. त्यामुळे त्यांनी खांडवा, नागपूर सोडून मुंबईस विलेपार्ले येथे आपला कायम निवास केला. एक हुशार नामांकित सॉलिसिटर म्हणून इंग्रजकाळात ते प्रसिद्धीला आले. काकासाहेब हे नागर ब्राह्मणातले पहिले सॉलिसिटर होत. महाराष्ट्र ब्राह्मणांत पहिले सॉलिसिटर म्हणून रावबहादूर धोंडो शामराव गरुड यांचे नाव त्यावेळी घेतले जात असे. भावनगर एक्सपोझर्स, पुणे वैभववाडी राजद्रोहाचा खटला, लो. टिळक व ग्लोब, लो. टिळक व टाईम्स ऑफ इंडिया, जी.आय.पी. (सेंट्रल रेल्वे) रेल्वेच्या सिग्नलर्स लोकांनी केलेला संप इत्यादीचे महत्त्वाचे खटले काकासाहेबांनीच चालविले, त्यामुळे त्यांचे नाव खूपच गाजले. पुढे काकांनी सार्वजनिक कार्यातही पडण्याचे ठरविले. १८९६ साली गिरगाव वॉर्डतर्फे ते मुंबई म्युनिसिपल कॉर्पोरेशनच्या निवडणुकीस उभे राहिले व यशस्वीपणे निवडून आले. तत्कालीन पालिकेच्या कितीतरी समित्यांवर त्यांची नेमणूक करण्यात आलेली होती. कॉर्पोरेशनमध्येही त्यांनी चांगला लौकिक मिळविला. काकांची कर्तबगारी, काम करण्याची हातोटी व सचोटी, निरलसता, स्पष्टवक्तेपणा इ. गुण त्यावेळचे भारताचे सिंह नामदार सर फेरोजशहा मेथा यांना दिसून आली आणि म्हणूनच की काय, त्यांनी काकांना आपल्या अनुयायात सहभागी करून घेतले. नेमस्त राजकारण काका फेरोजशहांपासून शिकले. मुंबई विद्यापीठाचे ते फेलो होते. तसेच दि इंडियन नॅशनल कॉंग्रेसचे (राष्ट्रीय सभा) ते एक महत्त्वाचे घटक होते. तसेच मुंबई सरकारी कौन्सिलचे सभासद होऊन नामदार दीक्षित या नावाने ते खूप प्रसिद्धीस आले. पुढे परमार्थाकडे त्यांचे मन वळले नसते. तर काकासाहेब

आणखीन खूप पुढे गेले असते. गृहस्थाश्रमात त्यांनी चारीधाम यात्रा केल्या, व १९०६ साली विलायतेची पण सफर केली. श्रीसाईनाथ महाराजांशी त्यांचा निकट संबंध आला व ते त्यांच्या चरणी रमले, ते कायमचेच. शिरडीस ते वानप्रस्थ झाले.

**श्रीसाईबाबांचे दर्शन आणि त्यांचा परिचय :**

१९०९ सालापर्यंत साईबाबा हे नाव काकासाहेबांना माहीत नव्हते. त्यांचे दर्शन कसे झाले याची हकीकत श्रीसाईचरित्र अध्याय ५१ मध्ये आलेली आहे, ती थोडक्यात अशी- श्रीनानासाहेब चांदोरकर, काकासाहेबांचे जुने स्नेही, त्यांना लोणावळ्यास भेटले. नानासाहेबानी श्रीसाईबाबांची इत्यंभूत सर्व हकीकत त्यांना सांगितली आणि श्रीसाईबाबांच्या दर्शनाविषयी त्यांचे मन वळविले. पुढे काही काळानंतर मुंबई धारासभेच्या निवडणुकीसाठी मते मिळविण्यासाठी काकासाहेब अहमदनगरास त्यांचे स्नेही काकासाहेब मिरीकर यांचे घरी गेले. त्यांचे चिरंजीव बाळासाहेब मिरीकर (कोपरगावचे मामलेदार) हेही तेथे आले. पितापुत्र मिरीकरांनी श्यामा (माधवराव देशपांडे - बाबांचे निकटवर्ती भक्त) आणि बाबांची छबी (तसबीर) यांच्या सह काकासाहेबांना शिरडीस पाठविण्याचा घाट घातला. आणि त्याप्रमाणे काकासाहेब दुसरे दिवशी सकाळी दहा वाजण्याच्या आत शिरडीस पोचले. त्याचवेळी श्री. नानासाहेब हेही शिरडीस आले, असा योगायोग होता. या दर्शनाविषयी हेमाडपंत श्रीसाईसच्चरितांत (अध्याय ५१) असे वर्णन करितात की —

"पुढे होता साईंचे दर्शन। दीक्षितांचे द्रवले मन॥
नयन झाले अश्रुपूर्ण। स्वानंद-जीवन ओसंडले॥९० ॥
मीही तुझी पाहुनी वाट। पुढे शाम्यास पाठविला थेट॥
नगरास तुझी घ्यावया भेट। वदले मग स्पष्ट साई तया॥९१॥
रोमहर्षित दीक्षितशरीर। कंठी दाटला बाष्पपूर॥
चित्त जाहले हर्षनिर्भर। घर्म सर्वांगी दरदरला॥९२ ॥
देह सूक्ष्म कंपायमान। चित्तवृत्ति स्वानंदनिमग्न॥
नेत्र पावले अर्धोन्मीलन। आनंदघन दाटला॥९३ ॥
आज माझी सफळ दृष्टि। म्हणोनि चरणी घातली मिठी।
मना धन्यता वाटली मोठी। आनंद सृष्टी न समावे॥९४ ॥

— पुढे याचा परिणाम किंवा पर्यवसान काय झाले हेही हेमाडपंतांनी थोडक्यात सांगितलें आहे —

पुढे वर्षांची वर्षे गेली। साईचरणी निष्ठा जडली॥
पूर्ण साईची कृपा संपादिली। सेवेसी वाहिली निज काया॥ ९५॥
यथासांग सेवाही चांगली। करण्यासाठी मठीही बांधिली॥
शिर्डीत बहुसाल वस्तीही केली। महती वाढविली साईची॥९६॥

हें थोडक्यात, पण मुद्देसूद व बरोबर असे काकासाहेबांच्या शिरडीजीवनाचें वर्णन आहे असे कोणीही म्हणेल. या वेळेपर्यंत काकासाहेब, 'हरिभाऊ, 'भाऊसाहेब' या नावाने

प्रसिद्ध होते. पण श्रीसाईबाबांनी त्यांना '**काका**' या नावाने संबोधिले. तेव्हापासून ते 'काका-काकासाहेब' या नावाने पाचारले जाऊ लागले आणि तेच त्यांचे नांव प्रसिद्ध झाले.

योग्य सत्पुरुषाची गाठ पडल्यावर, त्यांनी शिरडीयात्रा आणि श्रीबाबाचे दर्शन याविषयी सर्व हकीकत आपले स्नेही अण्णासाहेब दाभोलकर आणि श्री हरी नारायण आपटे सुप्रसिद्ध कादंबरीकार पुणे, यांना कळविली. यापैकी अण्णासाहेब दाभोलकर हे महाराजांचे निस्सीम भक्त बनले. श्री. हरी नारायण आपटे दोन तीनदा शिरडीस गेले, परंतु त्यांची साईंच्या ठिकाणी श्रद्धा जडली नाही. मुंबईचे रा. ब. पाध्ये हेही काकासाहेबचे स्नेही, त्यांनाही सर्व हकीकत कळविण्यात आली तरी ते शिर्डीस गेले नाहीत.

दिवसेंदिवस काकासाहेबांना शिरडी इतकी आवडू लागली की, त्यांचा बहुतेक सर्व वेळ तेथेच जाऊ लागला. श्रीबाबांच्या प्रत्येक शब्दात व कृतीत कांही तरी उपदेश असे. काकासाहेब त्यांचे पूर्ण मनन व आकलन करीत असत आणि त्यातील मर्म हुडकून काढीत असत. श्रीबाबांच्या गोष्टींचा व उद्गारांचा काकासाहेब संग्रह करीत असत. अशा टिपणांचा संग्रह मोठा होता, पण त्यांच्या निधनानंतर त्याचा शोध केला तरी तो सर्व मिळाला नाही. जितका कांही मिळाला तो महाराजांचे अनुभव, बोधपद्धती-बोल या सदराखाली श्री साईलीलेत प्रसिद्ध झाला आहे. महाराजांविषयी इतके सूक्ष्म निरीक्षण दुसऱ्या कोणी केले नसेल! महाराजांचेही काकासाहेबांवर उत्कट प्रेम होते. महाराजांनी त्यांना अनेक कसोट्या लावून निरखून, पारखून नंतर त्यांचेवर प्रेम केले. या कसोट्यांपैकी एक कसोटी 'बोकडाची हत्या' नमुन्यासाठी येथे देत आहे. ती येणेंप्रमाणे — श्री साई-चरित्र अध्याय २३ यात सांगितलेली.

एकदा एक कौतुक वर्तलें ते असे. कोणी एकाने एक बेवारशी, दुर्बळ आणि आसन्नमरण असा एक बोकड मशिदीत आणून सोडला. त्यावेळी मालेगावचे पीरमहमद उर्फ बडेबाबा, साईबाबांजवळ बसले होते. या बडेबाबाचें प्रस्थ बाबांजवळ फार असे. तो नेहमी बाबांच्या उजव्या बाजूस बसे. जेवणाची पाने मांडून सर्व तयारी झाली की बाबा त्याला आदराने हाक मारीत आणि तो वर येऊन बाबांच्या डाव्या हाताच्या पानावर बसे. तो बाहेर जावयास निघाला, की बाबा त्याला शंभर पावले पोचवावयास जात. दक्षिणेच्या जमलेल्या रकमेतून बाबा रोज त्याला पन्नास (५०) रुपये देत. अशा या बडेबाबाला बाबानी सांगितले की दे — त्या (बोकडा) बळी। निर्दाळी एका प्रहारें;'' (ओवी १११), तेव्हा बडेबाबांनी उत्तर दिले की कैसा बे काटना इसकूं खाली'' (ओं. १२८) तेव्हा बाबांनी श्यामाला सांगितले की, 'तूं तरी सुरी आण। कापू बोकडातें त्या आतां॥ (ओ. १२९), श्यामाने राधाकृष्णमाईकडून एक सुरा आणला, पण तो कोणत्या कामासाठी हे जाणून तिने तो सुरा परत मागून घेतला. नंतर काकासाहेबांची पाळी आली,' मग काकाचें पहावया मानस। बाबा तंव आज्ञापिती तयास॥

जा तूं सुरा आण कापावयास॥ निर्मुक्त सायास करी त्या॥ (ओ. १३४)
'काका बावनकसी सुवर्ण। बाबास ज्वरी ठावे पूर्ण।
तथापि ते ताविल्यावांचून। निवती न नयन जनांचे (ओ. १३५)

लगेच काका साठेच्या वाड्यात गेले आणि आज्ञेप्रमाणे शस्त्र आणलें आणि तिळमात्र न कचरता बोकड मारण्यास सिद्ध झाले.

जन्म निर्मळ ब्राम्हणवंश। जन्मादारभ्य व्रत अहिंसा॥
तयावरी हा प्रसंग ऐसा। हा कसा वाहील॥१५१॥
गुर्वाज्ञापालनी निधडा। केला मनाचा एकदां धडा॥
परी छाती उडे धडधडा। घाम भडभडा सुटला॥१५२॥

मांसाहारी मुसलमान बडे बाबा यानें शस्त्र चालविण्याचे नाकारले, तर शुद्ध पवित्र ब्राम्हण काकासाहेब यांनी सुरा चालविण्याची तयारी केलेली पाहून लोकांना आश्चर्य वाटले. कांसोटा (धोतर) आवळून ते पुढे झाले, तेव्हा त्यांच्या हृदयी कृपा उपजून त्यांचा हात पुढे होईना, सुरा चांचरून मागे जाऊ लागला. तेव्हा बाबा म्हणाले — 'हूं मार आता काय बघसी?' ही अखेरची आज्ञा ऐकून आवेशाने प्रहार करण्यासाठी ते अर्धवर्तुळ फिरले आणि प्रहार करणार, इतक्यात बाबा म्हणाले —

'हां हां काका होय परता। कायरे तुझी ही निष्ठुरता॥
ब्राम्हण होऊन हिंसा करितां। विचार चित्ता नाही कां॥१६८॥
ऐसे परिसता टाकिला सुरा। आश्चर्य वाटले लहान थोरा॥
जीवदान लादला बकरा। गुरुभक्ति शिखरा चढविली॥१६९॥
मग काका सुरा टाकोन। काय वदता द्या अवधान॥
बाबा आपले अमृतवचन। धर्मशासन ते आम्हां॥१७०॥
आम्ही नेणूं दुजा धर्म। आम्हां नाही लाज शरम॥
गुरुवचन पालन हेच वर्म। हाचि आगम आम्हा ते॥१७१॥

शिर्डीस काकासाहेब १९०९ साली प्रथम गेले. त्यावेळी बाबा एका पोत्यावर बसलेले असावयाचे. मशिदीत मातीचे घडे, कोळंबी व टिनची टंबरेलें, याशिवाय कांही नसे. मशिदीतील मातीची जमीन उखळलेली असावयाची. बाबा स्वतः ती कधी कधी शेणाने सारवीत असत. पुढे मोकळे अंगण असे, सभामंडप नव्हता, तो नंतर झाला. धुनीकरिता अंगणात त्यांनी खरेदी केलेल्या लाकडाच्या मोळ्याचे ढीग होते.

यावेळी शिरडीत राधाकृष्णमाई (मूळ नाव सुंदराबाई क्षीरसागर) नांवाची एक विधवा भक्त राहत होती. तिने बाबांच्या सेवेला सर्वस्वी वाहून घेतले होते. काकासाहेबांच्या संमतीने तिने चांदीची भांडी, पालखी आणि इतर सर्व जिन्नस जमवून शिरडीला संस्थानचे स्वरूप आणले. काकासाहेब शिरडीस रमले पण त्यांना इष्ट असलेला एकांतवास तेथे त्यांना मिळेना. दिवसेंदिवस लोकांची गर्दी वाढू लागली. तेव्हा आपण येथे एक वाडा बांधावा असे त्यांनी ठरविले, आणि श्यामाच्या मार्फत त्यांनी बाबांची अनुज्ञा मिळविली आणि आपले बंधू भाईजी कांट्राक्टर यांचेकडून प्लॅन तयार करून वाडा बांधवून घेतला. बाबांच्या गुरुची समाधि म्हणजे साठेवाडा यांचे समोर हा वाडा-प्रशस्त माडी, हॉल आणि खोल्या असा बांधून घेतला. आता या वाड्याचे रूपांतर होऊन गेले आहे.

माडीवर बाबांचा फोटो लावला होता आणि तेथे रोज बाबाची पूजा व आरती होत असे. दिवाणखाना आणि खोल्या राहण्यासाठी उपयोगात आणीत असत. फोटोच्या बाजूस काका नेहमी राहत असत. शिरडीच्या सर्व तरुण लहान लोकांना ते सहाय्य करीत असत आणि त्यामुळे ते तेथे फार प्रिय झाले होते.

वाडा बांधल्यावर पार्ल्याहून काकांची मंडळी — सौ. सरस्वतीबाई उर्फ भाबीसाहेब, चिरंजीव रामकृष्ण उर्फ बाबू, बाळकृष्ण उर्फ बाळ आणि मुलगी वत्सला वगैरे तेथे राहण्यास आली. यापैकी वत्सला पुढे शिरडीस वारली. ज्या दिवशी ती वारली, त्या पहाटे तिला एक स्वप्न पडले. त्यात महाराज तिच्याजवळ येऊन तिला म्हणाले — इथे कशाला राहतेस? चल आपण त्या लिंबाखाली जाऊन राहू.' मुलीने सकाळी हे स्वप्न सांगितले तेव्हापासून तिची प्रकृति जास्त बिघडली आणि दुपारी ती निर्वतली. मुलगी फार प्रेमळ हुशार व गोड होती. त्यामुळे तिच्या आईबापांना फार दुःख झाले. त्या दिवशी दुपारी श्रीएकनाथमहाराजाचा 'भावार्थरामायण' हा पोस्टाने ग्रंथ आला. बाबांनी त्याला स्पर्श करून काकासाहेबांकडे दिला आणि मुलीच्या निधनाच्या शोक निवारणार्थ किष्किंधाकांडातील, वालीचा वध झाल्यानंतर तारा शोक करीत असता रामाने तिला जो उपदेश केला (अध्याय ७, पान १९० निर्णयसागराचा) तो वाचून मनन करण्यास सांगितले. पुढे काकासाहेब नियमाने भावार्थरामायण वाचू लागले.

काकासाहेबांचा मुलगा बाबू हा लहान होता. तो शिरडीच्या शाळेस जाऊ लागला. कै. बाळासाहेब भाटे यांचा वडील मुलगा दीक्षितांच्या मुलाच्या वयाचा होता तो त्या शाळेतच होता. दोघा बाबूंची गट्टी जमली. ही दोन्ही मुले चावडीच्या रात्री जरीच्या टोप्या घालून काळी रेघ व मुद्रा लावून महाराजांचे छडीदार होत आणि महाराजांचे दोहे म्हणून 'आलबेली सरकार' म्हणून पुकारा करीत. या दोन्ही बाबूंचे शिरडीस प्राथमिक शिक्षण झाल्यावर त्यांना विलेपारले (मुंबई) येथे पाठवून त्यांचे दुय्यम शिक्षण करून घेण्यात आले. त्यांची मॅट्रीक्युलेशन परीक्षा पास झाल्यावर त्यांना काशीच्या सेंट्रल हिंदू कॉलेजात पाठविण्यात आले. तेथे बाबू दीक्षित बी.एस.सी. आणि बाबू भाटे बी.ए. झाले. पुढे भाटे यांनी बाँबे बँकेत १०० रु. पगारावर नोकरी धरीली. पण पुढे तो फार दिवस वाचला नाही. त्याला दीक्षितांनी आपल्या घरच्या मंडळींप्रमाणे वागविले.

**काकासाहेबाचा धंदा :** काकासाहेब महिन्याचे महिने शिरडीस राहू लागल्यामुळे मुंबईच्या त्यांच्या धंद्यावर वाईट परिणाम होऊन उत्पन्न घटत चालले. त्यांचे भागीदार धनजी शहा (सर दिनशा दावर हायकोर्ट जज्ज यांचे जामात) आणि रा.ब. सुंदरदास नारायणदास या त्यांच्या भागीदारांनी काकासाहेबांच्या गैरहजिरीबद्दल बाबांजवळ तक्रार केली आणि बाबांनीही काकासाहेबांस मुंबईस जाऊन धंद्याकडे लक्ष देण्यास सांगितले. त्याप्रमाणे काका मुंबईस गेले, पण त्यांचे लक्ष्य धंद्याकडे लागेना. तेव्हा त्या दोन्ही भागीदारांनी आपली भागी काढून घेतली. पुढे त्यांच्या नागर जातीचे, नवीन पास झालेले सॉलिसिटर पुरुषोत्तमराय मार्कंड हे भागीदार त्यांना मिळाले, पण पुढे तेही फार काळ टिकले नाहीत. पुढे माणिकलाल लल्लुभाई मेहता हे काकासाहेबांना मिळाले आणि दीक्षित

माणिकलाल आणि कंपनी या नावाने ऑफिस सुरू केले. काकासाहेबांच्या गैरहजेरीबद्दल त्यांनी कधीही तक्रार केली नाही, काम न करीता प्राप्तीचा मोठा भाग आपण घ्यावा हे काकासाहेबांना योग्य न वाटून त्यांनी आपली भागीदारी बंद केली आणि सर्व काम माणेकलालवर सोपविले. बाबांची तसबीर असलेली आपली खोली आपल्याकरीता राखून ठेवावी म्हणजे मुंबईस येऊ तेव्हा बसावयास जागा राहील. एवढीच अट त्यांनी घातली आणि ती मान्य करण्यात आली. माणेकलाल ५०० रुपये देऊन शिरडी संस्थानचे ते आश्रयदाते बनले. त्यानंतर दीक्षित माणेकलाल आणि कंपनी ही पेढी पुष्कळ दिवस चालू होती, पण काकासाहेबांचा धंद्याचा संबंध तुटून शिरडी हेच त्यांचे राहण्याचे मुख्य ठिकाण बनले.

**शिरडीत काकांचा नित्यक्रम :** सकाळी लवकर उठून ते काकड-आरतीस जात. तेथून परत आल्यावर स्नान करून वाड्यातील माडीवरच्या बाबांच्या तसबिरीची पूजा करून नंतर चहा घेऊन द्वारकामाईत जावयाचे व तेथे काहीवेळ बसून बाबांबरोबर लेंडीस जावयास निघावयाचे. बाबा लेंडीस पोचल्यावर ते परत वाड्यात येत आणि शिरडीस दर्शनास येणाऱ्या भक्तांची चौकशी आणि सर्व सोय करीत. दुपारच्या नैवेद्यातील शिऱ्याचा काही भाग बाबा घेत असत हे पाहून काका रोज स्टोव्हवर शिरा तयार करीत आणि नैवेद्य म्हणून मशिदीत बाबांकडे नेत असत. बाबांनी त्यातील भाग स्वीकारला म्हणजे ते परत वाड्यात भोजनासाठी येत असत. आरतीच्या वेळी ते हजर असत. पुढे काकासाहेबांचे भोजनही महाराजांसमवेत द्वारकामाईत होऊ लागले. याप्रमाणे मोठ्या आनंदाने काका शिरडीस कालक्रमणा करू लागले. यापूर्वी त्यांचे धार्मिक ग्रंथ वाचन फारसे झाले नव्हते. त्यांनी रामविजय, हरिविजय ही पुराणे वाचली. तेव्हा त्यांना पुराणाची गोडी लागली. कृष्णदयार्णवस्वामींनी श्रीभागवतातील दशम स्कंधावर 'हरिवरदा' नावाचा ओवीबद्ध टीकाग्रंथ लिहिला आहे. हा ग्रंथ बराच मोठा असून त्यांत समग्र कृष्णचरित्र आले आहे. हा ग्रंथ भक्तिरसप्रधान व फार प्रेमळ आहे. काकांनी या ग्रंथाचे समग्र परिशीलन शिरडीस केले.

काकासाहेबांची प्रथम प्रथम सांपत्तिक स्थिती बरी होती. मुंबई, लोणावळे, विलेपार्ले व शिरडी येथे त्यांनी वाडे किंवा घरे बांधली. परंतु त्यांचा स्वभाव उदार व धार्मिक असल्यामुळे आणि परमार्थाकडे विशेष लक्ष लागल्यामुळे त्यांची आर्थिक स्थिती खालावत गेली आणि त्यांना द्रव्याची टंचाई भासू लागली. महाराजांप्रीत्यर्थ आपणास मनाजोगा खर्च करीता येत नाही म्हणून त्यांना खेद वाटे. 'मी करितो' हा अभिमान नाहीसा करण्यासाठीच असा प्रसंग आला अशी त्यांची समजूत असे. 'यस्यानुग्रहमिच्छामि तस्य वित्तं हराम्यहम्' असे भागवतात सांगितल्याप्रमाणे त्यांचेवर अनुग्रह होण्याची वेळ जवळ येत चालली, तेव्हा तेही ठेविले. **"अनंते तैसेची रहावे"** या तुकारामाच्या उक्तीप्रमाणे-समाधानान राहू लागले.

**काकांचा आजार :** शिरडीस काकासाहेबांना जोरात ताप भरला आणि त्यामुळे ते बरेच अस्वस्थ झाले, माधवरावांनी हे बाबांना कळविताच, त्यांनी उदी देऊन माधवरावास

बरोबर घेऊन विलेपार्ले येथे घरी जाण्यास त्यांना सांगितले. 'तू पडी घेऊ नकोस रोज थोडा शिरा खात जा.' अशी बाबांनी आज्ञा केली आणि चार दिवसांनी दुखणे निघून जाईल असे सांगितले. तेव्हा ते शिरडीहून निघून विलेपार्ले येथे आले. प्रवासाच्या त्रासाने व श्रमाने त्यांची प्रकृति अधिक बिघडली. काकांचे मित्र डॉ. मॉन्टी यांना बोलावून आणून त्यांचे उपचार सुरू झाले. डॉ. मॉन्टी यांनी ही नवज्वराची केस आहे असे निदान केले, आणि पूर्ण विश्रांती घ्यावी (पडून रहावे) आणि काही खाऊ नये असे सांगितले. काकांनी ही त्यांची सूचना मानली नाही व ऐकली नाही. तेव्हा डॉ. मॉन्टी यांनी आपले उपचार बंद केले, तरी मित्र या नात्याने त्यांनी डॉ. लेडी मॉन्टीसह भेटण्यास यावे असे काकांनी सांगितले त्याप्रमाणे ते येत असत. पुढे काही दिवस तापाचा भर होता तरी बाबांच्या आज्ञेप्रमाणे वागून काका पूर्ण बरे झाले. शिरडीस जाऊन एका फकीराच्या नादी लागून काका वेडे बनले आहेत आणि त्यांनी आपला व्यवहार सोडला आहे असा समज जनापवाद काकांच्या मित्रमंडळीत पसरला होता आणि डॉ. मॉन्टी असे मानणारे एक होते. हा जनापवाद दूर करून काकासाहेबांची योग्यता त्यांच्या मुंबईतील 'स्नेही' मंडळींना पटवून द्यावी असा बाबांचा काकांना मुंबईस पाठविण्याचा हेतू असावा.

काकासाहेब पूर्ण बरे झाल्यावर त्यांचा शिरडीतील नित्य कार्यक्रम पुनः सुरू झाला आणि त्यांचा काल बाबांच्या सानिध्यात जाऊ लागला.

साईबाबा हे कधीही मोठमोठी प्रवचने करीत नसत. पण सर्वसाधारण उपदेश गोष्टीच्या रूपाने करीत असत. कोणालाही गुरुपदेश अगर मंत्रतंत्र उपासना देत नसत. अमुक कर्म करा, किंवा साधन करा असे ते स्पष्ट कधीही सांगत नसत. 'नीतीने व सचोटीने वागा' असा त्यांचा सर्वसाधारण नेहमीचा उपदेश असे. आणि पारमार्थिक उन्नतीला पोषक अशी घटना ते घडवून आणीत. माझ्या द्वारकामाईची पायरी जो एकदा चढला त्याचा बेडा मी पार करीन असे उद्‌गार बाबा काढीत असत. काकासाहेब मशिदीत चढले इतकेच नव्हे तर ते तेथे चिकटून बसले. तेव्हा त्यांची पारमार्थिक उन्नति साधून देणे बाबांना भाग पडले.

**वानप्रस्थाश्रम :** आता काकासाहेब आयुष्यातील तिसऱ्या आश्रमांत प्रवेश करीते झाले. या आश्रमात गृहसुतदारा याचा मोह सोडून एकटे किंवा केव्हा केव्हा पत्नीसह वनांत — आश्रमांत राहावे लागते आणि तेथे विवेकयुक्त पूर्ण **वैराग्य** आणि **नित्यानित्यविवेक** हे गुण संपादावे लागतात. आता वने उपवने येथे जाण्याची सोय नसल्यामुळे गृहसुतदारा यांचेवरील आसक्ती कमी करून, काकासाहेब शिरडीत येऊन बाबांच्या सानिध्यात राहिले खरे, पण त्यांचा बराच वेळ इतर भक्त मंडळी आणि राधाकृष्णमाई यांचेबरोबर संभाषण करण्यात जात असे आणि त्यांना जरूर असलेला एकांतवास मिळत नसे. तेव्हा बाबांनी त्यांना एक दिवस अशी आज्ञा केली की, त्यांनी आपल्या माडीवर बसून रहावे, इकडे तिकडे कोठे जाऊ नये आणि द्वारकामाईत माझ्याकडे सुद्धा येऊ नये! गुरु आज्ञा प्रमाण मानून त्याप्रमाणे त्यांनी वागण्याचे ठरविले आणि ते

आपल्या वाड्याच्या माडीवर स्थिर झाले. नित्यविधी व स्नान याकरिताच ते खाली येत असत ते आपले भोजनही माडीवरच करीत असत. पण बाबांचे दर्शन घेतल्याशिवाय शिरडीत राहणे त्यांना आवडत नसे. म्हणून श्याम्याच्या मार्फत आरतीस हजर राहण्याची आणि चावडीच्या मिरवणुकीमध्ये भाग घेण्याची परवानगी त्यांनी मिळविली. मशिदीत आरतीची घंटा वाजली. म्हणजे ते द्वारकामाईत जात आणि आरतीचा व पूजेचा कार्यक्रम आटपून आणि प्रसाद बाळाच्या सहवासात सेवन करून आपल्या वाड्यात परत येत असत, गुरुवारी चावडीच्या मिरवणुकीस ते हजर राहत असत. याप्रमाणे त्यांनी नऊ महिने काढले. हे जेव्हा मुंबईत समजले तेव्हा पारशी व गुजराथी वृत्तपत्रांतून असा बोभाटा झाला की, मुंबईचा एक प्रसिद्ध सॉलिसीटर हरी सीताराम दीक्षित बुवा म्हणजे संन्यासी वैरागी झाले आहेत. त्यांच्या पत्नीशी त्यांचा पत्रव्यवहार होता. त्यामुळे त्यांची खरी स्थिती त्यांना माहीत होती, तरी वर्तमानपत्रातील बातम्या ऐकून त्यांचे मन थोडेसे अस्वस्थ झाले आणि त्यांची स्थिती पाहण्यासाठी त्या शिरडीस मुलांसह आल्या, त्यांच्यासाठी एक खोली वाड्यात राखून ठेवली होती, पण त्यांना माडीवर जाण्याची परवानगी नव्हती, त्यांनी कोठे निजावे हा प्रश्न उपस्थित झाला. तेव्हा श्याम्याच्या मार्फत बाबांना विचारून तो सोडविण्यात आला. फक्त काकासाहेबांनी एकटेच माडीवर झोपावे असा बाबांचा हुकूम झाला. तेव्हा सर्व वस्तुस्थिती पाहून बाबांच्या अनुज्ञेने, त्या मुंबईस परत आल्या. मुलांच्या शिक्षणात खंड पडू नये किंवा व्यत्यय येऊ नये म्हणून त्या लवकरच परतल्या. काकांची काही काळजी करू नको, मी त्याला न्याहाल करीन असे बाबांनी त्यांना सांगितले.

या नऊ महिन्यात वाड्याच्या माडीवर काकासाहेब एकटेच राहत असल्यामुळे ग्रंथांचे वाचनास आणि मननास त्यांना बराच वेळ मिळाला. भागवत दशमस्कंदावरील कृष्णदयार्णव स्वामीकृत 'हरिवरदा' हा मोठा ग्रंथ लवकर संपला. आता पुढे दुसरा कोणता ग्रंथ वाचू असे विचारतां बाबांनी सांगितले की एकनाथाची पोथी वाच. वृंदावनाची पोथी म्हणजे भागवत एकादश स्कंदावरील श्री एकनाथ महाराजांची टीका — एकनाथी भागवत काकासाहेब रोज सकाळी यातील एक अध्याय, आणि रात्री एकनाथांच्या भावार्थरामायणातील एक अध्याय असे दोन ग्रंथ वाचीत असत. कोणी श्रोते हजर असल्यास मोठ्याने वाचीत, नसल्यास आपल्या मनाशीच वाचीत. याशिवाय दासगणूकृत 'भक्तलीलामृत' या पोथीतील साईबाबांचे तीन अध्याय (३१, ३२, ३३) हेही नियमाने वाचीत. त्यांचे वाचन व नंतर मनन ही दोन्ही चालत. पोथीतील मार्मिक स्थळे हुडकून काढून त्यातील मर्मे जाणून ती आपल्या आचरणात आणीत.

याप्रमाणे नऊ महिने गेल्यावर एक दिवस बाबांनी त्यांच्या व्रताची समाप्ती केली. बाबांनी त्यांना बोलावून आपल्या बरोबर भीक्षेच्या वेळी घेतले. नंतर लेंडीवर नेले, आरतीपूर्वी पुनः द्वारकामाईत बोलावून घेतले आणि आता माडीवर 'एकटा बसू नकोस असे सांगितले. त्या दिवशी दुपारच्या पंक्तीला दोन मंडळी जास्ती घेतली व त्यांच्या व्रताचे उद्यार्चन केले. त्यानंतर काकांचा शिरडीतील नित्यक्रम पूर्वीप्रमाणे सुरू झाला.

**संन्यासः** (कफनी परिधान) या प्रमाणे काकासाहेब कसोटीला उतरल्यावर अंगी वैराग्य बाणल्याची खूण म्हणून बाबांनी त्यांना कफनी परिधान करविली. ती मिळाल्यापासून ते ती घातल्याशिवाय वाड्याबाहेर पडत नसत. मुंबईस गेल्यावर स्नानानंतर ती घालीत व पूजा आटोपल्यावर काढून ठेवीत. त्यांनी कफनीचे प्रदर्शन कधीच केले नाही. शिरडीस येतेवेळी शिवेवर टांगा थांबवून, कोट काढून कफनी घालून गावात प्रवेश करीत. एक कफनी वापरून जीर्ण झाल्यावर बाबांनी त्यांना दुसरी दिली कफनी धारण करणे म्हणजे तिचे पावित्र्य सांभाळण्याची जबाबदारी आपली आहे अशी त्यांची भावना होती व या बाबीला ते फार जपत. बाबा अंतर्ज्ञानी आहेत व ते आपल्या मनातील बरेवाईट सर्व विचार जाणतात हे अनुभवाने समजून, भलतेच अमंगळ विचार ते आपल्या मनात कधी येऊ देत नसत. एखादे वेळेस आल्यास ते बाबांची क्षमा मागत, बाबा अत्यंत दयाळु व क्षमाशील आहेत हे ते जाणत होते.

**भगवद्भावो सर्वाभूती :** भागवत व रामायण या दोन ग्रंथांची पारायणे केल्यामुळे आणि वानप्रस्थ — आश्रमातील साधना केल्यामुळे ते भूतमात्रात ईश्वर पाहू लागले. याची उदाहरणे (१) विले पार्ले येथील घरामध्ये ४।५ मंडळी चहापान करीत असता एकदा एक मोठा विंचू टेबलाखाली आला. मंडळी त्याला मारणार होती, पण काकासाहेबांनी त्यांना तसे करू न देता, हळूच त्या विंचवाला पकडून त्याला लांब फेकून देऊन जीवदान दिले. (२) ढेकणाबद्दलही त्यांना सहानुभूती असे. कीटींग्स पावडर घालून किंवा अन्य रीतीने ढेकणाला मारणे त्यांना आवडत नसे. ते म्हणत असत की, ढेकूण हे माणसाच्या रक्तावर जगतात हे खरे, पण किती थोडे रक्त त्यांना पुरते आणि किती खुबीने ते काढून घेतात. आणि ईश्वरही या छोट्या प्राण्यामध्ये आहेच. तेव्हा त्यांची हत्या का करा? हे तत्त्वज्ञान पुष्कळांना चमत्कारिक वाटेल यात शंका नाही. (३) २५।३० कुत्र्या-मांजरांना ते रोज अन्न घालून पोसीत असत. त्यामुळे कुत्र्या-मांजरांनी त्यांचे घराजवळ वसाहतच केली होती.

**काकासाहेबांचे भजन :** त्यांना भजनाची फार आवड असे. पण त्यांचा आवाज चांगला नव्हता आणि भजनाची हातोटीही नव्हती. पार्ल्यास त्यांच्या बंगल्यावर कै. रघुनाथ तेंडुलकर सहकुटुंब येऊन भजन करीत किंवा नारायण स्वामी (नानासाहेब ठोसर) हेही नेहमी येऊन भजन करीत. त्यांचा आवाज गोड व भजन प्रेमळ असे. तेव्हा ते ऐकताना काकांच्या डोळ्यातून अश्रू येत असत. ते मनातल्या मनात शिरडीस किंवा पार्ले येथे भजन (पंचपदी) करीत असत.

**काकांची कविता :** काकांना कविता करण्याचा नाद नव्हता, पण त्यांनी एकदा रचिलेलें सुंदर पद व अभंग श्री. बाळासाहेब देवांना दाखविले. तेव्हा आपण कविता करून देत जा. ती प्रसिद्ध केली जाईल असे सांगता ते म्हणाले — कविता करण्याची आपली योग्यता नाही, प्रेमळ कविता संतांनीच करावी. आजपर्यंत मोठमोठ्या संतांनी कविता केल्या आहेत त्या थोड्या आहेत काय? त्या प्रेमळ कविता गायचे सोडून आपल्या नीरस कवितेची भर त्यात का घाला? कवित्व केल्याने आपला अभिमान वाढतो

आणि अभिमान तर परमार्थाला मारक आहे. तेव्हा ही नसती पंचाईत कशाला? संतांच्या काव्यांनी परमेश्वराला आळवले तर तो वश होणार नाही काय? सारांश कविताविषयी म्हणा किंवा लेखाविषयी म्हणा त्यांना स्वतःची प्रसिद्धी नको होती. आपले अनुभव प्रसिद्ध करणे म्हणजे तो एक प्रकारचा अभिमान अंगी घेणे अशी त्यांची प्रामाणिक समजूत होती आणि त्यामुळे त्यांचे बरेचसे अनुभव प्रसिद्ध झाले नाहीत.

पूर्वी लंडन शहरी रेल्वेने प्रवास करीत असताना फलाटावर पडून श्री. दीक्षितांच्या पायास दुखापत झाली होती. सर्व देशी-विदेशी डॉक्टर, वैद्य, हकीम करूनही ती बरी होईना. जन्माचे हे एक दुखणे होऊन बसले. श्री. दीक्षित पंगू झाले. परावलंबी होऊन पडले. तरी पुढारीपणाचा मुरलेला अहंकार त्यांना घरी स्वस्थ बसू देईना. एकदा निवडणुकीच्या निमित्ताने ते नगरला आले. शिरडीच्या जवळपासच्या परिसरात आले. मग मात्र त्यांना राहवेना. श्रीबाबांच्या दर्शनाची ओढ त्यांना लागली. हळूहळू ती तीव्र झाली. नेमक्या याच क्षणी काही निमित्त काढून श्रीबाबांनी श्यामास नगरला पाठविले. श्री. दीक्षितांना हात देऊन, गाडीत रात्रभर श्रीबाबांच्या लीलांच्या संकीर्तनात त्यांना रमवून सकाळी त्यांना शिरडीस आणले. हे सर्व करुणावात्सल्य श्रीबाबांचेच. कारण श्रीबाबा पुढे एक दिवस म्हणाले,

''माझा भक्त कोठेही सातासमुद्रापलीकडे असो चिमणीच्या पायाला दोरा घालून आणावे, तसा मी त्याला माझ्याकडे ओढून आणीन.''

श्री. दीक्षितांना श्रीबाबांनी खरोखरच उंच हवेलीमधून बाहेर काढून स्वतःकडे ओढून आणले.

पण यालाही काही विशेष कारण असले पाहिजे. अमुक, जन्मात, अमुक साधुपुरुषाशी तुझी भेट होईल आणि त्यानंतर जीवनमुक्तीचे द्वार तुला उघडेल, असा जणू त्यांना वर असावा, त्याप्रमाणे सर्व घडले.

श्री. दीक्षित म्हणजे भाविकतेची केवळ मूर्ती. श्रीबाबांच्या समोर एखाद्या निरागस बालकाप्रमाणे ते बसत. श्रीबाबांचा शब्द एखाद्या आज्ञाधारक मुलाप्रमाणे मानीत. जणू आजवर जे ग्रंथ त्यांनी उराशी बाळगले, त्यांतील सर्व विचार ते विसरले, मन कोऱ्या पाटीप्रमाणे स्वच्छ पुसून श्रीबाबांकडे आले.

अज्ञ बालकाची ही विनम्र भूमिका श्री. दीक्षितांनी कधीही सोडली नाही. श्रीबाबांनीही त्यांना या लोभस भूमिकेमधून कधी बाहेर ओढले नाही. श्रीबाबा श्री. दीक्षितांना काका म्हणत. पण 'लंगडा' हे विशेषण घालूनच. श्री. दीक्षितांना ते कधी काका म्हणत 'बंब्या' या आवडत्या टोपण नावानेही ते दीक्षितांचा उल्लेख करीत. श्री. दीक्षितही स्वतःस ''श्रीबाबांचे लाडके लेकरु'' म्हणवीत. स्वतःची सही करतानाही हे बिरुद मोठ्या अभिमानाने मिरवीत.

धन, प्रतिष्ठा, विद्वत्ता यावर श्री. दीक्षितांनी तुलसीपत्र ठेवले, म्हणूनच श्रीबाबांचे ते इतके लाडके झाले. ज्ञान, भक्ती वैराग्य यामुळे साईदरबारात नवरत्नांपैकी रत्न असे झळकले. पण त्यासाठी त्यांनी जी लोकनिंदा सहन केली तिला तोड नाही. समाजात कुचेष्टा होऊनही त्यांनी सद्गुरुचे पाय सोडले नाहीत.

शिरडीस प्रथम आले तेव्हाच श्री. बाबांना ते म्हणाले.

"सद्‌गुरो! या नश्वर देहाचे काय! माझ्या मनाचे लंगडेपण घालवा."

श्रीबाबांनी श्री. दीक्षितांना अत्युच्चपदी बसविले. कळसास नेऊन पोचविले. पण त्या आधी श्रीबाबांनी त्यांना आपल्या गरजेनुसार घडविले. अनेक प्रसंगी त्यांची परीक्षाही पाहिली.

**बाबांची महासमाधि :** इ.स. १९१८ साली ज्या दिवशी (विजया दशमी) बाबांनी महासमाधि घेतली त्यावेळी दुपारी काकासाहेब द्वारकामाईत होते. त्यावेळी बाबांनी त्यांना, बापुसाहेब बुटी आणि इतर भक्त यांना वाड्यात जेवण्यासाठी पाठवून दिले आणि इकडे त्यांनी शांतपणे स्वस्थपणे आणि कोणतीही गडबड न होता समाधी घेतली हे सर्वांना माहीत आहे. त्यानंतर दोन मोठे प्रश्न उपस्थित झाले. (१) बाबांचा पार्थिव देह कुठे ठेवायचा आणि (२) राधाकृष्णमाई आणि काकासाहेब यांनी जमविलेली भांडीकुंडी, सामान, पालखी, जडजवाहीर वगैरे संस्थानच्या इस्टेटीची विल्हेवाट कशी करावयाची, हे दोन्ही प्रश्न काकासाहेबांनी इतर भक्तांच्या सहाय्याने व सम्मतीने उत्तम रीतीने सोडविले. बाबांच्या इच्छेप्रमाणे आणि बहुतेक भक्तांच्या मनाप्रमाणे बाबांचा देह बुटी वाड्यातच ठेवून त्यावर समाधी बांधण्यात आली आणि आता तो वाडा किंवा समाधीमंदिर दिवसेंदिवस वाढत चालला आहे. बहुतेक भक्तांच्या इच्छेप्रमाणे काकासाहेबांनी शिरडी संस्थानची रचना व घटना तयार करून ती अहमदनगर डिस्ट्रीक्ट कोर्टातून मंजूर करूनही आणली. त्याप्रमाणे पाच ट्रस्टी (विश्वस्त) आणि पंधरा मेंबरांची कमिटी यांचेमार्फत संस्थानची व्यवस्था व्हावयाची असे ठरले होते. त्याप्रमाणे पाच ट्रस्टी आणि पंधरा मेंबर्स होते. काकासाहेबांनी आपल्या हयातीत कमिटीचे मेंबर या नात्याने चिटणीसाचे काम बरीच वर्षे उत्तम रीतीने केले.

बाबांच्या आज्ञेप्रमाणे काका दरदिवशी सकाळी एकनाथी भागवत वाचत असत व रात्री भावार्थ रामायण नित्यनेमाने वाचत. साईनाथांच्या बरोबरचा त्यांचा सहवास असलेली काकांची रोजनिशी प्रसिद्ध आहे. काकासाहेबांच्या पत्नीचे नाव सरस्वतीबाई. त्या काकांच्या अगोदर निवर्तल्या.

हरिलीला श्रवणात आणि ध्यानधारणेत ते रंगून जात. तथापि आपल्या अंतःकाळी आपणास कोणते दुःख कर्मगतीप्रमाणे भोगावे लागेल, या विचाराने ते कधी कधी अस्वस्थ होत.

अशा एका प्रसंगी श्रीबाबा अभय देऊन त्यांना म्हणाले,

"काका तुझ्या अंतकाळाची काळजी करतोस? मी तुला एखाद्या फुलाप्रमाणे विमानातून नेईन."

आणि खरोखरच बोलता बोलता हरिचिंतनी रंगता रंगता बसल्याजागी त्यांची प्राणज्योत शांत झाली.

हरिभक्तांचे देहावसान हरिदिनीच घडावयाचे. जुने भक्त अप्पा कुलकर्णी आणि काशीराम शिंपी यांचे देहावसान एकादशीस घडले. श्रीकाकांचे देहावसानही ज्येष्ठ वद्य एकादशीस झाले.

त्या दिवशी शिरडीस दोन चमत्कार घडले. लेंडी बागेत श्रीबाबा ज्या लिंबाच्या झाडाखाली बसत, त्याची मधली एक मोठी फांदी अचानक मोडून पडली. दुसरी अशीच एक घटना म्हणजे द्वारकामाईवरील तीन कळसांपैकी एक कळस अचानक मोडून पडला.

श्री. दीक्षितांच्या देहावसानामुळे सर्वसाक्षी भक्तवत्सल श्रीबाबांनी केलेला हा शोकच होय.

**काकांचा अंतकाल:** बाबा एकदा शिरडीत काकांच्या समाधानार्थ असे म्हणाले होते की, आपण त्याला विमानातून नेऊ (म्हणजे त्याला उत्तम गती मिळेल), तो प्रसंग १९२६ साली आला. सोमवार ता. ५ माहे जुलै-ज्येष्ठ वद्य एकादशी शके १८४८ एकादशीच्या शुभमंगल दिवशी, काकासाहेब हे अण्णासाहेब दाभोलकर व काकासाहेब तेंडूलकर विलेपार्लेहून मुंबईस जाण्यास निघाले. त्यांचा पुत्र, डॉ. गोपाळराव देशमुख यांच्या हॉस्पिटलात आजारी होता आणि त्याचे अपेंडीसायटीसचे ऑपरेशन व्हावयाचे होते. त्यांना गाडीत चांगली जागा मिळून बाबांच्या गोष्टी सांगत आणि बाबांचे स्मरण करीत ही मंडळी निघाली. सांताक्रूझ स्टेशन जवळ येते न येते तोच काकांना भोवळ आली आणि त्यांचा शरीराचा तोल जाऊन त्यांना झोप येत आहे असे आण्णासाहेबांना वाटले. त्यांनी लगेच उपरण्याची गुंडाळी करून त्यांचे मानेखाली दिली आणि ते पाणी आणण्यास गेले. गाडी जोराने सुरू झाली. ती परेल स्टेशनवर थांबविण्यात आली. त्यांचा देह खाली उतरून घेऊन आणि डॉक्टराकडून तपासून घेण्यात आला. तेव्हा प्राणोत्क्रमण झालेले आहे असे डॉक्टरनी सांगितले. नंतर त्यांचा देह विलेपार्लेस आणण्यात आला आणि दुसरे दिवशी सर्व उत्तरक्रिया करून घेण्यात आली. निधन समयी त्यांचे वय ६२ वर्षांचे होते.

याप्रमाणे काकांचे देहावसान एखाद्या योग्याप्रमाणे, यत्किंचित दुःख व त्रास न होता सुखाने झाले आणि बाबांची उक्ती खरी ठरली!

**श्रीसाईनाथाय नमः।**

# साईनाथास

माथ्यावरती ओझे दिधले
पाऊले जड झालीत रे॥
गात्रे गात्रे विकल जहाली
नेत्र लागले पैलतीरी रे॥
पाहुण्यापरी जगात आले
आपुल्या घरी कधी जाणे रे॥
जाणे येणे तोची जाणे
आपण रंगभूमीचे बाहुले रे॥
कर्तव्याचे ओझे घेवून
इथे तिथे मी फिरते रे॥
आयुष्याला नसेच दोरी
पतंगा परी भिरभिरते रे
गर गर गर चक्र काळाचे
आपणा भोवती वेढले रे॥

काळ चालला पुढे पुढे अन्
आपण आपणातच गुंततो रे॥
सोडवू जाता गुंता गुंत
अधिक पक्क्या गाठी बसती रे॥
मी पणाची पांघरूण शाल
अभिमानाचे कोश फुलले रे॥
कोश फोडूनी जो बाहेर येतो
तोची एकला मुक्तची रे॥
होता मुक्त रहातो फक्त
एक साईनाथ आपुल्या जवळी रे॥

**— सौ. नीता उल्हास जाधव**
६२९, सरेकर आळी, महाड
जि. रायगड

# श्री नामदेवांच्या कथा

## श्री नामदेव पुण्यतिथीनिमित्य - बाल साई भक्तांसाठी

"नाही दूध पीत?"

"वा रे वा! नाहीं म्हणून कसं भागेल - दूध प्यायलाच पाहिजे!"

"तरी नाहीं?"

"मग तुझी गट्टी फूऽऽऽ"

तरीही तो दूध प्याला नाही. तो म्हणजे विठ्ठल देव होता. तो दगडाचा होता. तो दूध कसे पिणार? पण नामदेवाला ते माहीत नव्हते. लाडीगोडीने सांगून देव दूध पीत नाहीं हें पाहिल्यावर नामदेव त्याच्यावर रागावला.

"बघ हं आतां मुकाट्यानं दूध प्याला नाहीस-तर काठीनं झोडपून काढीन.

आता मात्र देव घाबरला, आणि त्याने चट्दिशी दूध गट्ट केले.

हैद्राबादजवळच्या नरसी बामणी गावात ही गोष्ट घडत होती. त्या गावात दामाशेटी नावाचे एक गृहस्थ राहात होते. ते विठ्ठलभक्त होते. त्यांचे घराणेच विठ्ठलभक्त होते. तसाच त्यांचा मुलगा नामदेवही मोठा विठ्ठलभक्त झाला. वर सांगितलेला रुसवा, फुगवा, नामदेव-विठ्ठलांचाच होता. या वेळी नामदेव अवघा पांच-सहा वर्षांचा होता.

त्या वेळेपासून नामदेव आणि विठ्ठल अगदी जिवाभावाचे मित्र झाले. नामदेवाशिवाय विठ्ठलाला चैन पडेना आणि विठ्ठलाशिवाय नामदेवाला करमेना.

### मडक्याची परीक्षा

विठ्ठल-नामदेवांच्या या मैत्रीचे त्या वेळच्या सगळ्या संतांना मोठे कौतुक वाटे. कारण प्रत्यक्ष देव ज्याच्याशी बोलतो, त्याची योग्यता केवढी मोठी होती.

एके दिवशी निवृत्ति, ज्ञानेश्वर, सोपान, मुक्ताबाई, सावंता माळी, गोरा कुंभार असे त्यावेळचे विठ्ठलभक्त वारकरी एके ठिकाणी जमले होते. नामदेवाला भेटण्यासाठी सगळे उत्सुक होते. कारण सगळ्यांपेक्षां देवाचा तो फार लाडका होता. पण त्याला बघण्याबरोबर मुक्ताबाईला समाधान झाले नाही. उलट फाजील लाड करून देवाने त्याला बिघडवला आहे नि संतांनी त्याला उगीचच चढवला आहे असे तिला वाटले.

संत मंडळी जमल्यावर त्यांच्यात गप्पा कसल्या चालणार? देव, भक्ति, भाव, वेदांत, अध्यात्म, द्वैत, अद्वैत एक की दोन; जो तो आपापल्या अनुभवाचा भाव बोलत होता. बोलता बोलता मुक्ताबाई गोरोबांना म्हणाली —

"काका काका उगीच मोठ्यामोठ्या गप्पा कशाला? तुम्ही सगळ्यांत वडील. वयानं, अनुभवानं, भक्तीनं तुम्ही आम्हां सर्वांहून थोर आहांत तेव्हां तुम्हीच परीक्षा घ्या नि ठरवा, कीं आमच्यातला कोण कसा आहे नि कोण किती मोठा आहे!"

गोरोबा काय, जातीने आणि धंद्याने कुंभारच. मडकी घडवण्याचे थापटणे त्यांनी घेतले आणि एकेका संताचे "मडके" ते पारखूं लागले.

"ठक्-ठक्-ठक्" निवृत्ति, तुझं मडकं पक्कं आहे."
"ठक्-ठक्-ठक्" ज्ञानदेवा, तुझं मडकं पक्कं आहे."
"ठक्-ठक्-ठक्" सांवत्या, तुझं मडकं पक्कं आहे."

असे करीत करीत प्रत्येकाच्या डोक्यावर थापटणं मारीत गोरोबा नामदेवाजवळ आले. त्याच्या डोक्यावर एक थापटणे मारण्याबरोबर नामदेव संतापला आणि त्या माराच्या कळीने ओरडला —

"काका, तुम्ही काय माझं डोकं फोडणार काय?" त्याबरोबर हसत गोरोबा म्हणाले,

"कच्चं रे कच्चं. नामदेवा, तुझं मडकं कच्चं आहे." त्यावर सगळेच हंसले. मुक्ताबाईही हंसत गोरोबाला म्हणाली —

"काका, ते भाजून पक्कं करायला पाहिजे.

अंतरबाहेर भाजूं आम्ही कुंभ। भरूं निरालंब सगळेचि।
अहं सोहं दोन्ही ऊर्ध्व लावूं फुंकणी। नवद्वारे फुंकोनी जाळ करूं॥
जीवित्व काढोनि शिव घालू अंगा। प्रिय पांडुरंगा आवडेल।
म्हणे मुक्ताबाई पळायाचा पाही। आसन स्थिर नाही नामयाचे॥"

"तर तर - आसन स्थिर नाही म्हणे!" नामदेव अधिकच संतापाने म्हणाला, "आतां देवाला जाऊन सांगतो, हे सगळे संत तुझे भक्त म्हणवतात आणि तुझ्याच मित्राला 'कच्चं कच्चं' म्हणून हिणवतात. ही मुक्ताबाई तर माझं डोकं गोरोबाच्या भट्टीत घालून भाजायला निघालीय."

## देवसुद्धां हंसला

नामदेव निघाला तो सरळ देवाकडे आला. त्याने चिडून आणि तणतणून घडलेली सगळी हकीकत देवाला सांगितली. ती हकीकत ऐकून आणि विशेषतः ती सांगण्याची नामदेवाची तऱ्हा पाहून देवालासुद्धा हसू आले. ते पाहून नामदेव चांगलाच चिडला आणि म्हणाला —

"देवा तूही त्यांच्यासारखाच झालास तूही मला हंसवतोस?"

"अरे नामदेवा" देव त्याची समजूत घालू लागला, "असा लहान मुलासारखा चिडू नको. त्या संत मंडळींनी म्हटलं ते खरं आहे. तू अजून कच्चा आहेस. मी तुझा मित्र असलो किंवा तूं माझा केवढाही मोठा भक्त असलास तरी ज्ञानाशिवाय भक्ति व्यर्थ आहे. गुरुशिवाय ज्ञान कधी मिळत नाही. अधिकारी गुरुकडून गुरुपदेश घेतल्याशिवाय तुला ज्ञान व्हायचं नाही."

"असं म्हणतोस होय देवा?" देवाच्या सांगण्याने नामदेवाची समजूत पडली. तो पुढे म्हणाला, "मग अधिकारी गुरु कोण आहे ते तरी मला सांग. पण मी तुला असं विचारतो, तुला जर हे माहीत होत, तर तू मला अगोदरच का सांगितल नाहीस? सगळ्याकडून माझी फजीती केलीस, काय मिळवलंस तू?"

"अरे मी पुष्कळ मिळवलं. गुरुपदेश घ्यायला देखील योग्यता यावी लागते. ती तुझी आहे हे समजून आलं."

"पण त्यासाठी गोरोबानं माझं डोकं फोडायची काय जरूर होती? बर, ते जाऊ दे. गुरुपदेश घ्यायला मी कुणाकडे जाऊं ते सांग म्हणजे झालं."

## विचित्र माणूस

नागनाथाच्या देवळात विसोबा खेचर आहेत. त्यांना तू शरण जा, म्हणजे ते तुला गुरुपदेश देतील असे देवाने सांगितले होते. नामदेव त्याच पावली नागनाथाच्या देवळाकडे निघाला.

पण देवळात त्याला एक विचित्रच माणूस दिसला. एक अगदी म्हातारा माणूस खुशाल नागनाथाच्या पिंडीवर पाय ठेवून अस्ताव्यस्त पडला होता. ते पाहून नामदेवाच्या अंगाचा अगदी संताप होऊन गेला. तो त्या आचरट म्हाताऱ्याला म्हणाला —

"ए-ए शहाण्या, नागनाथाच्या पिंडीवर पाय पसरून निजला आहेस, कांही शरम वाटते की नाही?"

त्या म्हाताऱ्याने डोळे किलकिले करून नामदेवाकडे पाहिले आणि अगदी जड स्वराने म्हटले —

"अरे बाबा, शरम वाटून काय उपयोग? म्हातारपणामुळे माझ्यात अगदी त्राण राहिलं नाही. तूच माझे पाय बाजूला कर."

नामदेवाला त्या म्हाताऱ्याची दया आली. त्याने पिंडीवरून त्याचे पाय बाजूला ठेवले, तो तेथेही पिंडीच होती. त्याने पाय पुन्हा उचलून दुसरीकडे ठेवले तो तेथेही पिंडीच होती. नामदेवाने सगळ्या देऊळभर त्या म्हाताऱ्याचे पाय नाचवले पण जिथे जिथे त्याचे पाय ठेवावे तिथे तिथे पिंडी आहेच.

मग मात्र नामदेवाला त्याचा अर्थ समजला. तो त्या म्हाताऱ्याला म्हणाला —

"आता मात्र मी आपल्याला ओळखल. आपणच माझे गुरु विसोबा खेचर -परमेश्वर अणूरेणूत भरला आहे, हे आपण मला चांगल शिकवल. मी आपल्याला शरण आलो आहे. मला गुरुपदेश द्यावा."

नामदेवांना गुरुपदेश मिळाल्यावर ते पूर्ण संत झाले. मग त्यांनी भागवत धर्माचा मोठ्या झपाट्याने प्रसार केला. पंजाबात हिंदूधर्मावर आलेले मोठे संकट, नामदेवांच्या भागवत धर्मानेच दूर केले. पंजाबात अठरा वर्षे नामदेवांनी भागवतधर्माचा प्रसार केला. पंढरपूरचे महत्व त्यांनीच वाढवले. आपल्या वयाच्या ८० व्या वर्षी (शके १३५० साली) त्यांनी समाधि घेतली. पंढरपुरच्या महाद्वाराची पहिली पायरी "नामदेवाची पायरी" म्हणून प्रसिद्ध आहे. तीच त्यांची समाधि होय.

# श्रीसाईबाबांचा गुरूसंदेश

श्री. चकोर आजगांवकर. एम्.ए.
वाय्-११ । १७० सरकारी वसाहत, वांद्रे (पूर्व) मुंबई.

"श्रीसाईबाबांचा गुरूसंदेश" या विषयावर मी साईलीलेच्या एका अंकात श्री गुरूगीतेच्या संदर्भात अनुभवलेली दृष्टांतरुप पार्श्वभूमी सांगून अधिक विवेचन करण्याचे अभिवचन दिले होते. त्याची पूर्तता आज श्रीबाबांच्या अनुज्ञेने करायचे योजिले आहे. श्रीसाईबाबा हे श्री दत्तरूप महान्संत होते. परंतु त्यांनी आपल्या पूर्वायुष्याचा, साधनेचा वा साधनामार्गाचा सुस्पष्ट उल्लेख करण्याचे कटाक्षाने टाळले होते. त्यांच्या मोजक्या मिताक्षरी उपदेश शब्दातून आपण त्यांच्या संदेशाचे धागेदोरे जुळवून महावस्त्र विणण्याचा प्रयत्न करीत असतो. म्हणूनच बाबांच्या प्रत्यक्ष दृष्टांताचा दाखला समोर ठेवूनच त्यावर केलेले विवेचन वास्तव, सत्यदर्शी, आध्यात्मस्पर्शी ठरणार आहे.

मला दिलेल्या श्रीगुरूगीता लेखनाच्या दृष्टांतात श्रीबाबांनी आपले त्रैमूर्ती सद्‌गुरूस्वरुप दाखविले व शिवाने पार्वतीला सांगितलेल्या श्रीगुरुमहात्म्यपर, कृपामार्गप्रवण व गुरूध्यानप्रधान श्रीगुरुगीतेतील संदेशाचे मर्म मांडण्याची प्रेरणा दिली. हीच गुरुगीता गुरुचरित्रात (मूळ प्रतीत) ४१ वा अध्याय म्हणून समाविष्ट झालेली होती. नाथपंथातील मच्छिंद्रनाथांनी मासळीच्या पोटातून जे गुह्य शिवपार्वतीसंवाद चोरून ऐकून ग्रहण केले, त्या गुरुमार्गाचे सारसर्वस्व या गुरुगीतेत सामाविले आहे. त्यामुळे श्रीगुरुगीतेच्या अनुरोधाने श्रीबाबांच्या गुरुमार्गाचा व गुरूपदेशाचा मागोवा घेणे क्रमप्राप्त झाले आहे.

श्रीगुरुगीतेत श्रीगुरुकृपा गुरूंच्या गौरवाचे महात्म्य गायिले आहे. गुरुरूपाने ध्यान हा नामस्मरणाहून सोपा व प्रत्यक्ष प्रचीतीचा मार्ग मांडला आहे. याचे विवेचन करण्यापूर्वी बाबांच्या तोंडचे काही उपदेश शब्द पार्श्वभूमी म्हणून वाचकापुढे मांडले पाहिजेत. श्रीबाबा म्हणत:-

१) श्रद्धा व सबुरी आचरा
२) नेकीने वागावे
३) ऋण, हत्या व वैर टाळावे
४) तुम्ही मजकडे पहा, मी तुमच्याकडे पाहीन. तुमचा भार मजवर सोपवा. मी तुम्हाला उद्धरीन. माझे स्वरुपदर्शन हाच साक्षात्कार आहे. कासवीप्रमाणे सर्वस्पर्शी दृष्टीने माझ्या गुरुनी मला जसे सांभाळले, तसे मी तुम्हाला सांभाळीन.
५) मला मंत्र गुरुनी शिकवला नाही. मी फक्त त्यांचे मुखावलोकन करून धन्य झालो. गुरुपुढे मी शरणागती दिली व आम्ही दोघे एकरूप झालो.
६) साईबाबा म्हणू नका. सच्चिदानंद सद्‌गुरू म्हणा. माझे सरकारचे धन वावरे भरून पडले आहे. त्या फकीराने सांगितल्याप्रमाणे मी करतो.

श्रीबाबांच्या वरील उद्‌गारात काय सामावले आहे? सदाचरण, निस्वार्थ सेवावृत्ती, सचोटी, गुरु शरणता व अनन्य भक्ति ही साधनेची पंचपदी आहे. आचार, विचार शुद्ध हवेत तसाच श्री गुरुचरणी विश्वास व समर्पणबुद्धी हवी. मगच श्रीगुरु कृपा करतात.

प्रारब्धभोग तितीक्षेने (सबुरीने) भोगले पाहिजेत. कर्तव्य नीट पार पाडले पाहिजे. त्यावाचून साधनेला सुरवात होणार नाही व त्यानंतर गुरुशरणभावाने श्रीगुरुंच्या रूपाने अनन्य भक्तीने ध्यान व निदिध्यास केल्यावाचून गुरुस्वरुपाशी एकतानंता होणार नाही. गुरुंची कृपा अवतरणार नाही. श्रीसाईबाबाकडे व्यक्ति म्हणून न पहाता सच्छिदानंद सद्‌गुरु रूप गुरुतत्व म्हणून पाहिले पाहिजे. स्थूलाकडून सूक्ष्माकडे नेणारे ते सूक्ष्म गुरुतत्व तेव्हाचे मनोलय घडवून आनंदाच्या प्रांताकडे उचलून नेईल. असा विश्वास ठेवून मजवर सर्वस्वाचा भार टाकलात तर मी तुम्हाला मुक्त करीन. गीतेत भगवंतानी सर्वकर्मे मला अर्पण कर. मी तुझा योगक्षेम वाहीन व **''अहं त्वां मोक्षयिष्यामि''** असे जे सांगितले, ते याच अर्थाने होय.

श्रीगुरुगीतेची दिव्य शिकवण ही बाबांच्या शिकवणीचा मूलस्त्रोत्र व गाभा आहे. श्रीगुरुगीता ही गुरुना ब्रम्हाविष्णुमहेश रुप मानते. जप, तप, मंत्र, तंत्र, राजयोग, व्रतवैकल्ये, गुरुसेवेवाचून व गुरूकृपेवाचून व्यर्थ असे गुरुगीता सांगते. गुरुमाऊली प्रसन्न होऊन जेव्हा प्राण व मन यांचा लय घडवून आत्मज्योति प्रगट करील, तेव्हाच साधक कृतार्थ होईल! बाकीची केवळ चित्तशुद्धीसाठी आहेत. गुरुमूर्ती ही ध्यानमूर्ती आहे. गुरुंच्या स्मरणामध्ये नामापेक्षा गुरुचे रुप महत्वाचे आहे. (बाबांच्या शब्दात तू गुरुस्वरुप मजकडे पहा — रुपध्यान कर) कीटकाने भ्रमराचे ध्यान करून भ्रमर बनावे, तसा तू गुरुरायाचे ध्यान करून श्रीगुरुस्वरुप हो. द्विभुज, एकमुखी, वरद-अभयहस्त श्रीगुरुमूर्ती तुम्ही प्रभाती स्मरा. श्रीगुरुंशी एकरुप झाल्यावर तुम्हाला आपल्या अंतरात्म्यात लपलेला परमात्मा प्रकाश रूपाने प्रकट झालेला आढळेल. श्रीगुरु म्हणजे पिडांतील कुंडलिनी शक्ति, गुरुपादुका हेच परमहसपद होय. श्रीगुरु हेच शिव जगन्नाथ, आदिनाथ होत.

श्रीबाबांच्या अभयवरदहस्त सद्‌गुरु पदाची निदिध्यासरुप साधना आचरल्यास बाबांचे गुरुस्वरुप यथार्थ आकळेल व ते गुरुरुपाने अखंड मार्गदर्शक संरक्षण व उद्धार करतील. प्रपंच परमार्थ सांभाळतील. श्रीसाईगीतायनकार म्हणतात.

**''नयनात आपुल्या नयन मिळो**
**प्रभु ज्योतिमधुनी ज्योत जळो''** **(श्रीसाईगीतायन)**

**किंवा**

**''मूर्तिमंत मी मोक्ष समोरी, मीच मंत्र आदेश**
**अंतरी ठसो हाच उपदेश''** **(श्री साईगीतायन)**

●●●●●●

# शिरडी येथील गुरूपौर्णिमा उत्सव

प्रतिवर्षाप्रमाणे शिरडी येथे श्री गुरूपौर्णिमा उत्सव रविवार दिनांक २० जुलै ते मंगळवार दिनांक २२ जुलै १९८६ असे तीन दिवस साजरा होईल असे कार्यकारी अधिकारी श्री. रा. द. बन्नेसाहेब कळवितात.

# -:सद्गुरू महिमा:-

— श्री. अरविंद बारटक्के
१३५ शुक्रवार पेठ पुणे ४११ ००२

आपल्या भरत भूमीत रुजलेल्या आणि फुललेल्या संत वाङ्मयाकडे आणि बहुजन समाजास तारक ठरलेल्या संत चरित्राकडे पाहिले असता गुरू परंपरा व श्रीगुरुंचे स्तवन करणे आणि त्यातून गुरुंचे पूजा, अर्चन करणे याचीही एक आगळी परंपरा आढळते.

संत ज्ञानेश्वर हे या भागवत धर्मावर आधारलेल्या पवित्र मनोमंदिराचे पाया म्हणून वर्णिले गेले आहेत.

संत ज्ञानेश्वरांचे गुरू म्हणजे त्यांचेच ज्येष्ठ बंधू संत निवृत्तीनाथ.

संत निवृत्तीनाथांकडे आलेली ही गुरूशिष्य परंपरा थेट आदिनाथापर्यंत जाऊन पोहचते.

संत ज्ञानेश्वरांनी जो प्रमुख ग्रंथ लिहिला तो 'ज्ञानेश्वरी' अल्पवयात लिहिलेल्या या ज्ञानेश्वरीला सकल जनांनी आपले पूजास्थान ठरवले. वारकरी समाजात या ग्रंथाचे महत्त्व आगळे आहे.

आपल्या 'ज्ञानेश्वरी' या ग्रंथात ज्ञानेश्वर आपल्या ग्रंथरचनेचे सारे श्रेय निवृत्तीनाथांना देताना आढळतात. गुरूविषयी त्यांचा असलेला प्रगाढ आत्मविश्वास ते व्यक्त करताना म्हणतात —

म्हणौनि माझे नित्य नवे।
श्वासही प्रबंध हो आवे।
गुरूकृपा काई न्हवे
ज्ञानदेऊ म्हणे।।

ज्ञानेश्वरीच्या अध्यायांचे प्रारंभी त्यांनी केलेली गुरूस्तुती म्हणजे एक मनोज्ञ असा विलास आहे. त्याचे सौंदर्य शब्दात मांडणे कठीणच. ज्ञानराजांनी आपल्या प्रतिभेच्या फुलांनी निवृत्तीनाथांना अलंकृत केले आहे. त्यांनी मांडलेली ही पूजा मोहवणारी आहे. तिचे सौंदर्य अलौकिक आहे.

ज्ञानदेवांचा छळ ज्यांनी केला आणि पुढे पश्चाताप पाऊन त्यांना शरण गेले ते म्हणजे विसोबा चाटी म्हणजेच संत नामदेवांचे गुरू विसोबा खेचर.

मुक्ताबाईंनी जेव्हा नामदेवाला गोरोबा काकांकडून कच्चे मडके ठरवले तेव्हा आपले गाऱ्हाणे घेऊन नामदेव पांडूरंगापाशी आले तेव्हा त्या पंढरीनाथांनीसुद्धा त्यांना, 'सदगुरूला शरण जा अन्यथा तू कच्चाच राहशील." असे सांगून विसोबा खेचरांकडे पाठवले.

नंतर जेव्हा नामदेव औंढ्या नागनाथ मंदिरात विसोबा खेचरांकडे गेले तेव्हा त्यांनी नामदेवांवर 'कृपा' केली आणि 'जगात देव नाही अशी जागा नाही' हा उपदेश कृतीतून दिला.

नामदेवांनी हे सारे गुरूभेटीचे वर्णन आपल्या अभंगातून सचित्र उभे केले आहे. गुरूमहती गायिली आहे. म्हणूनच 'नाचू कीर्तनाचे रंगी' या आपल्या सुप्रसिद्ध अभंगाचे अखेरीस नामदेव म्हणतात —

अवघी सत्ता आली हाता।
नाम याचा खेचरी दाता।।

आणि मग याच सद्‌गुरूविषयी नामदेव आपली श्रद्धा जशी प्रकट करतात तसाच गाढ विश्वासही प्रकट करतात.

सद्‌गुरूचे पायी देहासि अर्पिता।
तात्काळ मुक्तता हाता येते।।
माया देऊनिया ब्रम्ह घ्यावे हाती।
ऐशा गुरूप्रति का भजाना।।
नामा म्हणजे गुरूपायी लाभ आहे।
मोक्ष तोही पाहे दास होतो।।

संत ज्ञानदेवांनी उभारलेल्या देवालयास संत एकनाथांनी आपल्या भागवताचा खांब देऊन त्या मंदिराची शोभा वृद्धींगत केली.

संत एकनाथांचे गुरू म्हणजे श्री. जनार्दन स्वामी. ते देवगिरीचे किल्लेदार होते. त्यांचे गुरू म्हणजे साक्षात त्रिगुणी, त्रिगुणात्मक, त्रिमुर्ती दत्त महाराज. जनार्दन स्वामींना अनेकदा श्री दत्ताचे दर्शन झाले होते आणि त्याचमुळे त्यांनी आपला कृपाहस्त संत एकनाथांचे शिरी ठेऊन त्यांना संपन्न केले होते.

नाथांना आपल्या गुरूविषयी आदर, प्रेम होतेच शिवाय त्यांची त्यांच्या गुरूपाशी असलेली निष्ठाही अविचल अशी होती. जनार्दन स्वामींनी नाथांना सर्वगुणसंपन्न केले. म्हणूनच त्यांचे विषयीचा आदर व्यक्त करण्यासाठी नाथ आपल्या प्रत्येक अखेरची ओवी लिहीताना 'एका जनार्दनी' ही बिरूदावली लावताना दिसतात.

आपल्या ग्रंथाचे मंगलाचरणातच ते गुरूविषयीचा आदर प्रेमभावना प्रकट करताना म्हणतात—

ओम नमो सद्‌गुरू निर्गुणा। पार नाही तंव गुणा।
बसोनि माझिया रसना। हरिगुणा वर्णवी।।
तुमचा प्रसाद जाहलिया पूर्ण। हरिगुण वर्णीन मी जाण।
एका वंदितसे चरण। सद्‌गुरूचे आदरे।।

नाथांनी वर्णिलेला गुरूमहिमा असाच सुंदर आणि लोभस आहे. गुरूभक्तींनी ओथंबलेल्या त्यांच्या अभंगातील ओव्या वाचल्या की नाथांना वाटत असलेला सद्‌गुरूविषयीचा आदर नकळत जाणवतो. अशा या नाथांना गुरूनाम जप सुद्धा तारक वाटतो.

"गुरूहाती असे सर्व त्याचे काम।
दासामुखी नाम गुरू गुरू।।
गुरू गुरू जप अज्ञान नाशक।
भवसिंधू तारक गुरू नाम।।
गुरूनामास आणिक नाही मंत्र।
सांगताती शास्त्रे, महानुभव।।"

अशा या सद्गुरूपायी आपले चित्त एकवटले, स्थीर झाले की साऱ्या सुखाची खाण आपणास प्राप्त होते. मोक्षपद मिळते.

सद्गुरूपायी ज्याचे चित्त स्थिर झाले।
तयासी जोडले मोक्षपद।।

ज्ञानराजांनी गायिलेली गुरूस्तुती जशी विलोभनीय आहे तशीच नाथांनी केलेली ही गुरूपुजा सुंदर, मोहक आणि संजिवक आहे.

संत तुकाराम म्हणजे ज्ञानराजांनी उभारलेल्या मंदिराचा कळस. संत तुकारामांना स्वप्नात येऊन गुरूने उपदेश केला आणि 'रामकृष्णहरी' हा मंत्र दिला. त्यांचे नाव बाजाजी चैतन्य होते.

संत तुकाराम हे संत बहिणाबाईचे गुरू. बहिणाबाईस ही तुकारामांनी स्वप्नात दर्शन दिले.

बहिणाबाईनी आपल्या अभंगातून आदिनाथापासून ज्ञानेश्वरापर्यंत आलेल्या गुरूपरंपरेचे वर्णन केले आहे. याच गुरूपरंपरेविषयी बहिणाई आदराने म्हणतात —

"गुरू परंपरा आम्हा चैतन्य वली।
तयाचे स्मरणे आम्हां वैकुंठ वली।।
नमस्कार हा तया साष्टांग माझा।
ओवाळू जीवे साधु चैतन्य राजा।।
बहिणी म्हणे मुक्त आम्ही सद्गुरूचे ध्याने।
प्रेमे भक्ती भावे जया वोवाळू प्राणे।।"

संत कबीरांचे गुरू रामानंद स्वामी कबीरांनी सुद्धा आपल्या मधूर शब्दात गुरूची महती गायिली आहे. कबीरांच्या रचनेतील तालमाधूर्य मोहून टाकणारे आहे.

गुरू हाच मार्ग दाखवणारा त्राता आहे. त्याचे शिवाय अन्य कोणीही हा भवसागर तारू शकणार नाही. असा विश्वास संत कबीर व्यक्त करतात.

गुरू विन कौन बतावे बाट।। धृ।।
बडा बिकट यम घाट
गुरू विन कौन बतावे बाट।। १।।

अशा या गुरूजवळ साऱ्या विश्वाचा खजिना आहे. ज्याला जे पाहिजे ते मागावे. इच्छापूर्ती गुरूकृपने होऊ शकेल फक्त गुरूची कृपादृष्टी तेवढी लाभावयास हवी.

"दाता गुरू बिन कोई नहीं।
जग मांगन हारा हो।
तिन लोकके उपर थारा
सबके और फिरतारा हो।
क्या राजा का छत्रपती
सब हाथ पसारा हो।"

अशा या दात्याजवळ आपण आपली इच्छा प्रकट करावी आणि गुरूने शिष्यावर कृपादृष्टी फिरवावी या सारखे अन्य सुख ते कोणते?

अशी ही गुरूपरंपरा. प्रत्यक्ष आदिनाथापासून सुरू होऊन संतापर्यंत पोहचलेली.

सामान्य माणसालाच नव्हे तर ईश्वराला सुद्धा गुरूची गरज पडली होती. विष्णुनी, राम, कृष्ण अवतारात सुद्धा गुरू केलेले आढळून येतात.

समर्थ साईनाथ देखिल सद्‌गुरूचे स्थान त्यांच्या भक्तांना दाखवीत असत. यातून याच गुरूपरंपरेचे संक्रमण चालत आलेले दिसून येते. तीच परंपरा अजूनही आहे. आज अनेक भक्तांना साईमाऊली ही सद्‌गुरूवत वाटते. अनेक भक्तगण गुरूपौर्णिमेच्या मंगलदिनी साईदैवतेचे पूजन अर्चन करून तिच्यावरील आपली भक्ती प्रकट करीत असतात.

अशी ही साईमाऊलीला जर श्रद्धेची सुमने अपर्ण करुन भावभक्तींचा नैवेद्य दाखविलात तरीही ती आपल्या भक्तांवर कृपेचा हस्त ठेवण्यास सदैव तत्पर असते आणि आपल्या भक्तांना-

जरी हे शरीर गेलो मी टाकून।<br>
तरी मी धावेन भक्तांसाठी।।

या वचनातून दिलासा देत असते. या साईनाथाला तुमच्या सद्‌गुरूला श्रद्धाभक्तीची गुरूदक्षिणा अर्पण केलीत तरी साईनाथ खचितच संतुष्ट होतील. आपल्या शांत, सतेज नेत्रांमधून कृपेचा वर्षाव करतील.

अशा या माझ्या तुमच्या सकलजनांना सद्‌गुरूनाथ असलेल्या साईमाऊली चरणी मी माझी शब्द सुमनांची ओंजळ रिती करून श्रद्धाभक्तीपूर्वक सादर वंदन करतो.

श्रद्धायुक्त भक्ती<br>
सबूरी सांगाती।<br>
अर्पिता ही गुरूदक्षिणा<br>
मिळे भक्ता मुक्ती।।

★ ★ ★

# साई शिल्पकार

साई नव युगाचा शिल्पकार<br>
साई कली युगाचा साक्षातकार<br>
साई आधुनिक कृष्ण अवतार<br>
साई सर्वांचा मोठा आधार<br>
साईचा खुला सर्वांना दरबार<br>
साई सर्वांना देती पुकार<br>
उठा धीर धरा असा करीती ललकार<br>
सर्व देवाची लेकरे करीती झंकार<br>
साई नव युगाचा ओंकार

**— श्री. प्रमोद बी. रायसोनी**<br>
१६४ समर्थ नगर, औरंगाबाद

# जा शिरडीला जा

भक्तगणांनो शिर्डी जाऊन
चला गाऊ साईरामायण ।। धृ ।।

अवताराची तिथं समाप्ती
देहरूप श्री साई जाती
सदा तयांची येइ प्रचीती
साईभक्तिने भरता कणकण ।। १ ।।

ते सर्वांचे बाबा आई
अगणित त्यांची प्रभुपुण्याई
कृष्ण द्वारिका मशीद माई
तिथे बैसले श्री प्रभुसाई
करूनी पाषाणा सिंहासन ।। २ ।।

जरि मी गेलो देश टाकुन
येईन भक्तांसाठी धावुन
तुम्ही पाहता माझ्या प्रत मी
पाहिन तुमच्याकडे नेहमी
अशा आशिषा घ्यावे ऐकून ।। ३ ।।

श्री साईच्या समाधीतुनी
अस्थि तयांच्या बोलती अजुनी
ठेवा माथा साईचरणी
समाधीवरी तन्मय होऊनि
श्रवण करावे हे संभाषण ।। ४ ।।

असा व्यग्र की निज संसारी
साईनाम घ्या नित्य अंतरी
कुठेही असा कसेही असा
असोत हृदयी साईपद ठसा
साईप्रभुचे अखंड चिंतन ।। ५ ।।

दो पैशांची अल्पदक्षिणा
मागे आपुला साईराणा
नको प्रतिष्ठा नको बहाणा
नजराणा द्या साई चरणा
श्रद्धा सबुरी करा समर्पण ।। ६ ।।

**— डॉ. एम.जी. दिक्षित**
१२०६/३२-अे शिरोळे रोड,
शिवाजी नगर, पुणे-४

# नियम श्रद्धेचे - शिर्डी दर्शनाचे

शिर्डी माझे एक, श्रद्धेचे मंदिर
देव तो सुंदर, भासे साऱ्यांसाठी
कुणाहि भक्तांनी, चढावी पायरी
मात्र भाव तो अंतरी, ठेवुनिया —
दर्शन घेण्या तेथे, आहे एक रित
त्यांतच दडले हित, भाविकांचे
श्रद्धेने हे, अवश्य पाळा नियम
देवा करा प्रणाम, क्रमाक्रमाने —
लिंब-वृक्षाखाली, आहे गुरूस्थान
प्रथम त्यास वंदन, करूं या
हे बाबांच्या गुरूंचे, पवित्र स्थान
धूप जाळण्याचा मान, घेऊं या —
चला मग पुढे, द्वारकामाईत
बाबांचा येथे, नित्य होता सहवास
अखंड धूनीसंगे बसले, येथेच जेवण
येथेच निर्वाण, झाले देवाजीचे —
यानंतर आता, जावूं समाधि-मंदिर
देव तो अंतरी, साठवाया
येथेच देव, समाधिस्थ आहे
चमत्कार त्याचा पाहे, जीवनात!

**— श्री. भालचंद्र केशव गंद्रे**
ठाणे

# शिरडी वृत्त

## माहे मे ८६

या महिन्यात साईभक्तांची गर्दी पुष्कळ प्रमाणात होती. काही कलाकारांनी श्रींच्या पुढे हजेरी दिली ती खालीलप्रमाणे —

**कीर्तन :—** १) श्री. मधुकर गणेश सूर्यवंशी, संस्थान गवई यांची कीर्तने एकादशी व महत्वाचे दिवशी झाली. २) ह.भ.प. सौ. मंजुश्री खाडीलकर, पुणे. ३) ह.भ.प. तुकारामबुवा परदेशी, शिर्डी.

**प्रवचन :—** १) ह.भ.प. विष्णू बाळाजी शिंदे, शिरापूर पाथर्डी. २) ह.भ.प. लक्ष्मण महाराज वाकचौरे, शिर्डी. ३) ह.भ.प. विश्वनाथ महाराज. मु.पी. सुराळे.

**भजन, गायन, वादन, नृत्य इ. —** १) कु. मल्लिका, हैद्राबाद २) श्री.टी. यादगिरी, हैदराबाद ३) श्री. अब्दुल रहीम, मच्छलीपटण ४) शिवराम बुवा वरळीकर, मुंबई ५) श्री. एकनाथ शिवराम वरळीकर ६) श्री. तुकाराम महादेव पैठणकर, पुणे ७) श्री. भास्करराव अमेंबल, पुट्टपारथी ८) श्री. किशोर अमेंबल ९) श्री. जयंत गांजावाला १०) डॉ. पी. नागेश्वर राव, विजयवाडा ११) सौ. सुप्रिया सुभाष देसाई, डोंबिवली १२) श्री. एम.के. सक्सेना, दिल्ली १३) श्रीमती वेदावनी, चैतन्यपुरी १४) श्री. दामोदर जगजीवन शहा, मु. चिखली १५) गीता शहा १६) जयराम हरी, रायडरवेल (आफ्रिका), १७) श्रीमती कांताकुमारी, दिल्ली १८) श्री. साईबाबा मिशन, ओंगल १९) श्रीकांत वामन खाडीलकर, पुणे २०) श्री. नटराज खाडीलकर २१) कु. आयुता खाडीलकर २२) श्री. मुकुंद गोविंद झांबरे, गांवभाग २३) श्री. के. हरीबाबू, नेल्लोर २४) श्री. के. रामस्वामी, बंगलोर २५) श्री. पांडूरंग पुरूषोत्तम जोशी, ग्वाल्हेर २६) श्री. राधाकिसन संत, येवला २७) श्री. अरूण रघुनाथ संत २८) श्री. रघुनंदन राधाकिसन संत २९) श्री. पांडूरंग नारायण कुलकर्णी, सोलापूर ३०) श्री. आर. प्रताप राजू, पापगडा ३१) श्री. पन्नालाल जैन, गुरुसराय ३२) श्रीमती वत्सलाबाई अय्यर, मुंबई ३३) श्री. रमेश बेगरूर, पुणे ३४) श्रीमती नटेश्वरी गुप्ता, हैदराबाद ३५) श्री. बाबूराव उप्पलवार, देगलूर.

**हवापाणी :—** शिरडी येथील हवापाणी उत्तम असून रोगराई काही नाही. पहाटे हवा आल्हाददायक असते.

# श्री साईबाबा संस्थान, शिरडी
## श्री साईबाबा संस्थान प्रकाशित पुस्तकांची यादी

| अनु. पुस्तकाचे नांव | भाषा | किंमत | पॅकिंग व पोस्टेज |
|---|---|---|---|
| १. श्री साई चरित्र | मराठी | ३४-५० | ६-०० |
| २. —''— | इंग्रजी | २०-०० | ४-२५ |
| ३. —''— | हिन्दी | १६-०० | ४-२५ |
| ४. —''— | कन्नड | १०-०० | ४-०० |
| ५. —''— | तेलगू | १४-५० | ५-२५ |
| ६. —''— | तामीळ | १२-०० | ४-५० |
| ७. —''— | सिंधी | २२-०० | ४-५० |
| ८. गुजराथी पोथी | गुजराथी | ३१-०० | ६-०० |
| ९. श्री साईलिलामृत | मराठी | ७-५० | ४-०० |
| १०. —''— | गुजराथी | ४-२५ | ४-०० |
| ११. अवतार व कार्य | मराठी | ६-५० | ४-०० |
| १२. स्तवन मंजिरी | मराठी | ०-३० | ३-५० |
| १३. —''— | गुजराथी | ०-३० | ३-५० |
| १४. सगूणोपासना | मराठी | ०-७० | ३-५० |
| १५. चार अध्याय | मराठी | १-२५ | ३-५० |
| १६. सगूणोपासना | सिंधी | १-२५ | ३-५० |
| १७. सचित्र साईबाबा | इंग्रजी | ३-४० | ३-५० |
| १८. मुलांचे साईबाबा | मराठी | १-५० | ३-५० |
| १९. —''— | इंग्रजी | २-०० | ३-५० |
| २०. —''— | तेलगू | २-५० | ३-५० |
| २१. —''— | गुजराथी | १-५० | ३-५० |
| २२. गाईड टू होली शिरडी | इंग्रजी | १-५० | ३-५० |
| २३. —''— | मराठी | १-५० | ३-५० |
| २४. —''— | गुजराथी | १-५० | ३-५० |
| २५. तेलगु पुजाविधी | तेलगु | — | — |
| २६. रूद्राध्याय | मराठी | ०-९० | ३-५० |
| २७. साईबाबा ऑफ शिरडी बाय प्रधान | इंग्रजी | ३-०० | ३-५० |
| २८. साईबाबा ऑफ शिरडी वाय. पी. भरूचा | इंग्रजी | ६-५० | ४-०० |

Regd. No. MH BYE 26
LICENCE No. 19
Licence to Post Without Prepayment
At Dadar Head Office, Bombay-14

# श्री साईबाबा संस्थान शिरडी

## फोटोंची यादी

| अनु. फोटोचे नांव | साईज | किंमत | पोस्टेज व पॅकिंग |
|---|---|---|---|
| १. आशिर्वाद फोटो | १४'' × २०'' | १-८५ | ३-५० |
| २. –''– | १०'' × १४'' | १-१५ | ३-५० |
| ३. –''– | १०'' × १२'' | १-५० | ३-५० |
| ४. –''– | ७'' × २०'' | ०-६० | ३-५० |
| ५. –''– | ५½'' × ६½'' | ०-३५ | ३-५० |
| ६. –''– | ४'' × ५'' | ०-३० | ३-५० |
| ७. –''– | २'' × ३'' | ०-२० | ३-५० |
| ८. दगडावर बसलेले साईबाबा (रंगीत) | १४'' × २०'' | १-८५ | ३-५० |
| ९. '' '' (काळापांढरा) | १४'' × २०'' | ०-८५ | ३-५० |
| १०. दगडावर बसलेले साईबाबा (रंगीत) | ३½ × ५½ | ०-६० | ३-५० |
| ११. द्वारका माई (रंगीत) | १७'' × २२'' | ५-७५ | ३-५० |
| १२. –''– | १४'' × २०'' | १-६० | ३-५० |
| १३. –''– | १०'' × १४'' | १-२५ | ३-५० |
| १४. समाधी फोटो | १३'' × ९'' | १-१५ | ३-५० |
| १५. –''– | ८'' × ६'' | ०-७५ | ३-५० |
| १६. –''– | ४'' × २½'' | ०-१० | ३-५० |
| १७. कॅमेरा फोटो (रंगीत) | ९'' × १२'' | १-६५ | ३-५० |
| १८. ऑफसेट फोटो | ९'' × १३'' | १-५० | ३-५० |
| १९. –''– | ५'' × ७'' | ०-४० | ३-५० |
| २०. दगडावर बसलेले बाबा (निळा) | ९'' × १२'' | ०-७५ | ३-५० |
| २१. मूर्ती फोटो (बस्ट) | ३¾ × ४½'' | ०-३५ | ३-५० |

श्री. रा. द. बन्ने, संपादक यांनी श्री साईबाबा संस्थान, साई निकेतन, ८०४ बी, डॉ. आंबेडकर रोड, दादर, मुंबई - ४०००१४, यांचे करिता गिता ऑफसेट, बी-२३, रॉयल इंडस्ट्रियल इस्टेट, नायगाव क्रॉस रोड, वडाळा, मुंबई - ४०० ०३१ येथे छापून प्रकाशित केले.